# मराठी
# बालभारती
## इयत्ता आठवी



शासन निर्णय क्रमांक : अभ्यास-२११६/(प्र.क्र.४३/१६) एसडी-४ दिनांक २५.४.२०१६ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या समन्वय समितीच्या दि. २९.१२.२०१७ रोजीच्या बैठकीमध्ये हे पाठ्यपुस्तक सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून निर्धारित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

## मराठी

# बालभारती

## इयत्ता आठवी

### (प्रथम भाषा)



महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे ४.

LYHG2H

आपल्या स्मार्टफोनवरील DIKSHA APP द्वारे पाठ्यपुस्तकाच्या पहिल्या पृष्ठावरील Q. R. Code द्वारे डिजिटल पाठ्यपुस्तक व प्रत्येक पाठामध्ये असलेल्या Q. R. Code द्वारे त्या पाठासंबंधित अध्ययन अध्यापनासाठी उपयुक्त दृक्‌श्राव्य साहित्य उपलब्ध होईल.

प्रथमावृत्ती : २०१८ © महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे – ४११ ००४.

या पुस्तकाचे सर्व हक्क महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाकडे राहतील. या पुस्तकातील कोणताही भाग संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ यांच्या लेखी परवानगीशिवाय उद्धृत करता येणार नाही.

**मराठी भाषा तज्ज्ञ समिती**

फादर फ्रान्सिस दिब्रिटो (सदस्य)
डॉ. स्नेहा जोशी (सदस्य)
श्रीमती माधुरी जोशी (सदस्य)
श्री. शिवाजी तांबे (सदस्य)
डॉ. सुजाता महाजन (सदस्य)
श्रीमती सविता अनिल वायळ (सदस्य-सचिव)

**मराठी भाषा अभ्यासगट सदस्य**

| | | |
|---|---|---|
| श्रीमती स्वाती ताडफळे | प्रा. विजय राठोड | श्रीमती नेहा रावते |
| डॉ. नंदा भोर | श्री. देविदास तारू | श्रीमती अन्वया काणे |
| डॉ. शारदा निवाते | श्रीमती प्रांजली जोशी | श्रीमती सुप्रिया खाडिलकर |
| श्रीमती अनुजा चव्हाण | श्रीमती वैदेही तारे | श्री. सुनिल बनसोडे |
| श्री. मोहन शिरसाट | डॉ. सुभाष राठोड | डॉ. जगदीश पाटील |
| श्री. प्रवीण खैरे | श्री. नाना लहाने | श्री. रमाकांत देशपांडे |
| श्री. प्रमोद डोंबे | श्रीमती प्रतिभा लोखंडे | श्री. नामदेव एडके |
| श्री. समाधान शिकेतोड | श्रीमती जयमाला मुळीक | श्री. रविंद्रदादा डोंगरदेव |
| श्री. बापू शिरसाठ | डॉ. मंजूषा सावरकर | श्री. दिलीप देशपांडे |
| श्री. मयुर लहाने | श्रीमती स्मिता जोशी | |

**प्रकाशक**
विवेक उत्तम गोसावी
नियंत्रक
पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ,
प्रभादेवी, मुंबई - २५.

**निमंत्रित तज्ज्ञ**
श्री. हरी नारलावार

**संयोजन** : श्रीमती सविता अनिल वायळ
विशेषाधिकारी, मराठी

**चित्रकार** : यशवंत देशमुख

**मुखपृष्ठ** : विवेकानंद पाटील

**अक्षरजुळणी** : भाषा विभाग, पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे.

**निर्मिती** : सच्चिदानंद आफळे, मुख्य निर्मिती अधिकारी
सचिन मेहता, निर्मिती अधिकारी
नितीन वाणी, सहायक निर्मिती अधिकारी

**कागद** : ७० जी.एस.एम. क्रिमवोव्ह

**मुद्रणादेश** : N/PB/2018-19/1,00,000

**मुद्रक** : M/S. SAHIL PRINT ARTS, THANE

# भारताचे संविधान

## उद्देशिका

**आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य** घडविण्याचा व त्याच्या सर्व नागरिकांस:

सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय;**
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा
व उपासना यांचे **स्वातंत्र्य;**
दर्जाची व संधीची **समानता;**

निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा
व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी **बंधुता**
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून;

**आमच्या संविधानसभेत**
आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी
**याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.**

## राष्ट्रगीत

जनगणमन–अधिनायक जय हे
भारत–भाग्यविधाता ।
पंजाब, सिंधु, गुजरात, मराठा,
द्राविड, उत्कल, बंग,
विंध्य, हिमाचल, यमुना, गंगा,
उच्छल जलधितरंग,
तव शुभ नामे जागे, तव शुभ आशिस मागे,
गाहे तव जयगाथा,
जनगण मंगलदायक जय हे,
भारत–भाग्यविधाता ।
जय हे, जय हे, जय हे,
जय जय जय, जय हे ।।

## प्रतिज्ञा

भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत.

माझ्या देशावर माझे प्रेम आहे. माझ्या देशातल्या समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे. त्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन.

मी माझ्या पालकांचा, गुरुजनांचा आणि वडीलधाऱ्या माणसांचा मान ठेवीन आणि प्रत्येकाशी सौजन्याने वागेन.

माझा देश आणि माझे देशबांधव यांच्याशी निष्ठा राखण्याची मी प्रतिज्ञा करीत आहे. त्यांचे कल्याण आणि त्यांची समृद्धी ह्यांतच माझे सौख्य सामावले आहे.

# प्रस्तावना

प्रिय विद्यार्थी मित्रांनो,

तुम्हां सर्वांचे इयत्ता आठवीच्या वर्गात स्वागत आहे. 'बालभारती' हे मराठी प्रथम भाषेचे तुमच्या आवडीचे पुस्तक! इयत्ता आठवीचे हे पाठ्यपुस्तक तुमच्या हातांत देताना मनस्वी आनंद होत आहे.

मित्रांनो, मराठी ही आपल्या राज्याची राजभाषा आहे. एकमेकांशी संवाद साधताना, विचारांची देवाणघेवाण करताना, आपल्या भावना समोरील व्यक्तीसमोर मांडताना या भाषेचा प्रभावी व योग्य वापर करणे आवश्यक असते. यासाठी आपले आपल्या भाषेवर प्रभुत्व हवे. या पाठ्यपुस्तकाचा अभ्यास केल्यामुळे तुमचे भाषेवरील प्रभुत्व नक्कीच वाढणार आहे, तसेच भाषेचा विविध प्रकारे वापर करणे तुम्हांला सहज जमणार आहे.

या पाठ्यपुस्तकातून तुम्हांला वेगवेगळ्या साहित्यप्रकारांची ओळख करून दिली आहे. त्याचा अभ्यास केल्याने मराठी भाषेचे शब्दवैभव किती विविधांगी आहे, हे तुमच्या लक्षात येईल. भाषा हे नवनिर्मितीचे मुख्य साधन आहे. तुम्हांला नवनिर्मितीचा आनंद मिळावा, यासाठी या पुस्तकात अनेक कृती दिल्या आहेत. उदा., 'वाचा', 'चर्चा करूया' 'गंमत शब्दांची', 'खेळूया शब्दांशी', 'लिहिते होऊया', 'शोध घेऊया', 'खेळ खेळूया', 'माझे वाचन', 'चला संवाद लिहूया', 'सारे हसूया', 'सुविचार', 'भाषासौंदर्य' यांसारख्या अनेक भाषिक कृती इत्यादी. पाठ्यपुस्तकातील 'उपक्रम' व 'प्रकल्प' यांमुळे तुम्हांला मिळवलेल्या ज्ञानाची सांगड दैनंदिन जीवनाशी घालून ते ज्ञान स्वप्रयत्नाने पक्के करता येणार आहे.

रोजच्या जीवनात तुम्ही तंत्रज्ञानाचा वापर करतच आहात. त्या दृष्टीने पाठ्यपुस्तकात विविध कृती योजल्या आहेत. तंत्रज्ञानाच्या साहाय्याने या कृतींचा अभ्यास तुम्हांला करायचा आहे. 'मैत्री तंत्रज्ञानाशी' या शीर्षकाखाली दिलेल्या नवीन माहितीचा उपयोगही तुम्हांला दैनंदिन व्यवहारात करायचा आहे. त्याचबरोबर 'आपण समजून घेऊया' या शीर्षकाखाली भाषाभ्यासाच्या दिलेल्या विविध कृती समजून घेऊन त्या सोडवायच्या आहेत. या सर्व प्रकारच्या भाषिक कृती करताना तुम्हांला नक्कीच मजा येणार आहे.

तुम्हां सर्वांना हे पाठ्यपुस्तक नक्कीच आवडेल अशी आशा आहे. तुमच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा !

**(डॉ. सुनिल मगर)**
संचालक
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

पुणे
दिनांक : १८ एप्रिल २०१८, अक्षय्य तृतीया
भारतीय  सौर : २८ चैत्र १९४०

# भाषाविषयक अध्ययन निष्पत्ती : प्रथम भाषा मराठी आठवी

| अध्ययन-अध्यापनाची प्रक्रिया | अध्ययन निष्पत्ती |
|---|---|
| सर्व विद्यार्थ्यांना (वेगळ्या रूपात सक्षम मुलांसहित) व्यक्तिगत किंवा सामूहिक स्वरूपात प्रोत्साहन दिले जावे कारण त्यांना – | इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांसंदर्भात अपेक्षित अध्ययन निष्पत्ती– |
| • आपल्या भाषेत बोलण्याची, चर्चा करण्याची, विश्लेषण करण्याची संधी दिली जावी. | • विविध विषयांवर आधारित विविध प्रकारचे साहित्य वाचून त्यावर चर्चा करतात. (उदा., पाठ्यपुस्तकातील एखाद्या पक्ष्याविषयीची माहिती वाचून पक्ष्यांविषयी लिहिलेले पुस्तक वाचतात व चर्चा करतात.) |
| • जीवनाशी संबंध जोडून विषय समजण्याच्या संधी दिल्या जाव्यात. | • मराठी भाषेतील विविध प्रकारचे साहित्य/मजकूर (वर्तमानपत्रे, मासिके, कथा, इंटरनेटवर प्रसिद्ध होणारे इतर साहित्य) समजपूर्वक वाचतात, त्यांविषयी आपली आवड-नावड, मत, निष्कर्ष इत्यादी. तोंडी/सांकेतिक भाषेत व्यक्त करतात. |
| • वापरल्या जाणाऱ्या भाषेच्या बारकाव्यांवर चर्चा करण्याची संधी दिली जावी. | • वाचलेल्या साहित्यावर विचार करतात आणि अधिक समजून घेण्यासाठी प्रश्न विचारतात, चर्चा करतात. |
| • गटात कार्य करणे आणि एकमेकांच्या कामांबाबत चर्चा करणे, मत देणे-घेणे, प्रश्न विचारणे यांचे स्वातंत्र्य दिले जावे. | • आपल्या परिसरातील विविध बोलींतील लोककथा, लोकगीते यांविषयी सांगतात/बोलतात. |
| • मराठीबरोबरच आपल्या भाषांतील साहित्य वाचण्याचे, लिहिण्याचे आणि त्यावर चर्चा करण्याचे स्वातंत्र्य दिले जावे. | • अपरिचित घटना, प्रसंग आणि परिस्थितीची कल्पना करतात आणि यांबाबत मनात तयार होणाऱ्या प्रतिमा व विचार यांबद्‌दल सांगतात व लिहितात. |
| • आपला परिसर, काळ आणि समाज यांच्याशी संबंधित विविध साहित्यांचे वाचन आणि त्यावर चर्चा करण्याची संधी दिली जावी. | • विविध संवेदनशील मुद्‌द्यांविषयी (उदा., जाती, धर्म, वर्ण, लिंग, रीतिरिवाज यांबाबत) आपले मित्र, शिक्षक आणि कुटुंबातील सदस्य यांना प्रश्न विचारतात. (उदा., परिसरातील लोकांच्या सण साजरे करण्याच्या पद्‌धतींबद्‌दल बोलणे.) |
| • आपल्या भाषेची रचना करत असताना लिहिण्याच्या संदर्भातील क्रियाही आयोजित कराव्यात. उदा., शब्दखेळ, अनौपचारिक पत्र, कोडे, संस्मरण इत्यादी. | • एखादे साहित्य वाचून त्यातील सामाजिक मूल्यांविषयी चर्चा करतात, त्याची कारणे जाणून घेण्याचा प्रयत्न करतात. (उदा., शेजारच्या रामूकाकांची मुलगी शाळेत का जात नाही?) |
| • सक्रियता आणि जागरूकता आणणारे साहित्य (उदा., वर्तमानपत्रे, पत्रिका, चित्रपट आणि दृक्‌श्राव्य साहित्य इत्यादी.) पाहण्याची, ऐकण्याची, वाचण्याची, लिहिण्याची संधी दिली जावी. | • विविध प्रकारचे साहित्य जसे- कथा, कविता, लेख, अहवाल, वृत्तान्त, स्मरणपत्र, व्यंगचित्र, निबंध इत्यादींचे बारकाईने वाचन करून त्यांविषयी अनुमान काढतात, त्याचे विश्लेषण करतात, त्यांतील प्रमुख मुद्‌दे शोधतात. |
| • कल्पनाशक्ती आणि सर्जनशीलतेचा विकास करण्याचे उपक्रम – अभिनय, मूक अभिनय, कविता, पाठ, सृजनात्मक लेख, विविध स्थितींमधील संवाद | |

| अध्ययन–अध्यापनाची प्रक्रिया | अध्ययन निष्पत्ती |
|---|---|
| इत्यादींचे आयोजन केले जावे आणि त्याच्या तयारीशी संबंधित हस्तलिखित आणि अहवाल लेखनाची संधी दिली जावी.<br>• शाळा/विभाग/इयत्ता यांची पत्रिका भित्तिपत्रिका तयार करण्यासाठी प्रोत्साहन दिले जावे. | • वाचलेल्या साहित्यातील नवीन शब्द, वाक्प्रचार, म्हणी, सुभाषिते यांचे अर्थ समजून घेतात, आस्वाद घेतात व उपयोग करतात.<br>• कथा, कविता वाचून लेखनाचे विविध प्रकार व शैली ओळखतात. (उदा., वर्णनात्मक, भावात्मक, निसर्गचित्रण.)<br>• एखादा मजकूर वाचताना तो समजून घेण्यासाठी आवश्यकतेनुसार वर्गमित्र/शिक्षक यांची मदत घेऊन उपयुक्त संदर्भसाहित्याची (शब्दकोश, विश्वकोश, इंटरनेट किंवा अन्य पुस्तकांची) मदत घेतात.<br>• विविध प्रकारचे साहित्य वाचताना (कथा, कविता, जाहिराती इत्यादी.) त्याच्या रचनेचा आस्वाद घेतात आणि त्यांबाबत आपापल्या कुवतीनुसार तोंडी, लेखी स्वरूपात विचार व्यक्त करतात.<br>• वाचन व लेखनाचा उद्‌देश लक्षात घेऊन आपले विचार प्रभावीपणे मांडतात.<br>• स्वत:चे अनुभव स्वत:च्या भाषाशैलीत लिहितात. लेखनाचे विविध प्रकार व शैली यांचा उपयोग करून अनुभवलेखन करतात. (उदा., कथा, कविता, निबंध अशा वेगवेगळ्या पद्‌धतीने अनुभव लेखन करणे.)<br>• दैनंदिन जीवनातील एखादी वैशिष्ट्यपूर्ण घटना, स्थिती, अनुभव यांवर विविध प्रकारे सर्जनात्मक लेखन करतात. (उदा., सोशल मिडीयावर लिहिणे, संपादकांना पत्र लिहिणे.)<br>• विविध कलांमध्ये (उदा., हस्तकला, वास्तुकला, कृषिकला, नृत्यकला, चित्रकला) वापरल्या जाणाऱ्या भाषेचा सर्जनात्मक वापर करतात.<br>• अभिव्यक्तीच्या विविध शैली व रूपे ओळखतात आणि त्यानुसार स्वतः लिहितात. (जसे– विनोदी कथा, शौर्यकथा)<br>• व्याकरण घटकांची माहिती घेतात व त्यांचा लेखनात योग्य वापर करतात. उदा., विभक्ती, प्रयोग–कर्तरी, कर्मणी व भावे प्रयोग, संधी–स्वरसंधी, व्यंजनसंधी व विसर्गसंधी, अलंकार–यमक, अनुप्रास, उपमा व उत्प्रेक्षा, समास–अव्ययीभाव, तत्पुरुष, द्‌वंद्‌व व बहुव्रीही, अक्षरगणवृत्त–भुजंगप्रयात, वसंततिलका, मालिनी. |

# अनुक्रमणिका

## भाग – १


| अ. क्र. | पाठ/कविता | लेखक/कवी | पृ. क्र. |
|---|---|---|---|
| १. | भारत देश महान (गीत) | – माधव विचारे | १ |
| २. | माझ्या देशावर माझे प्रेम आहे | – यदुनाथ थत्ते | २ |
| ३. | लाखाच्या...कोटीच्या गप्पा | – वसंत जोशी | ७ |
| ४. | नव्या युगाचे गाणे (कविता) | – वि. भा. नेमाडे | १२ |
| ५. | सुरांची जादुगिरी | – डॉ. द. ता. भोसले | १६ |


## भाग – २


| अ. क्र. | पाठ/कविता | लेखक/कवी | पृ. क्र. |
|---|---|---|---|
| ६. | असा रंगारी श्रावण (कविता) | – ऐश्वर्य पाटेकर | २४ |
| ७. | अण्णा भाऊंची भेट | – विठ्ठल उमप | २७ |
| ८. | धाडसी कॅप्टन : राधिका मेनन | – मच्छिंद्र ऐनापुरे | ३२ |
| ९. | विद्याप्रशंसा (कविता) | – कृष्णशास्त्री चिपळूणकर | ३८ |
| १०. | लिओनार्दो दा व्हिंची (स्थूलवाचन) | – अच्युत गोडबोले, दीपा देशमुख | ४० |


## भाग – ३


| अ. क्र. | पाठ/कविता | लेखक/कवी | पृ. क्र. |
|---|---|---|---|
| ११. | स्वामी विवेकानंदांची भारतयात्रा | – सुनील चिंचोलकर | ४६ |
| १२. | गोधडी (कविता) | – डॉ. कैलास दौंड | ५३ |
| १३. | पाड्यावरचा चहा | – गोदावरी परुळेकर | ५७ |
| १४. | फुलपाखरे | – वि. पां. दांडेकर | ६४ |
| १५. | आळाशी (कविता) | – हनुमंत चांदगुडे | ७० |


## भाग – ४


| अ. क्र. | पाठ/कविता | लेखक/कवी | पृ. क्र. |
|---|---|---|---|
| १६. | चोच आणि चारा | – मकरंद जोशी | ७२ |
| १७. | अन्नजाल (कविता) | – हर्ष सदाशिव परचुरे | ७८ |
| १८. | जलदिंडी | – डॉ. विश्वास येवले | ८१ |
| १९. | गे मायभू (कविता) | – सुरेश भट | ८७ |
| २०. | शब्दकोश (स्थूलवाचन) | --- | ८९ |
| २१. | संतवाणी | (अ) संत तुकाराम (आ) संत सावता माळी | ९७ |

# १. भारत देश महान

**भाग–१**

**माधव विचारे :** प्रसिद्ध कवी व लेखक. त्यांच्या विविध विषयांवरील काव्यरचना प्रसिद्ध आहेत. देशभक्तीने ओतप्रोत भरलेल्या रचना हे त्यांच्या काव्याचे वैशिष्ट्य आहे.

हिमालयाच्या शिखरांनी सुशोभित असलेल्या आणि गंगा-यमुनेमुळे सुपीकतेचे वरदान लाभलेल्या भारतभूमीला शौर्याची आणि पराक्रमाची मोठी परंपरा लाभली आहे. प्रस्तुत गीतातून समता आणि विश्वशांती ही मूल्ये जपण्याचा संदेश दिला आहे. प्रस्तुत गीत हे 'गीतपुष्पांचा फुलोरा' या संपादित काव्यसंग्रहातून घेतलेले आहे.

- **ऐका. वाचा. म्हणा.**



चला चला हो एकमुखाने गाऊ एकच गान
भारत देश महान, भारत देश महान ।।धृ.।।

हिमालयाची हिमशिखरे ती । भारतभूच्या शिरी डोलती ।
गंगा, यमुना आणि गोमती । घालिती पवित्र स्नान ।।१।।

इतिहास नवा हा बलिदानाचा । शौर्याचा अन् पराक्रमाचा ।
समतेचा अन् विश्वशांतिचा । जागवी राष्ट्राभिमान ।।२।।

शौर्याने जे वीरचि लढले । रणांगणी ते पावन झाले ।
भारतभूचे स्वप्न रंगले । चढवूनि उंच निशाण ।।३।।



LZ6C4A

**शिक्षकांसाठी :** प्रस्तुत गीत विद्यार्थ्यांकडून तालासुरांत म्हणवून घ्यावे. तसेच इतर समूहगीतांच्या ध्वनिफिती ऐकवाव्यात.

# २. माझ्या देशावर माझे प्रेम आहे

**यदुनाथ थत्ते** (१९२२-१९९८) : प्रसिद्ध लेखक, संपादक, पत्रकार, बालसाहित्यकार, चरित्रकार. बत्तीस वर्षे त्यांनी 'साधना' या साप्ताहिकाचे संपादन केले. कथा, कादंबऱ्या, बालसाहित्य, चरित्रे, लेख, अनुवाद अशी त्यांची सुमारे शंभरच्या आसपास पुस्तके प्रकाशित आहेत. त्यांपैकी 'विनोबा भावे', 'आपला मान आपला अभिमान', 'साने गुरुजी जीवन-परिचय', 'यशाची वाटचाल', 'आपला वारसा', 'समर्थ व्हा, संपन्न व्हा', 'रेशमा', 'प्रतिज्ञा' ही अतिशय लोकप्रिय पुस्तके आहेत.

प्रस्तुत पाठ 'प्रतिज्ञा' या पुस्तकातून घेतला आहे. पाठ्यपुस्तकातील प्रतिज्ञेच्या तिसऱ्या वाक्याचा आशय या पाठात उलगडून दाखवला आहे. प्रतिज्ञा म्हणजे काया-वाचा-मनाने केलेला संकल्प. प्रतिज्ञेतील प्रत्येक शब्दामागे संकल्पाचे बळ असते. आपण जे म्हणतो ते आणि तेच आपल्याला करायचे आहे, असा दृढ विश्वास या शब्दांमधून व्यक्त होतो. या पाठाच्या संवादात्मक शैलीमुळे प्रतिज्ञेतील शब्दांचा अर्थ सहजपणे आपल्या मनापर्यंत पोहोचतो.

मी एकदा एका शाळेत गेलो होतो. शाळेची प्रार्थनेची वेळ होती. मुले पुस्तकातील प्रतिज्ञा म्हणताहेत हे पाहून मी सुखावलो. मुले प्रार्थनेहून परतली. मी मुलांना विचारले, ''तुमच्या देशावर तुमचे प्रेम आहे काय?''

मुले म्हणाली, ''अलबत्! आपल्या देशावर प्रेम न करणारे आम्ही करंटे थोडेच आहोत!''

मी विचारले, ''तुम्ही देशावर प्रेम करता म्हणजे काय करता?''



मुले आश्चर्याने पाहतच राहिली. त्यांना असा प्रश्न कधीच कोणी विचारला नव्हता!

''तुमची आई तुमच्यावर प्रेम करते?''

''हो हो, करते तर!''

''प्रेम करते म्हणजे काय करते?''

''आमचे पालनपोषण करते, आम्हांला वाढवते.''

''मग देशावर प्रेम करायचे, तर तुम्ही काय कराल?''

''देशाचे पालनपोषण करू, गौरव वाढवू.''

''पण देश म्हणजे काय?''

''देश म्हणजे देशातील सर्व लोक.''

''देशावर प्रेम करणे एक वेळ सोपे; पण देशबांधवांवर करणे अवघड, होय ना?''

''हो, खरे आहे.''

''भारतावर प्रेम म्हणजे भारतभूमीवर प्रेम आणि भूमिपुत्रांवरही प्रेम. आपल्याकडे काही लोक नुसते भूमीवर प्रेम करतात आणि काही लोक नुसते भूमिपुत्रांवर प्रेम करतात!''

''म्हणजे?''

''देशावर प्रेम करायचे तर भूमी आणि भूमिपुत्र, दोघांवर प्रेम हवे, होय ना?''

''बरोबर आहे.'' मुले म्हणाली.

एक मुलगा म्हणाला, ''भगतसिंह, राजगुरू, कुरबान हुसेन हे फासावर गेले. ते देशावर खरेखुरे प्रेम करत होते.''

मी विचारले, ''ते खरेच आहे; पण आता त्यांच्यासारखे प्रेम करायचे तर देश पुन्हा गुलाम व्हायला हवा? आपले देशावर प्रेम असते ते फक्त आपत्काळी असते, की नेहमी असायला हवे?''

एक मुलगा म्हणाला, ''नेहमीच करायला हवे. आपल्याला प्रेम दाखवायला संधी मिळावी, म्हणून संकटांना आमंत्रण थोडेच द्यायचे?''

''एकदा पंडित जवाहरलाल नेहरू निवडणुकीच्या दौऱ्यावर होते. लोकांनी त्यांची गाडी अडवली आणि 'भारतमाता की जय!' असा गगनभेदी घोष त्यांनी केला. पंडित नेहरू खाली उतरले आणि 'भारतमाता की जय' म्हणजे काय ते विचारू लागले. चर्चा करत करत 'भारत माता' म्हणजे भारतातले सर्व लोक, ही गोष्ट त्यांनी लोकांना समजावली. देशावर प्रेम करायचे म्हणजे जात, धर्म, वंश, भाषा हे वरवरचे भेद विसरून सर्वांवर प्रेम करायचे.''

एका मुलाने मला अडवून प्रश्न केला, ''पण प्रेम करायचे म्हणजे काय?''

मी म्हणालो, ''प्रेम करायचे म्हणजे दुसऱ्याचे दुःख पाहून ओल्या डोळ्यांनी त्याच्या मदतीसाठी धावून जायचे आणि दुसऱ्याला आनंद झाला, की आपणही आनंदित व्हायचे. प्रेम करायचे तर अश्रू आणि हास्य यांची भाषा आपल्याला आली पाहिजे.''

''हास्य आणि अश्रूंची भाषा?''

''हास्य आणि अश्रू यांची भाषा ही जागतिक भाषा आहे. महात्मा गांधीजी काय म्हणाले होते माहीत आहे? ते म्हणाले होते, प्रेम निष्क्रिय असूच शकत नाही. प्रेम सक्रिय पाहिजे. तसे सुबुद्धही हवे.''

''पण शांततेच्या काळात देशावर प्रेम करायचे म्हणजे काय?''

''शांततेच्या काळात प्रेम करण्याचे कितीतरी मार्ग आहेत. देशाच्या नवनिर्माणासाठी रचनात्मक काम करणे म्हणजे देशावर प्रेम करणे. हातात झाडू घेऊन गावाची शास्त्रीय पद्धतीने साफसफाई करणे म्हणजे देखील देशावर प्रेम करणेच होय. कोणतेही काम करताना आपल्या मनात असा विचार आला पाहिजे, की माझ्या या वागण्याचा परिणाम देशावर आणि देशवासीयांवर काय होईल? आपल्या पोटापलीकडे पाहायला शिकल्याखेरीज माझ्या देशावर माझे प्रेम आहे असे आपल्याला म्हणताच येणार नाही. खरे म्हणजे कोणतीच गोष्ट लहान किंवा मोठी नसते. ज्या संदर्भात आम्ही ते काम करतो तो संदर्भच त्या गोष्टीला लहान किंवा मोठे बनवत असतो. स्वार्थी वृत्तीने केलेले मोठे काम लहान असते आणि निःस्वार्थी वृत्तीने केलेले लहान कामही मोठे असते! संत कबीरांचे नाव तुम्ही ऐकले आहे ना?''

''हो, ऐकले आहे ना!''

''ते शेले विणायचे इतर विणकरांसारखेच; पण देशासाठी हे सणंग विणतो आहे अशा भावनेने विणायचे आणि म्हणून ते अपूर्व असायचे! आपण शिकतो आणि अध्यापक शिकवतात. परीक्षेत चांगले मार्क मिळावेत म्हणून शिकवलेले आणि मुले सज्ञान व्हावीत म्हणून शिकवलेले, यांत फरक असेल की नाही?''

''हो, फरक असायला हवा.''

''हॉटेलात आपण खातो आणि घरी आईने बनवलेला पदार्थ आपण खातो. त्यात काही फरक आपल्याला जाणवतो?''

''आईच्या प्रेमाची चव त्या पदार्थात मिसळलेली असते ना!''

''अमुक वजनाचा हात अमुक गतीने पाठीवर धप्धप् करू लागला, की आपल्याला जे जाणवेल ते आणि आईने पाठीवर शाबासकी दिली त्यात अंतर आहे की नाही?''

''आईची शाबासकी ती आईची शाबासकी! यंत्राने तसे केल्याने ते समाधान कुठले?''

''तेव्हा देशाच्या व देशबांधवांच्या प्रेमाने आपण जे करू त्याची गुणवत्ता निश्चितच वेगळी असेल. ही जाणीव नसल्याने अनेक अडचणी आणि गैरसोई आपणच निर्माण करत असतो. एस. टी. च्या, रेल्वेच्या कामगाराला, त्याचप्रमाणे प्रवाशालाही जर खरोखर आपल्या देशबांधवांबद्दल प्रेम असेल, आस्था असेल तर गाड्या घाण राहतील का? देशावरचे आपले प्रेम प्रत्येक बारीकसारीक गोष्टीत दिसून आले पाहिजे. मोठे प्रश्न उभे राहतील तेव्हा तर प्रेम आपण दाखवूच–अर्थात असे प्रश्न जीवनात एखाद्या वेळी आले तर येतात; पण छोटे प्रसंग रोजच येत असतात. आपले देशावरील व देशबांधवांवरील प्रेम प्रकट करण्यासाठी संकटांना निमंत्रण देण्याची गरज नाही.''

मुले शांतपणे ऐकत होती. देशावर प्रेम म्हणजे देशबांधवांवर प्रेम. ज्यांना देशबांधवांवर प्रेम करता येत नाही, त्यांचा देशावर प्रेम करण्याचा दावा फोल म्हणावा लागेल.

सारे विश्व प्रेमाने कवेत घ्यावेसे वाटले, तरी जवळचे त्यांनाच आलिंगन देता येते. त्याप्रमाणे यच्चयावत मानवमात्रावर प्रेम करायचे म्हटले, तरी शेवटी देशबांधवांवर प्रेम करणेच शक्य असते.

प्रेम कधीही निष्क्रिय राहू शकत नाही. प्रेमात अपार अशी संवर्धक शक्ती असते. ती ओळखूनच 'खरा धर्म' या कवितेत साने गुरुजी म्हणतात, 'खरा तो एकची धर्म, जगाला प्रेम अर्पावे.' अशा खऱ्या धर्माच्या उपासकालाच खऱ्या अर्थाने असे म्हणता येईल, की 'माझ्या देशावर माझे प्रेम आहे.'

खरोखरच आपल्या देशावर आपले प्रेम असते तर आपली गावे अशी मलमूत्राने वेढलेली दिसली असती का? आपले डोंगर उघडेबोडके दिसले असते का? 'सस्यश्यामला माता' असे काय फक्त राष्ट्रगीतातच घोषवायचे, की ती भूमी सस्यश्यामल व्हावी म्हणून आपला घाम गाळायची तयारी ठेवायची? देशावर प्रेम करायचे, तर देशाचे आजचे चित्र बदलण्यासाठी कंबर कसायला हवी. माझ्या देशावर माझे खरेखुरे प्रेम असेल, तर तो प्रदूषणाच्या कचाट्यात गवसू नये यासाठी मी खटपट करायला नको? इथली हवा, पाणी, निसर्ग बिघडवून टाकल्यामुळे आपल्या देशावरील आपले प्रेम सिद्ध होईल काय?

ही भूमी सुजलाम सुफलाम आहे असे म्हणत असतानाच तिची सुफलता आपल्या कर्तृत्वावर अवलंबून राहणार आहे हे कसे विसरता येईल? कष्ट करणाऱ्याला फळ मिळत नसेल आणि फळाची इच्छा धरणाऱ्याला कष्ट करावे लागणार नसतील, तर त्या भूमीला सुफला म्हणता येईल का?

माझ्या देशावर माझे खरेखुरे प्रेम असेल तर 'वंदे मातरम्' गीतात जो आदर्श सांगितला आहे तो वास्तवात यावा, यासाठी धडपडण्याची प्रेरणा आपल्याला मिळाली पाहिजे. आपण जात, धर्म, वंश, भाषा यांना निमित्त करून आपसांत भांडत राहिलो, तर ते भारतमातेला रुचेल काय? देशावर आपले प्रेम असेल, तर सर्व समाजघटकांना न्याय, स्वातंत्र्य, समता आणि आपलेपणाची हमी आपल्याला देता आली पाहिजे. शेवटी देशावर प्रेम म्हणजे भूमीवर प्रेम आणि भूमिपुत्रांवरही प्रेम. भूमिपुत्रांवर ज्यांना प्रेम करता येत नाही त्यांचे भूमीवर प्रेम करणे, हे एक प्रकारचे ढोंगच होईल!

'वंदे मातरम्' गीतात जे चित्र शब्दांकित झाले आहे ते वास्तवात यावे, म्हणून धडपड करत राहणे आणि सर्व भूमिपुत्रांना न्याय, स्वातंत्र्य, समता आणि आपलेपणा यांचे आश्वासन देणे, म्हणजेच देशावर प्रेम करणे.



## स्वाध्याय

**प्र. १. पाठाच्या आधारे थोडक्यात स्पष्ट करा.**

(अ) प्रतिज्ञा

(आ) सस्यश्यामला माता

**प्र. २. खालील आकृत्या पूर्ण करा.**

(अ) **(१) 'भारतमाता की जय'मधील भारतमाता म्हणजे** → [ ]

**(२) महात्मा गांधींनी सांगितलेली प्रेमाची दोन वैशिष्ट्ये** → [ ] [ ]

(आ) **देशावरील प्रेम सिद्ध होण्यासाठी लेखकांनी पाठात सांगितलेल्या विविध कृती**

[ ] [ ] [ ] [ ]

**प्र. ३. खालील विचार कोणाचे आहेत ते लिहा.**

| विचार | व्यक्ती |
|---|---|
| (अ) 'भारतमाता' म्हणजे भारतातले सर्व लोक. | (१) ________ |
| (आ) 'प्रेम निष्क्रिय असूच शकत नाही.' | (२) ________ |
| (इ) 'खरा तो एकची धर्म, जगाला प्रेम अर्पावे.' | (३) ________ |

**प्र. ४. तुमच्या शब्दांत उत्तरे लिहा.**

(अ) प्रतिज्ञेतील एखाद्या शब्दाचा अर्थ जाणून घेताना व कृतीत आणतानाचा तुमचा अनुभव लिहा.

(आ) तुमच्या आईचे तुमच्यावरील प्रेम व्यक्त करणारा एखादा प्रसंग थोडक्यात लिहा.

## खेळूया शब्दांशी.

**(अ) समान अर्थाचे जोडशब्द तयार करा.**

उदा., पालनपोषण

(१) दंगा – ☐  (४) धन – ☐

(२) कोड – ☐  (५) बाजार – ☐

(३) थट्टा – ☐

**(आ) गटात न बसणारा शब्द ओळखा व तो शब्द गटात का बसत नाही यामागील कारण सांगा.**

(१) मी, आपण, रत्ना, त्यांचे

(२) राहणे, वाचणे, गाणे, आम्ही

(३) तो, हा, सुंदर, आपण

(४) भव्य, सुंदर, विलोभनीय, करणे

**(इ) खाली दिलेल्या शब्दांचे तक्त्यात वर्गीकरण करा.**

गाव, गावे, देश, काम, शेला, सणंग, मुलगा, मूल, मुले, आई, यंत्र, रेल्वे, विश्व, शक्ती, भूमी, चित्र, हवा, पाणी, निसर्ग, गीत, भाषा.

| पुल्लिंग | स्त्रीलिंग | नपुंसकलिंग |
|---|---|---|
| | | |

**(ई) खालील शब्दसमूहांचा वाक्यांत उपयोग करा.**

गगनभेदी घोष करणे, रचनात्मक काम करणे, पोटापलीकडे पाहणे, कचाट्यात सापडणे.



## चर्चा करूया.

- **शाळेसंबंधी विद्यार्थ्यांची कर्तव्ये कोणती, याविषयी मित्रमैत्रिणींशी चर्चा करा.**
- **संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन करून चर्चा करा. त्याचा तुम्हांला कळलेला अर्थ वर्गात सांगा.**



## माझे वाचन

- 'प्रतिज्ञा' हे यदुनाथ थत्ते यांचे पुस्तक मिळवा व त्याचे वाचन करा.
- या पाठ्यपुस्तकातील 'जलदिंडी' हा पाठ वाचा व त्याचा या पाठाशी संबंध कसा जोडता येईल, ते सांगा.

**उपक्रम :** आपल्या कार्यातून देशावर आणि देशातील लोकांवर प्रेम करणाऱ्या तुमच्या परिसरातील पाच व्यक्तींची माहिती मिळवा. ती माहिती लिहून काढा व वर्गात वाचून दाखवा.

## आपण समजून घेऊया.

- **वाचा व उत्तरे लिहा.**

प्रमुख विद्यार्थी क्रमांक बक्षीस प्रथम पाहुणे दिले.

(अ) वरील शब्दसमूह वाक्य आहे काय? ☐

(आ) वरील शब्दसमूहातून अर्थबोध होतो का? ☐

(इ) अर्थबोध होण्यासाठी वाक्य कसे लिहावे लागेल ते लिहा. ____________________

जेव्हा आपण 'प्रमुख पाहुण्यांनी विद्यार्थ्याला प्रथम क्रमांकाचे बक्षीस दिले', अशी रचना करतो तेव्हाच ते अर्थपूर्ण वाक्य होते.

नामे व सर्वनामे यांचे वाक्यातील क्रियापदाशी किंवा इतर शब्दांशी येणारे संबंध ज्या विकारांनी दाखवले जातात, त्या विकारांना '**विभक्ती**' असे म्हणतात.

### विभक्तीची वैशिष्ट्ये

- नाम व सर्वनामांना प्रत्यय लागून विभक्तीची रूपे तयार होतात.
- ही रूपे क्रियापद व इतर शब्द यांच्यातील संबंधांशी निगडित असतात.

**लक्षात ठेवा :** (अ) नामाचे किंवा सर्वनामाचे विभक्तीचे रूप तयार करण्यासाठी जी अक्षरे जोडली जातात, त्यांना '**प्रत्यय**' असे म्हणतात.

(आ) विभक्तीचे प्रत्यय लागण्यापूर्वी नामाच्या किंवा सर्वनामाच्या मूळ रूपात जो बदल होतो, त्याला '**सामान्यरूप**' म्हणतात.

LZF85X

# ३. लाखाच्या ... कोटीच्या गप्पा

**वसंत जोशी** : कथाकार, कवी, विनोदी साहित्याचे लेखक. त्यांनी कथा आणि कवितांबरोबर लोकनाट्ये, बालनाट्ये आणि बालकुमार वाङ्‌मयाचेही लेखन केले आहे. त्यांच्या कथांचे तमिळ आणि कन्नड भाषेत अनुवाद झाले आहेत. त्यांनी लिहिलेल्या बिनबियांच्या गोष्टींचे संग्रह लोकप्रिय आहेत. बिनबियांच्या गोष्टीतील प्रसंग काल्पनिक असले तरी त्यामधील व्यक्ती मात्र खऱ्या आणि सुप्रसिद्ध आहेत. थोडी गंमत, थोडी करमणूक आणि निर्मळ विनोदनिर्मिती हा उद्देश डोळ्यांसमोर ठेवून या विनोदी गोष्टी लिहिल्या आहेत. त्यांचे या विनोदी गोष्टींच्या कथाकथनाचे कार्यक्रमही लोकप्रिय ठरले आहेत.

प्रस्तुत पाठात दोन सुप्रसिद्ध मराठी अभिनेते रेल्वेमध्ये इंजिन बिघाड झाल्यामुळे रेल्वे स्टेशनवर थांबतात. त्यानंतर त्यांच्यात लाखा...कोटींच्या गप्पा सुरू होतात; परंतु पाठाच्या शेवटी या सर्व गप्पांना वेगळीच कलाटणी मिळते आणि आपणाला हसू आवरत नाही. प्रस्तुत पाठ 'हास्यकल्लोळ-बिनबियांच्या गोष्टी' या संग्रहातून घेतला आहे.

इंजिनमध्ये बिघाड झाल्यामुळे नागपूर-दादर एक्सप्रेस इगतपुरी स्टेशनवर तीन तास थांबून राहिली. गाडीतले प्रवासी कंटाळून प्लॅटफॉर्मवर येरझारा घालू लागले. कुणी बुकस्टॉलवरची वर्तमानपत्रं घेऊन वाचत जागेवर आडवे झाले. दोन प्रवासी मात्र एका दगडी बाकावर जाऊन बसले आणि त्यांच्या गप्पा सुरू झाल्या. सुमारे एक तासभर गप्पा मारल्यानंतर ते दोघेही कंटाळले. त्यांनी चहा मागवला. चहा घेतल्यानंतर त्यांच्या गप्पा पुन्हा रंगल्या. ते एवढ्या मोठ्यानं हसत आणि बोलत होते, की त्यांचा शब्द नि शब्द दूरवर ऐकू जात होता. त्या दोन प्रवाशांमध्ये एक म्हातारा होता आणि दुसरा तरुण!

म्हातारा त्या तरुणाला म्हणाला, ''राजा, तुझं इंग्लंडला जाणं पक्कं झालं ना?''

''असं काय काका मला विचारता? मी पासपोर्ट मिळवला, व्हिसा काढला, नवीन कपडे टेलरने परवाच शिवून दिले. चार सूट आणि इतर नेहमीचे कपडे घेतले आहेत. तुम्ही दिलेले घड्याळ, तर मी आताच वापरायला काढलं आहे.''

''राजा, ते घड्याळ भारी किमतीचं आहे. दहा हजार मोजलेत. पिटस्‌बर्गला ते घड्याळ खास तुझ्यासाठी घेतलं होतं. विमान प्रवासासाठी तुला पन्नास हजार रुपये पुरतील ना? मुंबईला गेल्यानंतर मी तत्काळ तेवढी रक्कम तुला देईन! पण बेटा सांभाळून जायचं बरं का!''

''पण काका, तुमच्या पन्नास हजारांत इंग्लंडला मी तीन वर्षे कशी काढणार? बॅरिस्टर कसा होणार? किमान पंधरा लाख किरकोळ खर्चासाठी लागतील. कोट्यधीपती काकाचा हा पुतण्या कुठल्यातरी घाणेरड्या हॉटेलात राहिलेला तुम्हांला चालेल का?''



''नको... नको... तू एक स्वतंत्र बंगलाच घे. तुझ्या अभ्यासाला निवांत जागा हवी.''

''त्यासाठी काका वर्षाला किमान पंधरा लाख याप्रमाणे तीन वर्षांसाठी पंचेचाळीस लाख लागतील.''

''त्याची सोय मी आता या क्षणालाही करू शकतो. बॅगेत शेअर्स विकल्याची रक्कम नगद ऐंशी लाख आहे. आत्ताच देऊ का?''

''नको. गाडीत बसल्यावर द्या! पण काका एक, मोटारही मला लागेल. रोज मला कॉलेजात गाडीनंच जावं लागणार, नाही का? मी चालत कसा जाणार? वीस लाख तरी त्यासाठी लागतील!''

''ती रक्कमही आता याच बॅगेत आहे. बँकेतून आजच तेवढी रक्कम काढली आहे!''

''काका, मला सारा युरोप बघायचा आहे. प्रत्येक देशात किमान एक वर्षभर तरी राहावं लागेल. त्यासाठीच निम्मा खर्च मी करणार आहे. आईचे चाळीस तोळ्यांचे सोन्याचे दागिने तिनं मला परवाच दिले. ते आहेत आता या माझ्या बॅगेत!''

''राजा, तू अजिबात काळजी करू नकोस. तू बॅरिस्टर होऊन भारतात परत ये. त्यासाठी मी वाटेल तेवढा पैसा खर्च करायला तयार आहे. आपल्याकडील चहाचे दोन मळे आणि सफरचंदाचा एक मळा विकून जे १० कोटी आले तेपण या माझ्या बॅगेतच वरच्या कप्प्यात ठेवले आहेत.''

त्यांचं असं बोलणं चालू असतानाच गाडी सुटणार असल्याची घोषणा झाली. ते दोन प्रवासी आपल्या डब्यात शिरले. खिडकीजवळच्या समोरासमोरच्या सीटवर बसले. पाच-दहा मिनिटांतच ते पेंगायला लागले आणि चक्क घोरायला लागले.

केव्हातरी कल्याण स्टेशन आलं. त्या दोन प्रवाशांपैकी तरुण प्रवासी जागा झाला. त्यानं आपल्या सीटखाली आपली बॅग आहे की नाही हे पाहिलं. बापरे! त्याची बॅग तिथं नव्हती. त्यानं त्या म्हाताऱ्या प्रवाशाला उठवलं, ''ए, माझी बॅग कोणीतरी पळवली. तुझीपण दिसत नाही.'' म्हातारा प्रवासीपण दचकून जागा झाला. ''आता काय करायचं?'' दोघंही किंचाळले.

समोरच्या बाकड्यावर बसलेला एक म्हातारा प्रवासी त्यांना म्हणाला, ''तुमच्यासारख्या लखपती माणसांनी असं थ्री टायरमधून प्रवास करणंच योग्य नाही. इगतपुरी स्टेशनवर तुम्ही गप्पा मारताना तुमच्या बॅगांमधून किती रकमा आहेत हे उघड उघड मोठ्यानं बोलत होता, तर...ते कुणीतरी भामट्यानं ऐकलं असणार, त्यानंच तुमच्या बॅगा पळवल्या. आता बसा हरी हरी करत. तुमची जाम नुकसानी झाली आहे. कल्याण रेल्वे पोलिसांकडे तुमच्या बॅगांची चोरी झाल्याची तक्रार तरी आता करा. बॅगा अजून सापडतील! आता तुमच्याकडे मुंबईला जाईपर्यंतच्या खर्चासाठी तरी पैसे आहेत ना, की मी देऊ?''

''नको...नको...पैशाची गरज नाही. माझ्याकडे तीन-चार रुपये आहेत. त्यात आमचा चहाचा खर्च भागेल.'' तो तरुण प्रवासी म्हणाला.

''पण आपल्या बॅगा गेल्यामुळे आता आपली खरंच पंचाईत होणार. त्यात माझ्या मिश्या होत्या. आता शिवाजी मंदिरात गेल्या गेल्या नव्या मिश्या घ्याव्या लागतील. म्हणजे मला पुन्हा दहा रुपये दंड बसणार!'' तो म्हातारा प्रवासी म्हणाला.

''म्हणजे तुम्ही आहात तरी कोण? तुम्हांला नव्या मिश्या कशाला लागतात? कोट्यवधीच्या रकमा असलेल्या बॅगा चोरीला गेल्या तरी तुम्ही इतके शांत कसे?'' समोरच्या बाकड्यावरचा प्रवासी बोलला.

तो म्हातारा आणि तरुण प्रवासी खूप मोठमोठ्यानं हसले. तरुण प्रवासी म्हणाला, ''अहो, आम्ही नाटकवाले. मी राजा गोसावी आणि हे शरद तळवलकर... आमच्या बॅगांमध्ये आमचं फक्त मेकअपचं सामान होतं. बाकी काही नव्हतं.''

''मग इगतपुरी स्टेशनवरच्या तुमच्या लाखाच्या... कोटीच्या गप्पांचं काय?''

''ते तुम्ही खरंच मानलंत की काय? अहो, आम्ही केवळ वेळ घालवण्यासाठी आमच्या नव्या नाटकाची रिहर्सल करत होतो.''



## स्वाध्याय

### प्र. १. आकृत्या पूर्ण करा.

(अ) गाडीतल्या प्रवाशांकडून प्लॅटफॉर्मवर झालेल्या कृती

(आ) इंग्लंडला जाण्यासाठी राजाने केलेली तयारी

### प्र. २. योग्य विधान शोधा.

(अ) (१) लेखकाची नागपूर-दादर पॅसेंजर गाडी होती.
(२) म्हातारा व तरुण करोडपती होते.
(३) तरुण वकिली करायला परदेशात जात होता.
(४) दोन प्रवाशांमध्ये एक म्हातारा आणि दुसरा तरुण!

(आ) (१) म्हातारा व तरुण दोघांच्या बॅगेत खूप पैसे होते.
(२) म्हातारा व तरुण दोघेही कलाकार होते.
(३) म्हातारा व तरुण एकमेकांचे नातेवाईक होते.
(४) म्हातारा व तरुण बेजबाबदार होते.

### प्र. ३. तुमच्या शब्दांत लिहा.

(अ) समोरच्या बाकावरच्या प्रवाशाने केलेल्या वक्तव्याबाबत तुमचे मत पाठाधारे लिहा.
(आ) पाठाचा शेवट वाचण्यापूर्वी तरुण व म्हातारा यांच्याविषयी तुमच्या मनात कोणते विचार आले ते लिहा.

## खेळूया शब्दांशी.

### (अ) खालील वाक्यांचा प्रकार ओळखून लिहा.

(१) ''राजा, तुझं इंग्लंडला जाणं पक्कं झालं ना?''
(२) ''तुझ्या अभ्यासाला निवांत जागा हवी.''
(३) ''तू बॅरिस्टर होऊन भारतात परत ये.''
(४) ''म्हणजे मला पुन्हा दहा रुपये दंड बसणार!''

**(आ) खालील तक्ता पूर्ण करा.**

| शब्द | मूळ शब्द | सामान्यरूप |
|---|---|---|
| (१) भावाला | | |
| (२) शाळेतून | | |
| (३) पुस्तकांशी | | |
| (४) फुलाचा | | |
| (५) आईने | | |

**(इ) खालील शब्दसमूहांचा वाक्यांत उपयोग करा.**

(१) गप्पा रंगणे.

(२) पंचाईत होणे.

**(ई) खालील वाक्यांतील अधोरेखित शब्दांचे वचन बदलून वाक्ये पुन्हा लिहा.**

(१) त्यांचा खेळातील दम संपत आला.

(२) कॅप्टनने खेळाडूला इशारा दिला.

(३) क्रीडांगणावर अंतिम सामना पाहण्यासाठी गर्दी जमली होती.



**चर्चा करूया.**

- **'राजाचे परदेशातील खर्चाचे अंदाजपत्रक' या विषयावर वर्गातील मित्र-मैत्रिणींशी चर्चा करा.**

**शोध घेऊया.**



- **विनोदी साहित्य लिहिणाऱ्या साहित्यिकांची नावे व त्यांचे साहित्य यांचा शोध आंतरजालाच्या साहाय्याने घ्या. त्याची यादी तयार करा.**

**उपक्रम :**

(१) पुढील महिन्यात होणाऱ्या तुमच्या घरातील खर्चाविषयी आईशी गप्पा मारा व खर्चाचे अंदाजपत्रक तयार करा.

(२) या पाठाचे नाट्यरूपांतर करून वर्गात सादर करा.

## आपण समजून घेऊया.

### विभक्तीचे प्रत्यय

- **खालील तक्ता वाचा.**

'घर' या नामाची विभक्तीची रूपे पाहा.

| विभक्ती | एकवचन | | अनेकवचन | |
|---|---|---|---|---|
| | प्रत्यय | शब्दांची रूपे | प्रत्यय | शब्दांची रूपे |
| **प्रथमा** | --- | घर | --- | घरे |
| **द्वितीया** | स, ला, ते | घरास, घराला | स, ला, ना, ते | घरांस, घरांना |
| **तृतीया** | ने, ए, शी | घराने, घराशी | नी, शी, ई, ही | घरांनी, घरांशी |
| **चतुर्थी** | स, ला, ते | घरास, घराला | स, ला, ना, ते | घरांस, घरांना |
| **पंचमी** | ऊन, हून | घराहून | ऊन, हून | घरांहून |
| **षष्ठी** | चा, ची, चे | घराचा, घराची, घराचे | चे, च्या, ची | घरांचे, घरांच्या, घरांची |
| **सप्तमी** | त, ई, आ | घरात | त, ई, आ | घरांत |
| **संबोधन** | --- | घरा | नो | घरांनो |

**लक्षात ठेवा :** (अ) प्रथमा विभक्तीला प्रत्यय नसतो.

(आ) यांतील काही प्रत्ययांचा उपयोग केवळ पद्यात होतो. उदा., चतुर्थी एकवचन 'ते', सप्तमी एकवचन 'आ'.

(इ) अनेकवचनी प्रत्यय लावताना प्रत्ययापूर्वीच्या अक्षरावर अनुस्वार येतो.

(ई) नामाप्रमाणे सर्वनामांनाही प्रत्यय लावून रूपे तयार होतात.

- **खालील तक्ता पूर्ण करा.**

| शब्द | मूळ शब्द | सामान्यरूप | विभक्ती प्रत्यय | विभक्तीचे नाव |
|---|---|---|---|---|
| मुंबईला | | | | |
| सोन्याचे | | | | |
| भारतात | | | | |
| गाडीने | | | | |

LZP47K

# ४. नव्या युगाचे गाणे

**वि. भा. नेमाडे :** कवी, लेखक. त्यांच्या विविध विषयांवरील काव्यरचना प्रसिद्‌ध आहेत. त्यांच्या काव्यातून बदलत्या काळातील मानवी जीवनावरील मार्मिक भाष्य आढळून येते.

अतिशय वेगाने घडणाऱ्या वैज्ञानिक प्रगतीमुळे मानवी जीवनात मोठी क्रांती घडून येत आहे. विज्ञानाच्या पाठिंब्यामुळे शून्यातून नवे विश्व उभारण्याची जिद्‌द मानवामध्ये निर्माण होत आहे, मानवी जीवनातील दैन्य दूर होत आहे, नव्या प्रगतीच्या आशा पल्लवीत होत आहेत, हे या कवितेतून कवीने स्पष्ट केले आहे. प्रस्तुत कविता ही 'किशोर', जानेवारी १९९८ या मासिकातून घेतली आहे.

- ऐका. वाचा. म्हणा.



अणूरेणूतुनि शब्द प्रगटति... 'चला चला पुढती'
विज्ञानाचा प्रकाश आला घडे दिव्य क्रांती
नवयुग आले प्रभा तयाची पहा दिसत दिव्य
शून्यामधुनी विश्व उभारू जिद्‌द असे भव्य
हृदयांतरिच्या अशांततेचा वणवा झणि विझला
उत्कर्षाचा अन् प्रगतीचा मार्ग नवा दिसला
नवी चेतना अंतरि स्फुरली दुबळेपण गेले
नैराश्याच्या होळीमधुनी तेज नवे आले
मानवतेच्या मार्गावरती उठती जरि ज्वाला
अमरत्वाची फुले वेचुनी गुंफूया माला
नको खिन्नता... नको दीनता
नवसूर्य पहा उगवतो
उत्कर्ष पहा झळकतो
संघर्ष पहा बहरतो
नसानसातुन जोश उसळतो नव आशा चित्ती
अणूरेणूतुनि शब्द प्रगटति... 'चला चला पुढती'



## स्वाध्याय

**प्र. १. हे केव्हा घडेल ते लिहा.**

(अ) दिव्य क्रांती-

(आ) शून्यामधून विश्व उभारेल-

(इ) दुबळेपणाचा शेवट-

**प्र. २. खालील चौकटींतील घटनांचा पद्य पाठाधारे योग्य क्रम लावा.**

| | | |
|---|---|---|
| उत्कर्षाचा अन् प्रगतीचा मार्ग दिसला. | विज्ञानाचा प्रकाश आला. | क्रांती घडली. |
| हृदयातील अशांततेचा वणवा विझला. | नैराश्य नष्ट झाले. | |

**प्र. ३. खालील अर्थांच्या ओळी शोधा.**

(अ) माणसाच्या अंगी चिकाटी असली तर तो काहीही साध्य करू शकतो.

(आ) माणसाच्या अंगात जोश आणि नवीन आशा निर्माण होतात.

**प्र. ४. तक्ता पूर्ण करा.**

| कवीला नको असणाऱ्या गोष्टी | विज्ञानामुळे प्राप्त होणाऱ्या गोष्टी |
|---|---|
| (१) | (१) |
| (२) | (२) |
| (३) | (३) |

**प्र. ५. तुमच्या शब्दांत स्पष्ट करा.**

(अ) 'नवसूर्य पहा उगवतो', 'संघर्ष पहा बहरतो' या शब्दसमूहांतील कल्पना सोदाहरण स्पष्ट करा.

(आ) कवितेतून व्यक्त होणारा कवीचा आशावाद स्पष्ट करा.

## खेळूया शब्दांशी.

**(अ) कवितेतील यमक जुळणाऱ्या शब्दांच्या जोड्या शोधा व लिहा.**

**(आ) खालील शब्दांचे समानार्थी शब्द कवितेतून शोधून लिहा.**

(१) उजेड-

(२) तेज-

(३) रस्ता-

(४) उत्साह-

**उपक्रम :**

(अ) विज्ञानविषयक आणखी काही कविता मिळवून वाचा व त्यांचा संग्रह करा.

(आ) वैज्ञानिक प्रगतीमुळे घरात आलेल्या व जीवन सुलभ करणाऱ्या वस्तूंची यादी करा.

**प्रकल्प :** विज्ञानातील प्रगतीमुळे विविध क्षेत्रांत नवनवीन साधनांची भर पडली आहे. त्यांचा शोध घ्या व या क्षेत्रांतील साधनांची खालील तक्त्यात नावे लिहा. तुम्ही लिहिलेल्या साधनांची माहिती मिळवा.

| क्षेत्र | या क्षेत्रांतील नवनवीन साधने |
|---|---|
| (१) बांधकाम- | |
| (२) शिक्षण- | |
| (३) वैद्यकीय- | |
| (४) हवामानशास्त्र- | |
| (५) कृषी- | |
| (६) मनोरंजन- | |
| (७) खगोलशास्त्र- | |
| (८) संरक्षणशास्त्र- | |



## सारे हसूया.

**संजू** : मोहन, हे बोटावर आकडे का लिहिलेस?

**मोहन** : अरे माझी आजी म्हणते, ''नुसत्या बोटावर आकडेमोड करता आली पाहिजे.''

**अजय** : थंडी वाजते तेव्हा तू काय करतोस?

**विजय** : मी मेणबत्तीजवळ बसतो.

**अजय** : आणि खूप थंडी वाजली तर?

**विजय** : मेणबत्ती पेटवतो.

LZXZ98

## मैत्री तंत्रज्ञानाशी

(इयत्ता आठवीतील मीनल व इयत्ता दहावीतील तेजस या दोन बहीणभावंडांतील हा संवाद.)



**तेजस :** मीनल, ए मीनल. अगं, आता आपली शाळा लवकरच सुरू होणार आहे. आपण यावर्षी आणलेली नवीन पुस्तके वाचायला हवीत. तू या वर्षीची नवीन पुस्तके पाहिलीस कां?

**मीनल :** हो दादा, अरे मी पुस्तके वाचली नाहीत; पण बघितली आहेत.

**तेजस :** आवडली का तुला तुझी पुस्तके?

**मीनल :** अरे, मला तर माझी पुस्तके खूपच आवडली. मागील वर्षापेक्षाही या वर्षीची पुस्तके खूपच सुरेख आहेत. नव्या कोऱ्या पुस्तकांचा सुगंध, त्यातील आकर्षक चित्रे, मांडणी मला खूपच आवडली.

**तेजस :** अगं, मला पण माझी पुस्तके खूप आवडली आहेत. अभ्यास करताना नक्कीच मजा येणार आहे.

**मीनल :** अरे, पण नवीन पुस्तकांत सर्व धड्यांखाली चौकटीत काहीतरी दिले आहे. ते काय आहे मला कळलंच नाही.

**तेजस :** दाखव बरं मला काय आहे ते!

**मीनल :** हे बघ. (पुस्तकातील पाठाखालील क्यू. आर. कोड दाखवते.)

**तेजस :** अगं, मीनल हा तर क्यू. आर. कोड आहे.

**मीनल :** क्यू. आर. कोड म्हणजे काय रे दादा? पूर्वीच्या पुस्तकांत तर असं काही दिलं जात नव्हतं!

**तेजस :** अगं, क्यू. आर. कोड म्हणजे क्विक रिस्पॉन्स कोड (Quick Response Code). अगं मोबाईलवर क्यू. आर. कोड स्कॅनर हे ॲप्लिकेशन सॉफ्टवेअर डाऊनलोड करावे लागते.या सॉफ्टवेअरद्‌वारे हा क्यू. आर. कोड स्कॅन केल्यानंतर आपल्याला पाठ, कविता, इतर घटक या संबंधीच्या काही लिंक्स दिसतात. त्याद्‌वारा ऑडिओ, व्हिडिओ तसेच इतर पूरक साहित्य आपल्याला पहायला मिळते. आपण ते ऐकू शकतो, पाहू शकतो आणि वाचूही शकतो. अभ्यासासाठी त्याचा आपल्याला पुन्हा पुन्हा वापरही करता येऊ शकतो.

**मीनल :** अरे, हे तर खूपच छान आहे! आपल्या पाठ्यपुस्तकातील घटकांसंबंधीची माहिती खूपच कमी वेळात उपलब्ध होत असल्यामुळे विविध प्रकारचे साहित्य व माहिती शोधण्यासाठीचा आपला वेळही वाचणार आहे. चल दादा, आपण लगेच आपल्या मोबाईलवर हे ॲप डाऊनलोड करून घेऊया आणि अधिकाधिक माहिती मिळवूया.

# ५. सुरांची जादुगिरी

**डॉ. द. ता. भोसले** (१९३५) : प्रसिद्ध लेखक व अभ्यासू वक्ते. त्यांचे कथा, कादंबरी, समीक्षा, ललित असे विपुल लेखन प्रसिद्ध आहे. ग्रामीण जीवन, शेतकरी, शेती, शेतमजूर, ग्रामीण संस्कृती, तेथील समस्या, ताणतणाव, शेतकऱ्यांचे प्रश्न हे त्यांच्या विविध कथांमधून प्रतिबिंबित होतात. त्याचबरोबर ग्रामजीवनातील सौंदर्य, माणसामाणसातील जिव्हाळा, निसर्ग या गोष्टी टिपणारे ललित लेखनही त्यांनी केले आहे. 'इथे फुलांना मरण जन्मता', 'खसखशीचा मळा', 'जन्म', 'पाऊस' हे कथासंग्रह; 'परिघावरची माणसं', 'पार आणि शिवार' हे ललित लेखन; 'समीक्षा आणि संवाद', 'साहित्य : आस्वाद आणि अनुभव' ही समीक्षात्मक पुस्तके; 'शिक्षणातील अधिक-उणे', 'संस्कृतीच्या पाऊलखुणा' व 'चावडीवरचा दिवा' ही अन्य पुस्तके प्रसिद्ध आहेत. त्यांना 'महर्षी वि. रा. शिंदे पुरस्कार', 'भैरू रतन दमाणी पुरस्कार' यांसारख्या एकूण ५२ हून अधिक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आलेले आहे.

ग्रामजीवनाचा अविभाज्य घटक म्हणजे तिथल्या संस्कृतीशी एकरूप झालेले विविध आवाज. तेथील निसर्ग सान्निध्यामुळे निसर्गातील पशुपक्षी, झाडे, ग्रामीण जीवनातील विविध कामे करताना होणारे विविध आवाज, हे जगण्यात आनंद निर्माण करत असतात. अशा विविध आवाजांचे सुंदर वर्णन या पाठात लेखकाने केलेले आहे. प्रस्तुत पाठ हा 'चावडीवरचा दिवा' या ललितलेख संग्रहातून घेतला आहे.

निसर्गाच्या लडिवाळ मांडीवर विसावलेल्या खेड्यांचा जीवनक्रम सौंदर्याने माखलेला असतो. तसाच नानाविध सुरांच्या लकेरींनी मोहरून गेलेला असतो. त्यामुळे अनेक खेडी नेहमी ताजी व टवटवीत रानफुलांसारखी असतात. खेड्यातला दिवस हा जणू पायांत आवाजांचे अलंकार घालून जन्माला येत असतो.

अगदी पहाटेलाही अजून पुरती जाग आलेली नसते, तेव्हा खेड्यामध्ये टोपलीखाली डालून ठेवलेल्या कोंबड्याला मात्र हमखास जाग आलेली असते. रात्रीच्या तीन-साडेतीनपासूनच तो आपल्या कुर्रेबाज अन् नखरेल तानांनी आसमंत भारून टाकायला प्रारंभ करत असतो. हळूहळू या तानांची संख्या वाढत जाते. सादाला प्रतिसाद दिला जातो. एका वस्तीवरच्या कोंबड्याने बांग दिली, की त्या भागातल्या साऱ्या कोंबड्यांना कंठ फुटतो आणि मग एकच कोलाहल सुरू होतो. एका विशिष्ट लयीत अन् ठेक्यात पहाटेला घातलेली ही साद अंथरुणावर पडल्या-



पडल्या मनात मुरवायला मोठी छान वाटते. मनातल्या मनात आपणही त्याला नि:शब्द मनाने साद घालत असतो.


त्यानंतर संगीताचे दुसरे वाद्य हळूहळू वाजायला लागते, ते म्हणजे घरातले दळणाचे जाते. घराघरांतल्या बायका कोंबड्याच्या बांगेबरोबर जाग्या होऊन चिमणीच्या प्रकाशात गच्च अंधाराला पातळ करत, झोपलेल्या जात्याला गायला लावतात. त्या जात्याचा मंद, लयबद्ध, प्रौढ अन् दमदार आवाज छोट्या-मोठ्या ताना व हरकती घेत आसमंतात भरून जातो.



घास घातल्यावर जात्यातून निघणारा भरडा आवाज, पीठ होताना येणारा सौम्य सूर आणि गळा मोकळा झाल्यावर जात्याने काढलेली प्रसन्न व कोमल सुरावट आईच्या ऊबदार अन् मंदपणे हालणाऱ्या मांडीवर मस्तक ठेवून ऐकता ऐकता आपण एका वेगळ्याच वातावरणात जातो. पापण्या जड झालेल्या असतात. अर्धवट जाग आलेली असते. अंधाराला पिवळ्या प्रकाशाचा शिडकावा लाभलेला असल्याने घरातल्या साऱ्या वस्तूंना स्वप्निल रूप प्राप्त झालेले असते. त्या ओळखीच्या असूनही अनोळखी वाटत असतात अन् त्यात जात्याचे संगीत साऱ्या अंगावर,

जात्यातून पीठ भुरुभुरु पडावे तसे, सांडत असते. या संगीताला आईच्या गळ्यातल्या गोड ओव्यांनी साथ दिलेली असते. त्यातून तिच्या मनातली लपून बसलेली स्वप्ने प्रकट होत असतात अन् त्यामुळे आपण आपले उरत नाही. मंदपणे हलणाऱ्या पापण्या केव्हा मिटतात हे समजत नाही. या संगीताला आईच्या अपार कष्टाचा आणि अपार मायेचा मुलायम स्पर्श लाभलेला असतो. त्याची खुमारी केवळ शब्दातीत.

थोड्या वेळाने दिशांना आकार येत जातो. अवतीभवतीच्या वस्तूंना त्यांचे असलेले रूप लाभत जाते. त्या वेळी मात्र गाऊन थकलेले कोंबडे मिटल्या चोचीने आपल्या सुटकेची वाट पाहत असतानाच चिमण्यांना कंठ फुटतो. कावळ्यांचे भरभरीत आवाजही पानाफांद्यांतून सांडत असतात. व्हायोलिनवर हलक्या हाताने तारा छेडाव्यात तशी चिमण्यांची नाजूक चिवचिव सुरू झालेली असते. त्या घराच्या भिंतीवर, अंगणात, एखाद्या झाडाच्या फांदीवर बसून सकाळची प्रार्थना म्हणतात.



मध्येच झाडाच्या ढोलीतून हिरव्या रेघोट्या मारत एखादा पोपट या संगीतात आपल्या सुराची भर घालत असतो. सकाळचे हे संगीत वाद्यवृंदासारखे वाटते. परस्परांना पूरक असणारे अन् तरीही भिन्नत्व असणारे हे नानाविध आवाज परस्परांत इतके कालवले जातात, की त्यांची एक वेगळीच मैफिल निर्माण होते. याच वेळेला एखाद्याने पार्श्वसंगीत द्यावे, तसे काही आवाज त्यामध्ये मिसळत जातात. त्यात एखाद्या कंटाळलेल्या वासराचा दुधासाठी आसुसलेला टाहो असतो, बकरीची भरभरीत झांज मध्येच वाजते. गोठ्यात बांधलेल्या जनावरांच्या गळ्यातल्या घंटा काचेच्या नाजूक बांगड्यांचा आवाज व्हावा तशा वाजत असतात. त्यातच मग कासेखाली बसलेल्या बाईच्या गुडघ्यातले दुधाचे भांडे एकतारीचा सूर छेडत असते. धारेच्या या संगीतातही एक जादू असते. मोकळ्या भांड्यात सांडणाऱ्या धारेचा आवाज गाण्याला प्रारंभ करताना निघणाऱ्या सुरासारखा असतो. मग भांडे जसजसे भरत जाते, तसतसा आवाजात लक्षणीय फरक पडत जातो. गळ्याशी दूध आल्यावर मग याच धारेचा आवाज गंभीर अन् वजनदार बनतो. त्या वेळी पलीकडच्या विहिरीवरील चाक वाजत असते. एखादी बाई दोराला घागर बांधून ती ओढत असते. त्या वेळी किरट्या आवाजात तक्रार करणारे ते चाक सहज कुणाचेही लक्ष वेधून घेत असते. कुठेतरी एखादी मोटही त्या सुरात आपला सूर मिसळत असते. तो कुईकुई करणारा आवाज एखाद्या अशक्त पोराने किरकिरावे तसा वाटतो. मात्र या आवाजाकडे आपले लक्ष जातेच जाते.

आसमंतात सुरांचे, शब्दांचे आणि आवाजांचे संमेलनच भरलेले असते. गावाला जाग आलेली असते. शाळेतली प्रार्थना मंदपणे आपल्या कानांवर येत असते. जनावरांचे हंबरणे मध्येच वातावरणाला भारभूत करते. लहान मुलांचा आवाज वातावरणाला छेदून अवकाशात जात असतो. घरातल्या भांड्यांचे आवाज, धुण्याचा आवाज, भाकरी थापण्याचा आवाज, काटक्या मोडण्याचा आवाज, कोरड्याशाला दिलेल्या फोडणीचा तड्तड् करणारा आवाज, ओठ मिटून रवीचे तोंड दाबून ठेवणाऱ्या ताक घुसळणाऱ्या माठाचा आवाज, त्याबरोबर स्स् स्स् असा आवाज काढणाऱ्या गौळणीचा आवाज, नानाविध पशुपक्ष्यांचे आवाज, दूर अंतरावरून घुमतघुमत येणारा झऱ्याचा आवाज, ओढ्याची खळखळ, पानांची सळसळ, मध्येच फाटकन येणारा चाबकाचा आवाज, रस्त्यावर अकारण भुंकणाऱ्या कुत्र्यांचा आवाज, किडामुंगी टिपण्यासाठी बाहेर पडणाऱ्या कोंबड्यांचा कॉक्-कॉक् असा ठेका धरणारा आवाज, देवळातल्या नानाविध

आकारांच्या घंटांचा आवाज, नवजात कोकराचा मधल्या पट्टीचा आवाज, स्वयंपाक करणाऱ्या आईसमोर आठवून आठवून रडत बसणाऱ्या लेकराचा आवाज, जनावरांच्या हंबरण्याचा, त्यांना गायरानात नेताना येणारा शेकडो खुरांचा आवाज, घरकामात दंग झालेल्या एखाद्या सुनेच्या बांगड्यांचा आवाज! किती म्हणून सांगावेत?

आपण कानांत प्राण आणून ऐकल्यावर आवाजांची दुनिया आपल्याभोवती फेर धरू लागते. हे सारे आवाज एकमेकांत कालवलेले असतात. वातावरणाला जिवंतपणा आणतात. आपल्या मनांना लसलसत्या सुरांचे पान आपोआप अंकुरलेले असते. आपले मनही मग आपोआप या नानाविध सुरांच्या संमेलनात तरंगत जाते.



## स्वाध्याय

**प्र. १. चौकटी पूर्ण करा.**

(अ) **गाणाऱ्या जात्याच्या आवाजाची वैशिष्ट्ये**
- ☐
- ☐
- ☐
- ☐

(आ) **आसमंतात भरलेले संमेलन**
- ☐
- ☐
- ☐

**प्र. २. एक किंवा दोन शब्दांत उत्तरे लिहा.**

(अ) खेडे जिथे विसावते ते ठिकाण–

(आ) खेड्याला दिलेली उपमा–

(इ) लेखकाने वर्णिलेले संगीताचे दुसरे वाद्य–

**प्र. ३. का ते लिहा.**

(अ) घरातल्या वस्तूंना स्वप्निल रूप प्राप्त होते, कारण ......

(आ) कंटाळलेले वासरू टाहो फोडते, कारण ......

**प्र. ४. खालील वाक्यांचा तुम्हांला समजलेला अर्थ लिहा.**

(अ) पहाटेला पुरती जाग आली नव्हती.

(आ) थोड्या वेळाने दिशांना आकार आला.

(इ) अंधाराला पिवळ्या प्रकाशाचा शिडकावा लागला.

**प्र. ५. योग्य जोड्या लावा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (१) चिमण्यांची नाजूक चिवचिव म्हणजे जणू | (अ) या संगीतात आपल्या सुरांनी भर घालतो. |
| (२) सकाळचे हे संगीत | (आ) काचेच्या नाजूक बांगड्यांचा आवाज. |
| (३) एखादा पोपट | (इ) ठेका धरणारा आवाज. |
| (४) गोठ्यात बांधलेल्या जनावरांच्या गळ्यातल्या घंटा म्हणजे | (ई) व्हायोलिनवर हलक्या हाताने तारा छेडाव्यात. |
| (५) कोंबड्यांचा कॉक् – कॉक् असा | (उ) वाद्यवृंदासारखे वाटते. |

**प्र. ६. 'आवाजाची सोबत' ही संकल्पना तुमच्या शब्दांत सांगा .**

**प्र. ७. दैनंदिन जीवनात सकाळच्या वेळी तुमच्या कानावर पडणाऱ्या आवाजांचे वर्गीकरण करा.**

| ऐकावेसे वाटणारे आवाज | त्रासदायक वाटणारे आवाज |
| --- | --- |
| | |

**प्र. ८. 'भाषेतील सौंदर्य' या दृष्टीने पाठातील वाक्ये शोधून लिहा.**

उदा., निसर्गाच्या लडिवाळ मांडीवर विसावलेल्या खेड्यांचा जीवनक्रम सौंदर्याने माखलेला असतो.

## खेळूया शब्दांशी.

**(अ) पाठाधारे विशेष्य–विशेषणांच्या जोड्या लावा.**

टाहो   मुलायम   लडिवाळ   तान

स्पर्श   मांडी   झांज   आवाज

आसुसलेला   किरटा   भरभरीत   कुर्रेबाज

| विशेषण | विशेष्य |
| --- | --- |
| | |

**(आ) तक्ता पूर्ण करा.**

| शब्द | सामान्यरूप | विभक्ती प्रत्यय |
| --- | --- | --- |
| सुराने | | |
| सुरात | | |
| सुराचे | | |
| सुराला | | |
| सुराशी | | |



## चर्चा करूया.

- **विशिष्ट आवाज व त्या संदर्भातील तुमच्या आठवणी मित्रमैत्रिणींना सांगा.**

**उपक्रम :**

(१) पाठात वर्णन केलेली ग्रामजीवनातील कोणकोणती दृश्ये सध्याच्या काळात तुमच्या परिसरात तुम्हांला दिसत नाहीत त्याची यादी करा. वर्गात वाचन करा.

(२) पाठात आलेले आवाज क्रमाने लिहा व वाचून दाखवा.

## आपण समजून घेऊया.

- **खालील वाक्य वाचून उत्तरे लिहा.**

मी पत्र लिहितो.

(अ) लिहिणारा तो कोण → [ ] कर्ता

(आ) लिहिले जाणारे ते काय → [ ] कर्म

(इ) वाक्यातील क्रिया कोणती → [ ] क्रियापद

वाक्यात कर्त्याला किंवा कर्माला प्राधान्य दिल्यामुळे क्रियापदाचे रूप त्याच्याप्रमाणे बदलत असते. वाक्यातील कर्ता ←→ क्रियापद, कर्म ←→ क्रियापद या संबंधाला '**प्रयोग**' असे म्हणतात.

**प्रयोगाचे मुख्य तीन प्रकार आहेत.**

**(१) कर्तरी प्रयोग** **(२) कर्मणी प्रयोग** **(३) भावे प्रयोग**

**आता आपण प्रयोगांचे प्रकार सविस्तर अभ्यासूया.**

### (१) कर्तरी प्रयोग

- **वाक्याच्या शेवटी 'येणे' या क्रियापदाचे योग्य रूप वापरून वाक्ये पुन्हा लिहा.**

(१) मी शाळेतून आत्ताच................. (येणे)

(२) ती शाळेतून आत्ताच................. (येणे)

(३) रवी शाळेतून आत्ताच................. (येणे)

(४) विद्यार्थी शाळेतून आत्ताच................. (येणे)

जेव्हा कोणत्याही वाक्यात कर्त्याच्या लिंग, वचन व पुरुषानुसार क्रियापदाचे रूप बदलते, तेव्हा त्यास '**कर्तरी प्रयोग**' असे म्हणतात.

**कर्तरी प्रयोगाची वैशिष्ट्ये**

- कर्ता प्रथमा विभक्तीत असतो.
- कर्म असल्यास ते प्रथमा किंवा द्वितीया विभक्तीत असते.
- वाक्यातील क्रियापद कर्त्याच्या लिंग, वचन व पुरूष यानुसार बदलते.

उदा., खालील वाक्यांमध्ये 'जाणे' हे क्रियापद कर्त्याप्रमाणे बदललेले दिसते.

(अ) तो शाळेत जातो.

(आ) ती शाळेत जाते.

(इ) ते शाळेत जातात.

(ई) तू शाळेत जातोस.

- **कंसातील क्रियापदाचे योग्य रूप वापरून वाक्ये पूर्ण करा.**

(१) मुली क्रिकेट ................. . (खेळणे)

(२) तुम्ही क्रिकेट ................. . (खेळणे)

(३) आम्ही क्रिकेट ................. . (खेळणे)

(४) जॉन क्रिकेट ................. . (खेळणे)

(५) समीरा क्रिकेट ................. . (खेळणे)

## पत्रलेखन

पत्र हे आपल्या मनातले भाव/विचार दुसऱ्यापर्यंत लिखित स्वरूपात पोहोचवायचे उत्तम साधन आहे.

मागील इयत्तांमध्ये तुम्ही 'पत्रलेखन' या घटकाचा अभ्यास केला आहे. पत्रलेखनाच्या विषयानुसार पत्राचे दोन प्रमुख प्रकार पडतात.

(१) औपचारिक पत्र

(२) अनौपचारिक पत्र

आत्तापर्यंत तुम्हांला या पत्रप्रकारांची ओळख झालेली आहे.

**लक्षात घ्या–** आजच्या तंत्रज्ञान युगात फोनचा वापर वाढल्यामुळे पत्र लिहिणे कमी झाले आहे. तरीही आपल्याला अर्ज करणे, मागणी करणे, विनंती करणे अशा काही कारणांसाठी पत्र लिहिणे आवश्यक असते व पत्रलेखन कौशल्य प्राप्त होण्यासाठी या इयत्तेत तुम्हांला औपचारिक पत्रलेखनाचा अभ्यास करायचा आहे. आता आपण औपचारिक पत्रलेखनाचे स्वरूप समजून घेऊया.

- **औपचारिक पत्रलेखनासाठी आवश्यक गोष्टी :**

(१) ज्यांना पत्र लिहायचे आहे त्यांच्या पदाचा शिष्टाचारपूर्वक उल्लेख करावा.

(२) भाषा सरळ, सुगम, सुस्पष्ट व विषयानुरूप असावी.

(३) पत्रात केवळ मुख्य विषयाबाबतच लिहावे.

(४) ज्यांना पत्र पाठवायचे आहे त्यांचे पद, वय, योग्यता, शिक्षण इत्यादी सर्व गोष्टी लक्षात घेऊन योग्य भाषेचा वापर करावा.

(५) पत्राची भाषा लेखननियमांनुसार असावी.

- **औपचारिक पत्र लिहिण्यासाठी खाली दिलेल्या प्रारूपाचा अभ्यास करा.**

## औपचारिक पत्र प्रारूप

पत्र पाठवणाऱ्याचा पत्ता
दिनांक :

प्रति,
माननीय.............,
(योग्य त्या मान व पदासह ज्यांना पत्र पाठवायचे आहे त्यांचे नाव, हुद्दा व पत्ता)

विषय : ............................ (पत्राचे कारण)

महोदय,

विषयानुसार मजकूर

आपला विश्वासू,
पत्र पाठवणाऱ्याची सही
व नाव

तिकीट

प्रति,
______
______
______

प्रेषक,
______
______
______

(**प्रति –** ज्याला पत्र पाठवायचे ती व्यक्ती,
**प्रेषक –** जो पत्र पाठवतो ती व्यक्ती.)

**कृती– वरील प्रारूपाचा अभ्यास करून खालील विषयावर पत्रलेखन करा.**

तुमच्या शाळेमध्ये उन्हाळी सुट्टीत 'हस्ताक्षर सुंदर करूया!' हे १० दिवसांचे शिबिर आयोजित केले आहे. त्यात तुम्हांला सहभागी करून घेण्याची विनंती करणारे पत्र वर्गशिक्षकांना लिहा.

**टीप :** औपचारिक व अनौपचारिक दोन्ही प्रकारची पत्रे आज तंत्रज्ञानाच्या साहाय्याने म्हणजे ईमेलद्वारा पाठवली जातात. ईमेल पाठवण्याचे पत्राचे प्रारूप व तंत्र जाणून घेण्याचा प्रयत्न करा.



## वाचा.

- **खालील उतारा वाचा. विरामचिन्हांचा योग्य वापर करून उतारा पुन्हा लिहा.**

रंगीबेरंगी फुलांचे ताटवे पाहिले की मन कसे प्रसन्न होऊन जाते आपल्या सभोवती उमललेल्या फुलांच्या सुवासाने आजूबाजूचे वातावरण सुगंधित होते त्या नाजूक टवटवीत गंधमिश्रित फुलांच्या दर्शनाने नयनसुख मिळते आज उमललेले फूल उद्या कोमेजून जाणार असते पण त्याच्या या क्षणभंगुर जीवनासाठी फुलाला कधी रडताना पाहिले आहे का तुम्ही दुसऱ्याला प्रफुल्लित करत सुवास देत ते हसत बागडत राहते ते आपल्याला असे तर सांगत नसेल ना की मुलांनो आजचा दिवस आपला आहे या दिवशी आनंदाने हसा खेळा बागडा दुसऱ्यांना आनंद सुख समाधान देण्यातच खरा आनंद दडला आहे

- **खालील उतारा वाचा व त्यास योग्य शीर्षक द्या.**

प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्यात सुखदु:खाचे क्षण नेहमीच येत असतात. दु:खाच्या व अडचणीच्या प्रसंगांना जे खिलाडू वृत्तीने सामोरे जातात, जे जिंकण्याच्या ऊर्मीने हाती घेतलेले काम पूर्ण करण्यासाठी स्वयंप्रेरणेने काम करतात, तेच आयुष्यात यश मिळवतात. कोणतीही वाईट परिस्थिती तुम्हांला अडवू किंवा हरवू शकत नाही. वेळप्रसंगी तुम्हांला दोन पावले मागेही टाकावी लागतात; परंतु जर आपण मनानेच हरलो, तर पुढील कार्य पूर्ण करण्यासाठी आपण तयार होऊ शकत नाही. अशा परिस्थितीत कायम आपले आपल्या मनावर नियंत्रण असणे आवश्यक असते.

नकारात्मक विचार करण्यापासून आपण स्वत:ला थांबवणे आवश्यक आहे. त्याचबरोबर आपल्या मनाला चांगल्या सवयी लावणेही आवश्यक आहे. आपल्या मनाला चांगली सवय लावणे हे कठीण असले, तरी अशक्य मात्र नक्कीच नाही! आपल्या अंगी असणाऱ्या चांगल्या सवयी, वाईट सवयींना जवळ येऊ देत नाहीत. मनाला चांगल्या विचारांची सवय लावली, तर ती सवय वाईट विचारांपासून तुम्हांला नक्कीच दूर ठेवील.

यासाठी तुम्हांला काही गोष्टी लक्षात ठेवाव्या लागतील. उदा., चांगले वाचन, चांगल्या मित्रमैत्रिणींची संगत, घरातील ज्येष्ठ व्यक्तींशी असणारे जिव्हाळ्याचे व आपुलकीचे संबंध इत्यादी. जो दुसऱ्याच्या दु:खात नेहमी सहभागी होतो त्यालाच जीवनाचा खरा अर्थ कळतो. मानसिक आधार देऊन, विचारांच्या देवाणघेवाणीतून आपण एकमेकांचे दु:ख सहज हलके करू शकतो.

असे सुखदु:खाचे संघर्ष प्रत्येकाच्या आयुष्यात सतत येत असतात मात्र या संघर्षाला जो धीराने सामोरा जातो, तोच जीवनात यशस्वी होतो.

H17VAV

# ६. असा रंगारी श्रावण

भाग-२

**ऐश्वर्य पाटेकर** (१९७७) : प्रसिद्ध लेखक, कवी. 'भुईशास्त्र' हा कवितासंग्रह आणि 'जू' हे आत्मकथन प्रसिद्ध. 'भुईशास्त्र' या कवितासंग्रहाला दिल्लीच्या भारतीय साहित्य अकादमीचा पहिलाच 'राष्ट्रीय साहित्य अकादमी युवा पुरस्कार' यासह अन्य अनेक पुरस्कारही प्राप्त झाले आहेत. या कवितासंग्रहातील कवितांचा उडिया, हिंदी, बंगाली, उर्दू आणि इंग्रजी या भाषांत अनुवाद झालेला आहे. २०१२ साली भारत सरकारच्या सांस्कृतिक मंत्रालयातर्फे चीन भेटीसाठी मराठी साहित्यिकांचा प्रतिनिधी म्हणून निवड. 'कविता-रती', 'अनुष्टुभ', 'साधना', 'किशोर' यांसारख्या विविध नियतकालिकांतून कविता, कथा प्रसिद्ध झाल्या आहेत.

श्रावणात केवळ निसर्ग फुलून गेलेला नसतो; तर माणसाचे जीवनही सण, उत्सव आणि विविध क्रीडांनी गजबजून गेलेले असते. श्रावणरंगात सारेच रंगून जातात. प्रस्तुत कवितेत श्रावण महिन्याच्या निसर्गातील विलोभनीय बदलांचे सुंदर वर्णन केले आहे. प्रस्तुत कविता 'किशोर', ऑगस्ट २०१७ या मासिकातून घेतली आहे.

- **ऐका. वाचा. म्हणा.**

असा रंगारी श्रावण रंग उधळीत येतो
सृष्टीचा गा चित्रकार हिर्वा देखावा रेखितो

कलावंत हा साजिरा काय त्याची कलागत
जागोजागी चित्रांचीच त्यानं मांडली पंगत

नाचे दरी डोंगरात झिम्मा खेळतो नदीशी
रिमझिम पहाळीचं गाणं बोलतो झाडांशी

वेण्या गुंफितो वेलींच्या वेली लाजल्या लाजल्या
पाना-फुलांचे पातळ थेंबाथेंबांनी सजल्या

झुले पोरींना झुलाया असे टांगतो झाडाला
देतो झुलता झुलता लय पोरींच्या गाण्याला

पोरांमध्ये खेळायला होतो श्रावण खेळगा
दहीहंडीच्या संगती चिंब गोपाळ अवघा

पावसाचं घर कसं लख्ख उन्हात बांधतो
खोडी काढून खट्याळ झाडाआड तो लपतो

इंद्रधनुष्याचा बांध असा नभाला घालतो
रंगीबेरंगी फुलांची नक्षी रानात गोंदतो


असा रंगारी श्रावण रंग उधळीत येतो
हिर्व्या सृष्टीच्या मळ्यात खोपा करून राहतो





## स्वाध्याय

**प्र. १. खालील चौकटी पूर्ण करा.**




**प्र. २. प्रश्न तयार करा.**


(अ) 'श्रावण' हे उत्तर येईल असा प्रश्न तयार करा.

(आ) 'इंद्रधनुष्याचा बांध' हे उत्तर येईल असा प्रश्न तयार करा.

**प्र. ३. अर्थ लिहा.**

(अ) रंगारी (आ) सृष्टी (इ) झूला (ई) खेळगा

**प्र. ४. आकृती पूर्ण करा.**




**प्र. ५. स्वमत.**

(अ) 'जागोजागी चित्रांचीच त्यानं मांडली पंगत', या ओळीतील कवीची कल्पना तुमच्या शब्दांत स्पष्ट करा.

(आ) 'नागपंचमी' आणि 'गोकुळाष्टमी' या सणांचा कवितेतून व्यक्त होणारा संदर्भ तुमच्या शब्दांत लिहा.

(इ) कवितेतून व्यक्त झालेला 'रंगारी श्रावण' तुम्हांला का आवडला ते तुमच्या शब्दांत सांगा.

## खेळूया शब्दांशी.

- **कवितेतील यमक जुळणाऱ्या शब्दांच्या जोड्या लिहा.**

(१) नदीशी–

(२) लाजल्या–


(३) झाडाला–


(४) बांधतो–

**उपक्रम :** 'आश्विन' महिन्यातील निसर्गाचे निरीक्षण करा, त्याचा अनुभव घ्या व अनुभवलेखन करा.

## चला संवाद लिहूया.

- झोका व झाड या दोघांमधील संवादाची कल्पना करून संवादलेखन करा.





झोका : ..........................................................................

झाड : ..........................................................................

झोका : ..........................................................................

झाड : ..........................................................................

झोका : ..........................................................................

झाड : ..........................................................................

झोका : ..........................................................................

झाड : ..........................................................................

झोका : ..........................................................................

झाड : ..........................................................................

झोका : ..........................................................................

झाड : ..........................................................................

झोका : ..........................................................................

झाड : ..........................................................................

M1GRCI

# ७. अण्णा भाऊंची भेट

**विठ्ठल उमप** (१९३१-२०१०) : प्रसिद्ध लोकशाहीर, लोककलाकार आणि सामाजिक कार्यकर्ते. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचे निष्ठावंत पुरस्कर्ते. त्यांच्या नावावर १००० हून अधिक लोकगीते आहेत. त्यांनी दहा चित्रपटांमध्येही काम केले आहे. पोवाडा, बहुरूपी, भारूड, भजन, गण-गवळण, कवने, लावणी, तुंबडी, बोबडी, धनगर गीते, नंदीबैल, वासुदेव, डोंबारी, पोतराज असे अस्सल मराठमोळे कलाप्रकार तसेच कव्वाली आणि गझल गायन या लोककलेच्या सर्वच प्रकारांत त्यांनी लीलया संचार केला. त्यांचे 'फू बाई फू' हे आत्मचरित्र; 'अबक, दुबक, तिबक', 'अरे संसार संसार', 'खंडोबाचं लगीन', 'जांभूळ आख्यान', 'दार उघड बया दार उघड' या कलाकृती; 'उमाळा' हा गझल संग्रह इत्यादी पुस्तके प्रसिद्ध आहेत. १९८३ साली आयर्लंड येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय लोकनृत्य स्पर्धेत त्यांनी भारताचे प्रतिनिधित्व करून देशाला प्रथम क्रमांकाचे पारितोषिकही मिळवून दिले आहे. त्यांना १९९६ साली महाराष्ट्र शासनाचा 'सांस्कृतिक पुरस्कार' तसेच २००१ साली 'दलित मित्र पुरस्कार' या पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे.

प्रस्तुत पाठात शाहीर उमप यांनी प्रसिद्ध कथाकार, कादंबरीकार लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांचे व्यक्तिचित्र रेखाटले आहे. सुमारे ३५ कादंबऱ्या, अनेक कथा, लोकनाट्य यांसारखे विपुल लेखन करणारे अण्णा भाऊ साठे हे एक अत्यंत झंझावाती व्यक्तिमत्व होते. सुखवस्तू जीवन जगणे शक्य असूनही त्यांनी दीनदुबळ्यांच्या जगातच कायम वास्तव्य केले आणि त्या जगाचे प्रखर वास्तव आपल्या साहित्यातून मांडले. त्यांच्या मनातील गोरगरिबांविषयीच्या व्यापक सहानुभूतीचा आणि उगवत्या कलाकारांना प्रोत्साहन देण्याच्या वृत्तीचा परिचय या पाठातून आपल्याला होतो. प्रस्तुत पाठ हा 'फू बाई फू' या आत्मचरित्रातून घेतला आहे.

माझे आकाशवाणीवरील कार्यक्रम फारच गाजत राहिले. ते अण्णा भाऊ साठेंनी बऱ्याचदा ऐकले. एकदा अण्णा भाऊ साठे यांनी मला ''चिरागनगरात येऊन भेटा'', असा भिकाजी तुपसौंदर या माझ्या मित्राकडे निरोप पाठवला. मला अत्यानंद झाला. एवढ्या मोठ्या माणसानं मला भेटायला बोलावलं म्हणजे, काहीतरी शाहिरी कार्यक्रम असावा. दुसऱ्या सायंकाळी चारच्या सुमारास चिरागनगरीची, खाचखळग्यांची ओबडधोबड वाट तुडवत, अण्णांचं घर विचारत विचारत एका झोपड्यापाशी आलो. त्या झोपड्याच्या दारात वलानीला बाळवती सुकत घालत असलेल्या बाईला ''अण्णा भाऊ साठेंचं घर कोणतं?'' म्हणून विचारलं.

ती म्हणाली, ''ही बगा, डाव्या अंगानं आसंच म्होरं जावा, थितं च्यावाल्याचं हाटील हाय, आंगं तेच्याच म्होरल्या आंगाला इचारा. थितंच जयवंताबाय ऱ्हातीया.''

मी म्हणालो, ''आहो ताई, मी अण्णा भाऊ साठेंचं घर विचारतोय.''

ती म्हणाली, ''आवं, मग मी तेच की सांगतीया. आवं, जयवंता बाय हायना, ती अण्णांची मालकीण हाय. जावा कडंकडंनं, चिरागनगरातली ही वाट सदान्‌कदा चिखलापान्यात लोळत पडलिया-कडंकडंनंच जावा.''

मी पुढे नेमका चहाच्या हॉटेलाजवळ गेलो. चहावाल्याला विचारलं, ''अण्णा भाऊ साठेंचं घर कोणतं?'' ''वो क्या, वो पांचवा झोपडा है ना, वहांच अण्णा रहेता है।'' त्यानं दुरून घर दाखवलं. मी झोपड्याच्या दारात जाऊन पोहोचलो. दारातून अण्णा भाऊंना हाक मारली. साडेचार फूट उंचीची माझ्यासारखीच काळीसावळी मूर्ती घामेजलेल्या अंगानंच बाहेर आली. अण्णा भाऊंना मी प्रथमच पाहत होतो. त्यांनी मला ओळखलं. ''तुम्ही विठ्ठल उमप शाहीर ना?'' मी ''होय'' म्हणालो. ''या'' असं म्हणून मला त्यांच्या झोपडीत नेलं.

अण्णांनी मला मोडक्या बाजावर बसायला सांगितलं. अण्णांनी आपलं मळकं गंजीफ्राक (बनियन) घातलं आणि आम्ही बाहेर आलो. मला अण्णा भाऊंचं घर दाखवलं त्याच चहावाल्याच्या हॉटेलात अण्णांनी चहा दिला. तिथेच त्यांनी ''शाहीर, तुम्ही केव्हापासून गाता?'' वगैरे चौकशी केली. मी मोकळेपणाने; पण लाजतबुजत सारं काही सांगून टाकलं. ऐकून त्यांना खूप बरं वाटलं. आम्ही चहा घेतला. अण्णा म्हणाले, ''तुम्ही फार चांगलं गाता, तुमच्या रचना आकाशवाणीवरून ऐकल्या. तुमच्या बुलंद पहाडी आवाजाने मला मोहून टाकलं. तुमच्या वागणुकीची, वर्तनाची इतरांकडून माहिती मिळाली. तुमच्यामधला

आवाजाचा गोडवा मी अनेकदा चाखलाय विठ्ठलराव. मला रहावेच ना. तुम्हांला केव्हा भेटेन असं सारखं वाटत होतं. तो सुदिन आज उगवला.''

अण्णा भाऊंची व माझी पहिली भेट १९६३ वा ६४ सालात झाली असावी.

''अण्णा भाऊ, आपण थोर साहित्यिक आहात, आज आपल्या दर्शनानं मी धन्य झालो. यापूर्वी मी आपणाला पाहिलं नव्हतं, फक्त आपलं नाव ऐकून होतो.'' असं म्हणताच अण्णा हसले. ''आता आपली गट्टी जमली. माझ्याकडे येत चला, विसरू नका.''

एवढ्या मोठ्या शाहिराने आपलेपणाने मला जवळ केलं. जणूकाही फार वर्षांची आमची ओळख आहे, अशाच पद्धतीने माझ्याशी त्यांचं बोलणं, वागणं चाललं होतं. पहिल्याच भेटीत मी त्यांच्या प्रेमात पडलो.

अण्णांचा निरोप घेऊन मी घरी आलो, तिसऱ्या दिवशी अण्णांच्या भेटीस गेलो असता मोडक्या टेबलावर तुटक्या खुर्चीत बसून एका दांडीला धागा बांधलेला तुटका चश्मा डोळ्याला लावून अण्णा लिहीत होते. जेव्हा जेव्हा मी जाई तेव्हा ते लिहीतच असत. पाचेक मिनिटं मी आतल्या एका बाजूला उभा होतो. तिथं पाणी साचलेलं छोटं डबकं होतं. चुलीजवळ साठेवहिनी गालाला हात लावून विचारमग्न बसलेल्या होत्या. त्यांच्याजवळच एक तांब्या, एकच जरमनचं ताट, एक डेचकी असा हा संसार तोंड वासून पडलेला. चुलीत अर्धी कोळसा झालेली लाकडं होती. अण्णांच्या वलानीला बऱ्यापैकी एक सदरा; लेंगा-हँगरला लोंबकळत होता. अण्णांच्या समोर एक पुतळा होता. तो गॉर्कीचाच असावा, कारण मी खूप जणांकडून ऐकलं होतं, की अण्णा गॉर्कीला गुरू मानतात, तो त्यांचा आदर्श आहे वगैरे. हे दृश्य पाहत असताना, एकाएकी मजकडे अण्णांनी पाहिलं. 'केव्हा आलात' विचारलं. 'नुकताच आलो' असं मी सांगितलं.

मी चिरागनगरात गेलो नाही तर अण्णा प्रेमानं रागवत. अण्णांना माझ्याविना करमत नसे व मलाही गमत नसे. हळूहळू आमचा घरोबा वाढला.

एकदा अण्णांना विचारून त्यांची वही चाळली, त्या ऐंशी पानी वहीत कुठलंही वाक्य वा कुठलीही ओळ अण्णांनी खोडल्याचं मला दिसलं नाही. एकदा कुठले दोन प्रकाशक आले, त्यांनी अण्णांच्या ऐंशी पानी दोन वह्या घेतल्या. माझ्यासमक्ष एक ट्रान्झिस्टर अण्णाला देऊन 'बरं, अण्णा येतो' असं म्हणत निघून गेले. अण्णांच्या कथेचं मानधन केवळ एक ट्रान्झिस्टर! मी विचार करतच राहिलो.

कधी कधी अण्णाही माझ्या घरी येत. असेच एकदा माझ्या घरी अण्णा जेवायला आले होते. जेवण उरकल्यावर आम्ही गप्पा करत होतो. माझ्या पत्नीला म्हणाले, ''बाय, मी जर जगलो वाचलोच तर माझ्या विठ्ठलाला मी रशियाला घेऊन जाईन.'' अण्णांचं बोलणं मध्येच थांबवून मी म्हणालो, ''अण्णा, मॉस्को शहरात आपल्या कादंबऱ्यांचं तिथल्या भाषेत अनुवाद झालेत असं मी ऐकलंय.'' अण्णा ''होय'' म्हणाले.

''अण्णा, मॉस्कोमध्ये आपल्या कादंबऱ्यांच्या अनुवादांचे अमाप असं मानधन तिथल्या बँकेत आहे असंही म्हणतात. तुम्ही ते मानधन काही करून मिळवा. आलिशान बंगला बांधा. त्यात डायनिंग टेबल, कोच, बेडरूम, पुस्तकांची कपाटं-सगळं सगळं थाटामाटाचं करता येईल आणि अण्णा, तुम्हांला लिहायला सुरेख टेबल, त्यावर टेबललॅम्प, लिहायला उत्तम लेखण्या, असा सरंजाम असल्यावर तुम्ही जे लिहिता त्याहूनही तुमचं लिखाण सरस होईल.''

अण्णा हसत हसतच म्हणाले, ''विठ्ठला, बंगला, मोटर, बागबगीचा, रुबाबदार कपडे, लिखाण करण्यासाठी वेगळी खोली, खोलीत फुलदाणी, टेबल, आरामखुर्ची या सर्व साधनांचा मला मोह नाही. अरे, झोपड्यात दीनदलितांची दुःखं मला अनुभवायला मिळतात. गोरगरिबांची पोटतिडकीची भाषा, त्यांचं जीवनमान, तिथली वास्तवता मी झोपडीत राहूनच लिहू शकेन. बंगल्यात मला एक अक्षरही सुचणार नाही. बंगल्यात ओढून ताणून काल्पनिक लिखाण होईल, झोपडीत उपाशी पोटं कशी जगतात, पावसाळ्यात झोपडं गळतं तेव्हा त्या पाण्याखाली टेचकी भगुलं, परात कशी लावली जाते, थंडीच्या महिन्यांत दीनदुबळ्यांना थंडीत कुडकुडत बसावं लागतं, इथं दुःखाला झेलत जगणारी माणसे-त्यांची पालं-त्यांच्या हाणामाऱ्या, विठ्ठल, काय सांगू-अरे, वास्तवानं ओतप्रोत भरलेल्या या दुबळ्या जगाचं सत्य साहित्य मला बंगल्यात बसून लिहिता येणार नाही. माझ्या कादंबऱ्यांचं मानधन मॉस्कोतच राहू दे. त्या संपत्तीनं मी बिघडून जाईन, गरिबीला विसरून जाईन, सत्य लिखाणाला पारखा होईन, म्हणून मला ते मानधन नको.''

## स्वाध्याय

**प्र. १. नातेसंबंध लिहा.**


(अ) विठ्ठल उमप– भिकाजी तुपसौंदर

(आ) जयवंता बाय– अण्णा भाऊ साठे


(इ) अण्णा भाऊ– गॉर्की

**प्र. २. आकृत्या पूर्ण करा.**

(अ)




(आ)




**प्र. ३. एका शब्दात उत्तरे लिहून चौकट पूर्ण करा.**

(अ) अण्णा भाऊ साठे यांचे राहण्याचे ठिकाण

(आ) विठ्ठल उमप यांच्यासमोर अण्णा भाऊंना मिळालेले कथेचे मानधन

(इ) अण्णांच्या कादंबऱ्या अनुवादित झाले ते शहर

**प्र. ४. उत्तरे लिहा.**

(अ) अण्णा भाऊंच्या राहणीमानाचे वर्णन तुमच्या शब्दांत करा.

(आ) अण्णा भाऊंसाठी असलेल्या सुदिनाचे महत्त्व तुमच्या शब्दांत लिहा.

(इ) पाठाच्या आधारे विठ्ठल उमप यांचे शब्दचित्र रेखाटा.

(ई) प्रस्तुत पाठात विठ्ठल उमप यांनी रेखाटलेले अण्णांचे शब्दचित्र वाचून तुमच्या मनात अण्णांविषयी कोणते विचार आले, ते लिहा.

## खेळूया शब्दांशी.

- **खालील वाक्यांत विरामचिन्हांचा योग्य वापर करून वाक्ये पुन्हा लिहा.**

(१) जुई रेहाना जॉर्ज सहलीला निघाले

(२) अबब केवढा हा साप

(३) आई म्हणाली सर्वांनी अभ्यासाला बसा

(४) आपला सामना किती वाजता आहे

(५) उद्या किंवा परवा मी गावी जाईन

## शोध घेऊया.



- **मॅक्झिम गॉर्की यांच्याविषयी आंतरजालाच्या साहाय्याने माहिती मिळवा.**

**उपक्रम :** अण्णा भाऊ साठे यांची 'स्मशानातील सोनं' ही कथा मिळवा व या कथेचे वर्गात प्रकट वाचन करा.

## आपण समजून घेऊया.

### (२) कर्मणी प्रयोग

- **खालील वाक्ये वाचा. निरीक्षण करा व कृती पूर्ण करा.**

(अ) (१) तुषारने आंबा खाल्ला. (२) स्वातीने आंबा खाल्ला.
(३) मुलांनी आंबा खाल्ला. (४) मुलींनी आंबा खाल्ला.

**कृती–** कर्त्याचे लिंग, वचन बदलल्यानंतर क्रियापद बदलते का ? ☐

(आ) (१) तुषारने आंबे खाल्ले. (२) स्वातीने चिंच खाल्ली.
(३) मुलांनी चिंचा खाल्ल्या. (४) मुलींनी टरबूज खाल्ले.

**कृती–** कर्माचे लिंग, वचन बदलल्यानंतर क्रियापद बदलते का ? ☐

जेव्हा वाक्यांत कर्माच्या लिंग, वचनाप्रमाणे क्रियापदाचे रूप बदलते, तेव्हा त्यास '**कर्मणी प्रयोग**' असे म्हणतात.

#### कर्मणी प्रयोगाची वैशिष्ट्ये

- कर्ता सामान्यत: तृतीय विभक्तीत असतो.
- कर्म नेहमी प्रथमा विभक्तीत असते.
- क्रियापद कर्माच्या लिंग, वचनानुसार बदलते.

### (३) भावे प्रयोग

- **खालील वाक्ये वाचा, निरीक्षण करा व कृती पूर्ण करा.**

(१) शिक्षकाने विद्यार्थ्याला शिकवले.
(२) शिक्षिकेने विद्यार्थ्यांना शिकवले.
(३) त्यांनी विद्यार्थ्यांना शिकवले.
(४) मी विद्यार्थिनीला शिकवले.

**कृती–** (१) वरील वाक्यांतील क्रियापदात बदल आढळतो का ? ☐
(२) कर्ता आणि कर्म यांचे लिंग व वचन प्रत्येक वाक्यात बदलले आहे का ? ☐

जेव्हा क्रियापदाचे रूप कर्त्याच्या किंवा कर्माच्या लिंगवचनाप्रमाणे बदलत नसून ते नेहमी तृतीयपुरुषी, नपुंसकलिंगी, एकवचनी असून स्वतंत्र असते, तेव्हा त्यास '**भावे प्रयोग**' असे म्हणतात.

**भावे प्रयोगाची वैशिष्ट्ये**

- कर्ता सामान्यत: तृतीया विभक्तीत असतो.
- कर्म असल्यास द्वितीया विभक्तीत असते.
- क्रियापद नेहमी तृतीय पुरुषी, नपुंसकलिंगी एकवचनी असते व कर्ता किंवा कर्माच्या लिंग, वचनानुसार ते बदलत नाही.

- **पुढील वाक्यांतील प्रयोग ओळखा.**
  (१) त्याने मागे वळून बघितले.
  (२) विज्ञानाने माणसाला दृष्टी दिली.
  (३) तो नेहमी नवे संकल्प करतो.
- **कर्तरी, कर्मणी व भावे या प्रयोगांची प्रत्येकी पाच-पाच वाक्ये तयार करा.**



## वाचा.

- **खालील उतारा वाचा. त्याचा तुम्हांला समजलेला अर्थ सारांश रूपाने पुन्हा लिहा.**

आपल्यासारख्या सामान्यांना शब्दावाचूनचे संवाद भावणारही नाहीत, की परवडणारही नाहीत. आपल्याला कठीण, साधे, सरळ, वक्र कसे का होईना; पण बोलणे आणि ठणठणीत बोलणेच हवे असते आणि या बोलण्याचे किती अनंत प्रकार असतात. 'व्यक्ती तितक्या प्रकृती' अशी म्हण आहे. त्या चालीवर 'माणसे तितकी बोलणी' अशी म्हण बनवायला हरकत नाही. 'मोकळा संवाद' असे आपण म्हणतो; पण समाजात वावरताना या तथाकथित मोकळ्या संवादावर कशी आणि किती बंधने पडत असतात ते पाहिले म्हणजे गंमत वाटते. मित्रमंडळींशी गप्पा मारताना आपण खूप मुक्त, मोकळे असतो अशी आपली समजूत असते; पण ती खरी असते का? आपणाला एकमेकांचे अनेक गुणदोष, एकमेकांच्या जीवनातले बरेवाईट तपशील ठाऊक असतात; त्यामुळे तिथे कधी मोकळ्या गप्पा होत असल्या, तरी अनेकदा नात्यातल्या जवळिकीमुळेच कधीकधी एक चमत्कारिक अवघडलेपणही अनुभवाला येते. एकमेकांची मते, आग्रह, दुराग्रह ठाऊक असल्यामुळे मतभेदाचे अवघड विषय बहुधा आपण शिताफीने टाळतो. वृत्तीतल्या हळव्या जागा, स्वाभिमानाची ठिकाणे माहीत असल्यामुळे बोलताना त्यांना कुठे धक्का लागणार नाही, समोरच्या व्यक्तीचं मन दुखावले जाणार नाही, याची सतत काळजी घ्यावी लागते.

❀❀❀

H1QHE6

# ८. धाडसी कॅप्टन : राधिका मेनन

**मच्छिंद्र ऐनापुरे** (१९७४) : प्रसिद्‌ध लेखक. त्यांचा 'जंगल एक्सप्रेस' हा बालकथा संग्रह, 'हसत जगावे' हा विनोदी कथासंग्रह प्रसिद्‌ध आहे. याशिवाय त्यांच्या 'किशोर', 'छावा-केसरी' आदी बालमासिके यांमधून बालकथा प्रसिद्‌ध आहेत. त्यांनी विविध वृत्तपत्रांमधून विविध विषयांवरील लेखन केले आहे. ब्लॉगवर त्यांचे आजवर १२०० लेख प्रसिद्‌ध आहेत.

भारतीय मर्चंट नेव्हीच्या पहिल्या कॅप्टनचा मान भूषवणाऱ्या राधिका मेनन यांना इंटरनॅशनल मेरिटाईम ऑर्गनायझेशनने 'ॲवार्ड फॉर एक्सेप्शनल ब्रेव्हरी ॲट सी' या पुरस्काराने सन्मानित केले आहे. हा पुरस्कार मिळवणाऱ्या त्या जगातील पहिल्या महिला ठरल्या आहेत. राधिका मेनन यांनी जिवाची बाजी लावून बंगालच्या उपसागरात वादळात सापडलेल्या सात मच्छीमारांना वाचवले होते. प्रस्तुत पाठात त्यांच्या शौर्याचा परिचय करून दिलेला आहे. प्रस्तुत पाठ हा 'किशोर', मे २०१७ या मासिकातून घेतला आहे.



राधिका या केरळच्या कोदुनगलर भागात लहानाच्या मोठ्या झाल्या. धाडस आणि काहीतरी करून दाखवण्याची हिंमत हे त्यांचे गुणविशेष होत. मोकळ्या वेळेत त्यांचं नेहमी सागरकिनारी भटकणं, फिरणं व्हायचं. त्यामुळे उसळणाऱ्या नखरेल लाटांना पाहून त्यांच्या सोबतीनं अनंत अशा सागर सफरीला जावं, असं त्यांच्या मनाला वाटायचं. या लाटांना पाहूनच त्यांनी नौसेनेत जायचं निश्‍चित केलं. सुरुवातीला त्यांच्या आई-वडिलांनी, त्यांच्या या निर्धाराला विरोध केला. त्यांना वाटलं होतं, की ही जोखमीची नोकरी आहे. आपली नाजूक मुलगी समुद्रातल्या धोक्यांचा सामना कसा करेल? पण उत्तुंग इच्छाशक्ती असलेल्या राधिकाने त्यांना यासाठी राजी केलं.

पदवी मिळवल्यानंतर त्यांनी 'ऑल इंडिया मरीन कॉलेज'मध्ये रेडिओ कोर्ससाठी प्रवेश घेतला. त्यांच्या घरापासून तीस किलोमीटर अंतरावर असलेल्या कोचीमध्ये कॉलेज होतं. प्रशिक्षणादरम्यान राधिका यांना समुद्री जहाजातल्या संवादप्रणालीची माहिती झाली. जहाजात काम करायला त्या फारच उत्सुक होत्या. प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर, 'शिपिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडिया'मध्ये प्रशिक्षक रेडिओ ऑफिसरची नोकरी मिळाली आणि त्यांचे समुद्री जहाजात काम करण्याचे स्वप्न पूर्ण झाले. नियमानुसार समुद्री क्षेत्रात निर्धारित वेळेत काम केल्यानंतर २०१० साली त्यांनी मास्टर सर्टिफिकेटसाठी अर्ज केला. या दरम्यान त्यांना बराच काळ घरापासून लांब रहावं लागलं; पण रोमांचकारी प्रवासामुळं त्या खूश होत्या. शेवटी त्यांचं हे आवडीचं काम होतं ना! आता त्यांचं लक्ष्य होतं, समुद्री जहाजाची कमान सांभाळायची. त्यांचे हे स्वप्न २०१२ साली पूर्ण झालं. राधिका देशातल्या पहिल्या महिला मर्चंट नेव्ही कॅप्टन बनल्या. त्यांना मर्चंट नेव्हीच्या 'संपूर्ण स्वराज्य' या जहाजाची कमान सांभाळायला दिली गेली.

या दरम्यान त्यांचा विवाह नेव्हीमधील एका रेडिओ ऑफिसरशी झाला. एकाच व्यवसायात असल्या कारणानं नवऱ्याला त्यांच्या जबाबदारीची माहिती होतीच. आई बनल्यावर अडचणी वाढल्या. कौटुंबिक आणि नोकरीची जबाबदारी सांभाळताना अनेक अडचणी आल्या; परंतु त्या अजिबात डगमगल्या नाहीत. सगळ्यांत कठीण गोष्ट होती, ती म्हणजे मुलाचा सांभाळ. दीर्घकाळ घरापासून लांब रहावं लागायचं. राधिकांनी हे आव्हानदेखील चांगल्या प्रकारे निभावलं. राधिकाच्या या रोमांचकारी प्रवासात घरच्यांनी मोठी साथ दिली.

२२ जून, २०१५ रोजी एक घटना घडली. तेव्हा राधिका 'संपूर्ण स्वराज्य' जहाजावर तैनात होत्या. रात्रीचे जवळपास अकरा वाजले होते. जोराच्या वादळामुळे समुद्री लाटांनी रौद्र रूप धारण केलं होतं. मोसमाचा अवतार

खतरनाक बनला होता. तेवढ्यात जहाजातल्या एका अधिकाऱ्याने ओडिशाच्या गोपाळपूर किनाऱ्यापासून अडीच किलोमीटर अंतरावर मासेमाऱ्यांची नाव लाटांच्या गर्तेत सापडली असल्याचे सांगितले. नाव बुडणारच होती. नावेत असलेले लोक आपल्या जीवनाची शेवटची लढाई लढत होते. अधिकाऱ्याने तत्काळ राधिका यांना रेडिओवर सूचना पाठवली, 'मॅडम, समुद्रात एक नाव फसली आहे. त्यात असलेले मच्छीमार अडचणीत सापडले आहेत.' सूचना मिळताच त्यांनी दुर्बिणीने समोर नजर टाकली. खरोखरच नाव बुडण्याच्या अवस्थेत होती.

एक क्षणदेखील वाया न घालवता त्यांनी सुटकेच्या मोहिमेला सुरुवात केली. पुढच्या पाच मिनिटांत जहाजातले लोक बचाव कार्यासाठी सज्ज झाले. मात्र वादळाचा जोर इतका मोठा होता, की त्यांना नावेपर्यंत जाताच येईना. बुडणाऱ्या मच्छीमारांना माहीत होतं, की त्यांना वाचवण्यासाठी समोरचे जहाज त्यांच्यापर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करत आहे. ते जिवाच्या आकांताने स्वत:ला वाचवण्याचा प्रयत्न करत होते; पण जाणाऱ्या प्रत्येक क्षणासोबत त्यांची आशा धूसर होत चालली होती. जहाजातले कर्मचारी मात्र निकराचा प्रयत्न करत होते. पहिला प्रयत्न अयशस्वी ठरला. जोराच्या वादळामुळं बचाव कार्य करणारी टीम त्यांच्यापर्यंत पोहोचू शकत नव्हती. दुसरा प्रयत्न केला गेला. मच्छीमार जितके पुढे येण्याचा प्रयत्न करत होते, तितक्याच वेगाने ते मागे ढकलले जात होते. दुसरा प्रयत्नदेखील वाया गेला.

सगळ्यांना वाटलं, की आता सगळं संपलं. त्यांना वाचवणं अशक्य आहे; पण राधिकांनी आपल्या टीमचे मनोधैर्य तुटू दिले नाही. त्यांनी तिसऱ्यांदा आपल्या टीमला पुढे जाण्याचा आदेश दिला. राधिका सांगतात, की त्यावेळी समुद्रात नऊ मीटरच्या उंचच उंच लाटा उसळत होत्या. वारा ७० समुद्री मैल वेगाने वाहत होता. मच्छीमारांना वाचवण्यासाठी आमचे दोन प्रयत्न फसले होते; पण आम्ही हिंमत हरलो नाही. शेवटी तिसऱ्या प्रयत्नाला यश आलं. पायलट शिडीद्‌वारा मच्छीमारांना त्यांच्या नावेतून जहाजात घेण्यात आले. नावेतील सातही मच्छीमार सहीसलामत वाचले होते. वादळापासून बचावलेल्या पेरला चिन्नाराव त्यांच्या पत्नी म्हणाल्या, ''पती कित्येक दिवसांपासून घरी आले नाहीत म्हटल्यावर आम्ही समजलो होतो, की त्यांची नाव बुडाली. आम्हांला वाटलं, ते जिवंत राहिले नसतील; पण राधिका मॅडमनी त्यांचा जीव वाचवला. मी त्यांची शतश: आभारी आहे.''

या साहसी अभियानासाठी आंतरराष्ट्रीय मेरीटाईम संस्थेने त्यांना 'अॅवार्ड फॉर एक्सेप्शनल ब्रेव्हरी अॅट सी' या पुरस्काराने सन्मानित केले. मर्चंट नेव्हीच्या राधिका मेनन या पहिल्या महिला अधिकारी आहेत, ज्यांना हा सन्मान मिळाला आहे. राधिका सांगतात, ''ज्या वेळी आम्ही जहाजावर असतो, त्या वेळेला आम्ही, आपण महिला आहोत की पुरुष याचा विचार करत नाही. समोर कठीण लक्ष्य असेल, तर हिंमत आपोआप येते. हे सगळं आमच्या टीमच्या धाडसामुळे शक्य झालं. ''



## स्वाध्याय

**प्र. १. चौकटी पूर्ण करा.**

(अ) राधिका मेनन यांचे बालपण ज्या गावात गेले ते गाव

(आ) पदवी प्राप्त झाल्यानंतर राधिका मेनन यांनी केलेला कोर्स

(इ) मर्चंट नेव्हीच्या ज्या जहाजाची कमान राधिका मेनन यांनी सांभाळली ते जहाज

(ई) राधिका मेनन यांना मिळालेला पुरस्कार

**प्र. २. कारणे लिहा.**

(अ) राधिका मेनन यांना अनंत सागरी सफरीला जावसं वाटायचं, कारण.....

(आ) त्यांच्या आईवडिलांचा नौसेनेत जाण्यास विरोध होता, कारण.....

(इ) बचावकार्य करणाऱ्या टीमला मच्छीमारांपर्यंत पोहचण्यास अडथळे आले, कारण.....

**प्र. ३. आकृती पूर्ण करा.**

राधिका मेनन यांचे गुणविशेष

| | | | |
|---|---|---|---|
| | | | |

**प्र. ४. मच्छीमारांना वाचवण्यासाठी कॅप्टन राधिका व त्यांचे सहकारी यांनी केलेल्या कृतीचा ओघतक्ता तयार करा.**

सुटकेच्या मोहिमेला सुरुवात

[ ]

↓

[ ]

↓

पहिला प्रयत्न अयशस्वी

↓

[ ]

**प्र. ५. स्वमत लिहा.**

(अ) कॅप्टन राधिकाच्या टीमने मच्छीमारांना वाचवल्याचा प्रसंग थोडक्यात तुमच्या शब्दांत लिहा.

(आ) धाडस आणि हिंमत असली, की कुठलेही स्वप्न पूर्ण होऊ शकते हे पाठाधारे स्पष्ट करा.

(इ) मोठेपणी तुम्हांला कोण व्हावेसे वाटते आणि का, ते थोडक्यात लिहा.



**माझे वाचन**

- **'कोलंबसाचे गर्वगीत' ही कुसुमाग्रज यांची कविता मिळवून वाचा व शिक्षकांकडून समजून घ्या.**

**खेळूया शब्दांशी.**

- **खालील वाक्यांतील वाक्प्रचार ओळखा व त्यांचा वापर करून वाक्ये तयार करा.**

(१) युद्धप्रसंगी सैनिक जिवाची बाजी लावून लढत असतो.

(२) मच्छीमार मदतीसाठी जिवाच्या आकांताने ओरडत होते.

**उपक्रम :** खाली दिलेल्या क्षेत्रांतील पहिली भारतीय महिला कोण, याचा शोध घ्या व त्यांच्याविषयी अधिक माहिती मिळवा.

(अ) पहिली पायलट–

(आ) पहिली अंतराळवीर–

(इ) पहिली रेल्वेचालक–

(ई) पहिली शिक्षिका–

(उ) पहिली डॉक्टर–

## आपण समजून घेऊया.

- **खालील वाक्ये वाचा.**

(१) सूर्य उदय झाला.

(२) आम्ही विद्या अर्थी आहोत.

अधोरेखित शब्द आपण असे लिहितो का? तर नाही. आपण नेहमी 'सूर्योदय', 'विद्यार्थी' असे लिहितो आणि बोलतोसुद्धा. अशा प्रकारचे शब्द तयार करताना पहिल्या शब्दातील शेवटचा वर्ण व दुसऱ्या शब्दातील पहिला वर्ण एकमेकांमध्ये मिसळून एक वर्ण तयार होतो. वर्णांच्या अशा एकत्र येण्याच्या प्रकाराला **'संधी'** असे म्हणतात.

'संधी' म्हणजे सांधणे, जोडणे होय. संधीचे एकूण तीन प्रकार आहेत.

**(१) स्वरसंधी**

**(२) व्यंजनसंधी**

**(३) विसर्गसंधी**

या तीनही संधीप्रकारांविषयीची माहिती आपण समजून घेऊया. त्यासाठी खालील तक्त्याचा अभ्यास करा.

| प्रकार | वैशिष्ट्ये व नियम | उदाहरण |
|---|---|---|
| (१) स्वरसंधी | एकमेकांशेजारी येणारे वर्ण हे जर स्वराने जोडले असतील, तर त्यांना **'स्वरसंधी'** म्हणतात. | उदा.,<br>कवि + ईश्वर = कवीश्वर<br>इ + ई = ई |
| (२) सजातीय संधी | दोन सजातीय स्वरांऐवजी एकच दीर्घ स्वर होतो.<br>अ-आ, इ-ई, उ-ऊ यांचा संधी होताना आ, ई, ऊ हे स्वर येतात. | उदा.,<br>विद्या + अर्थी = विद्यार्थी<br>आ + अ = आ<br>लघू + उत्तरी = लघूत्तरी<br>ऊ + उ = ऊ |
| (३) विजातीय संधी | (१) 'अ' किंवा 'आ' यांच्यापुढे 'इ' किंवा 'ई' आल्यास दोहोंऐवजी 'ए' येतो.<br>(२) 'अ' किंवा 'आ' यांच्यापुढे 'उ' किंवा 'ऊ ' आल्यास 'ओ' येतो.<br>(३) 'अ' किंवा 'आ' यांच्या पुढे 'ऋ' आल्यास 'ऋ' ऐवजी अर् येतो. | उदा.,<br>गण + ईश = गणेश<br>अ + ई = ए<br>चंद्र + उदय = चंद्रोदय<br>अ + उ = ओ<br>महा + ऋषि = महर्षी<br>आ + ऋ = अर् |

(१) खालील जोडशब्दांचा संधिविग्रह करून तक्ता पूर्ण करा.

| संधी | संधिविग्रह |
|---|---|
| सुरेश | ............ + ............ |
| निसर्गोपचार | ............ + ............ |
| भाग्योदय | ............ + ............ |
| राजर्षी | ............ + ............ |

(२) खालील तक्ता पूर्ण करा.

| संधिविग्रह | संधी |
|---|---|
| महा + ईश | ..................... |
| राम + ईश्वर | ..................... |
| धारा + उष्ण | ..................... |
| सह + अनुभूती | ..................... |
| लाभ + अर्थी | ..................... |

## जाहिरात लेखन

विद्यार्थ्यांनो, मागील इयत्तांमध्ये तुम्हांला 'जाहिरात' या घटकाची ओळख झालेली आहे. विविध वस्तू अथवा सेवा या चांगल्या कशा आहेत, हे जाहिरातींद्वारे पटवून दिलेले असते.

जाहिरात म्हणजे 'जाहीर करणे' होय. इंग्रजीत 'जाहिरात' या शब्दासाठी 'Advertisement' हा शब्द वापरला जातो. जाहिरातीचा मुख्य उद्देश वस्तू किंवा सेवांकडे ग्राहकांचे लक्ष वेधून घेणे व त्यांची मागणी निर्माण करणे असा असतो. त्याचबरोबर शासन व काही समाजसेवी संस्था यांच्यातर्फे समाजप्रबोधनासाठी व जनहिताय काही जाहिराती प्रसिद्ध केल्या जातात.जाहिरात ही एक कला आहे. तुम्ही अनेक जाहिरातींचे वाचन, निरीक्षण व श्रवणही करत असता. त्यांचे तुम्हांला आकलन होणे, हे आजच्या काळातील आवश्यक कौशल्य आहे.

जाहिरातीच्या श्रवण व वाचनाने जाहिरातीतील उत्पादनाबद्दल/सेवेबद्दल माहिती मिळणे व विक्रेता म्हणून इतरांच्या मनात त्याबद्दल कुतूहल, आकर्षण निर्माण करणे ही दोन्ही कौशल्ये आत्मसात करणे, हा जाहिरात या घटकाच्या अभ्यासाचा मूळ हेतू आहे.

- **खालील जाहिरातीचे वाचन व निरीक्षण करून दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.**

## *जिल्हा परिषद वरिष्ठ प्राथमिक डिजिटल शाळा, पिसगाव.*

प्रवेश सुरू



इयत्ता पहिली ते आठवी

**आपला प्रवेश आजच नोंदवा.**

**शाळेची वैशिष्ट्ये**

(१) डिजिटल शाळा
(२) ई-लर्निंग सुविधा
(३) वैयक्तिक मार्गदर्शन
(४) पालकांसाठी SMS सुविधा
(५) सांस्कृतिक कार्यक्रमांतून कला गुणांचा विकास
(६) क्रीडा स्पर्धांचे आयोजन

**विद्यार्थी योजना**

(१) मोफत प्रवेश
(२) मोफत पाठ्यपुस्तके
(३) शासकीय गणवेश योजना
(४) मुलींना उपस्थिती भत्ता
(५) इतर विविध योजना

**१००% गुणवत्तेची हमी**

**सौजन्य- शाळा व्यवस्थापन समिती पिसगाव**

**(अ) उत्तरे लिहा.**

(१) जाहिरातीचा विषय-
(२) जाहिरात देणारे (जाहिरातदार)-
(३) वरील जाहिरातीत सर्वांत जास्त आकर्षित करून घेणारा घटक-
(४) जाहिरात कोणासाठी आहे?

**(आ) वरील जाहिरात अधिक आकर्षक होण्यासाठी त्यांत कोणकोणत्या घटकांचा समावेश असावा, असे तुम्हांला वाटते?**

**(इ) तुमच्या मते जाहिरातीमधील महत्त्वाची वैशिष्ट्ये.**

❀❀❀

# ९. विद्याप्रशंसा

**कृष्णशास्त्री चिपळूणकर** (१८२४-१८७८) : भाषांतरकार, रसिक पंडित. मराठी व्याकरणावरील निबंध व ग्रंथपरीक्षणे त्यांच्या चिकित्सक बुद्धीचे दर्शन घडवतात. पद्य रत्नावलीत त्यांनी मेघदूताचा रसाळ अनुवाद केला आहे, तसेच 'अरबी भाषेतील सुरस व चमत्कारिक गोष्टी', 'रासेलस' ही सॅम्युअल जॉन्सन यांची तत्त्वप्रधान कादंबरी, 'साक्रेटिसाचे चरित्र' आणि 'अर्थशास्त्रपरिभाषा' ही त्यांच्या अनुवाद कौशल्याची उदाहरणे होत. 'अनेकविद्यामूलतत्त्वसंग्रह' या ग्रंथावरून त्यांची शास्त्रीय लेखन सुगम करून सांगण्याची हातोटी प्रत्ययास येते.

प्रस्तुत कवितेत विद्येची थोरवी सांगितली आहे. दुसऱ्याला विद्या दिल्याने ती कमी होत नसते, तर वाढतच असते, माणसाला संकटातून मार्ग दाखवत असते. विद्येमुळे माणसाच्या सर्व दु:खाचे निवारण होऊ शकते. विद्येसारखा वाटाड्या, मित्र कोणीही नाही असे विद्येचे महत्त्व या कवितेत सांगितले आहे. प्रस्तुत कविता ही 'आठवणीतल्या कविता' भाग ३ या कवितासंग्रहातून घेतली आहे.

- **ऐका. वाचा. म्हणा.**

विद्येनेंच मनुष्या आलें श्रेष्ठत्व ह्या जगामाजीं;
न दिसे एकहि वस्तू विद्येनेंही असाध्य आहे जी. ।।१।।

देउनि किंवा भोगुनि उणें न होतां सदैव वाढतसे
ऐसें एकच विद्या-धन, अद्‌भुत गुण न हा दुज्यांत वसे. ।।२।।

नानाविध रत्नांची, कनकांचीं असति भूषणें फार;
परि विद्यासम एकहि शोभादायक नसे अलंकार. ।।३।।

या साऱ्या भुवनीं हित-कर विद्येसारखा सखा नाहीं;
अनुकूळ ती जयाला नित्य तयाला उणें नसे कांही. ।।४।।

गुरुपरि उपदेश करी, संकट-समयीं उपायही सुचवी,
चिंतित फळ देउनियां कल्पतरूपरि मनोरथां पुरवी. ।।५।।

यापरि सकल सुखें जी देई, दु:खें समस्त जी वारी,
त्या विद्यादेवीतें अनन्यभावें सदा भजा भारी. ।।६।।





## स्वाध्याय

**प्र. १. खालील आकृत्या पूर्ण करा.**

(अ) विद्येमुळे व्यक्तीला प्राप्त होणाऱ्या गोष्टी

(आ) कवीच्या मते विद्येची वैशिष्ट्ये

**प्र. २. तुलना करा.**

| धन | विद्या |
|---|---|
| (१) | (१) |
| (२) | (२) |
| (३) | (३) |

**प्र. ३. खालील ओळींचा तुम्हांला समजलेला अर्थ लिहा.**

नानाविध रत्नांची, कनकांची असति भूषणें फार
परि विद्यासम एकहि शोभादायक नसे अलंकार

**प्र. ४. 'विद्या' हे उत्तर येईल असा प्रश्न तयार करा.**

**प्र. ५. तुमच्या शब्दांत स्पष्ट करा.**

(अ) कवीने वर्णन केलेले विद्येचे महत्त्व.

(आ) 'त्या विद्यादेवीतें अनन्यभावें सदा भजा भारी', या ओळीचा सरळ अर्थ.

## खेळूया शब्दांशी.

**(अ) खालील शब्दांना कवितेतील शब्द शोधा.**

(१) मोठेपण– (२) नेहमी– (३) अलंकार– (४) मनातील इच्छा–

**(आ) खालील शब्दांचे प्रत्येकी पाच समानार्थी शब्द लिहा.**

(१) मित्र– (२) सोने–

M29EHG

# १०. लिओनार्दो दा व्हिंची (स्थूलवाचन)

**अच्युत गोडबोले, दीपा देशमुख** : अच्युत गोडबोले-प्रसिद्ध लेखक. माहिती तंत्रज्ञान व अर्थशास्त्राचे तज्ज्ञ. त्यांनी मराठी वृत्तपत्रे, नियतकालिकांमध्ये विपुल प्रमाणात लेखन-स्तंभलेखन केले आहे. त्यांची 'कॅनव्हास', 'किमयागार', 'ग्रेट भेट', 'झपूर्झा भाग १, २, ३', 'नादवेध', 'बोर्डरूम', 'मनकल्लोळ भाग १ व २', 'मुसाफिर', 'जग बदलणारे बारा जीनिअस', 'नॅनोदय', 'मनात' अशी अनेक पुस्तके प्रसिद्ध आहेत. दीपा देशमुख- प्रस्तुत पाठाच्या सहलेखिका. त्यांनी अच्युत गोडबोले यांच्यासह अनेक पुस्तकांचे लेखन केले आहे. तसेच त्यांचे स्वतंत्र लेखनही प्रसिद्ध आहे.

जागतिक कीर्तीचे चित्रकार लिओनार्दो दा व्हिंची यांचे बालपण, विविध विषयांमध्ये त्यांना असणारी विलक्षण गती आणि चित्रकलेच्या परिपूर्ण आविष्कारासाठी त्यांनी केलेला अभ्यास याची माहिती या पाठातून मिळते. लिओनार्दो यांनी विविध विषयांच्या अभ्यासातून आणि संशोधनातून काढलेली टिपणे अभ्यासकांना आजही कशी उपयुक्त ठरत आहेत हे या पाठातून स्पष्ट होते. प्रस्तुत पाठ 'किशोर', मे २०१७ या मासिकातून घेतला आहे.

इटली नावाच्या देशातलं उंचच उंच पर्वताच्या उतारावरचं व्हिंची नावाचं एक छोटंसं गाव. एका बाजूला आर्नो नावाची खळखळ वाहणारी निळ्याशार पाण्याची नदी, तर दुसरीकडे मोठमोठे डोंगराएवढे खडकच खडक... अशा सुंदर निसर्गरम्य गावात १५ एप्रिल, १४५२ या दिवशी पिएरो आणि कॅटेरिना यांच्या पोटी लिओनार्दो दा व्हिंची याचा जन्म झाला.



लहानपणी लिओनार्दो डोंगरदऱ्यांतून मनसोक्त भटकला. निसर्गात राहिल्यामुळे त्याला चित्रकला, संगीत, पक्षी, प्राणी, गणित, विज्ञान आणि एकूणच निसर्ग यांबद्दल खूपच कुतूहल वाटायचं. याच वयात त्याला चित्रं काढणं खूप आवडायला लागलं. त्याचे वडील 'कशाला चित्रं काढतोस ?' असं म्हणून त्याला कधीही रागावले नाहीत. लिओनार्दोला चित्रं काढायला इतकं आवडू लागलं, की तो तहानभूक विसरून जात असे. आपली चित्रं खरीखुरी वाटली पाहिजेत म्हणून लिओनार्दो नाना तऱ्हेचे प्रयोग करायचा. तो चक्क जंगलात फिरून पाली, सरडे, साप, वटवाघूळ असं काय काय गोळा करून आणायचा आणि घरी आल्यावर त्यांचं निरीक्षण करत बसायचा.

दहा ते बारा वर्षांचा असताना लिओनार्दो वडिलांबरोबर फ्लोरेन्स शहरात राहायला आला. त्या वेळेचं फ्लोरेन्स हे बुद्धिमंत, चित्रकार, शिल्पकार, कारागीर, व्यापारी, श्रीमंत लोक आणि तत्त्वज्ञ यांचं शहर होतं. वयाच्या चौदाव्या वर्षांपासून ते सत्ताविसाव्या वर्षांपर्यंत लिओनार्दोनं व्हेरोशिओ या त्या वेळच्या विख्यात चित्रकाराकडे चित्रकलेचं शिक्षण घेतलं. चित्रकलेशिवाय लिओनार्दोनं अनेक गोष्टी आत्मसात केल्या होत्या. तसंच गंमत म्हणजे लिओनार्दो त्याच्या वहीत 'वर्गमुळांचा गुणाकार कसा करायचा हे ल्यूकाकडे जाऊन शिकून घे' असं स्वत:च स्वत:ला सूचना दिल्यासारखं काय काय लिहून ठेवत असे. त्याला गणित अणि तंत्रज्ञान हे विषयही खूप आवडत. विश्व कसं निर्माण होतं, प्रलय का आणि कसा होतो ? या प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी त्यानं खगोलशास्त्राचाही अभ्यास केला होता.

ॲन्टोनिओ डेल पॉलिओलो हा शरीररचनेचा अभ्यास करणारा आणि मृतदेहांचं विच्छेदन करणारा पहिलावहिला चित्रकार म्हणून ओळखला जातो. त्याच्या स्टुडिओत जाऊन लिओनार्दो शरीराची आणि स्नायूंच्या रचनेची माहिती करून घेत असे. चित्र काढताना प्रत्येक अवयवाचं प्रमाण आणि रचना यांच्या तो गणिती पद्धतीने नोंदी करून मगच त्यांची रेखाटनं करत असे. लिओनार्दो शिल्पकलेपेक्षा चित्रकलेला जास्त श्रेष्ठ दर्जाची कला मानत असे. 'शिल्पकला यांत्रिक असून मेंदूला कमी ताण देणारी असते. शिल्पकार दगडातला नको असलेला भाग काढत राहतो;

पण चित्रकार चित्रातल्या जागा हव्या असलेल्या गोष्टींनी भरत राहतो', असं त्यानं लिहून ठेवलं होतं. प्रत्येक गोष्टीच्या मुळाशी गेल्याशिवाय आणि ती गोष्ट नीट समजल्याशिवाय लिओनार्दो कामाला सुरुवातच करत नसे. कल्पनाशक्ती ही विचाराच्या आधी येते आणि नंतर आकार येतात असंही त्याला वाटे. १४७२ साली लिओनार्दोनं ख्रिश्चन कथेवर आधारलेलं 'ॲनन्सिएशन' नावाचं पहिलं तैलचित्र काढलं. लहानपणापासूनच लिओनार्दोला स्पर्धा करणं आणि वादविवाद करणं आवडत नसे. तो खूपच शांतताप्रिय होता. जिथे पक्षी विक्रीला ठेवलेले असत, तिथे जाऊन लिओनार्दो तो विक्रेता म्हणेल त्या किमतीला ते पक्षी विकत घेऊन लगेचच त्यांना पिंजऱ्यातून मुक्त करत असे. युद्ध आणि युद्धामुळे होणारा रक्तपात आणि मनुष्यहानी या गोष्टींबद्दल त्याला प्रचंड तिटकारा होता. लिओनार्दो दिसायला अत्यंत देखणा होता. उठावदार गुलाबी रंगाचे कपडे घालणं आणि टापटीप राहणं लिओनार्दोला खूपच आवडे. त्याचा आवाजही सुरेल होता. त्यामुळे तो गायला लागला, की लोक मंत्रमुग्ध होऊन त्याचं गाणं ऐकत. ल्यूट नावाचं तंतुवाद्य वाजवण्यात तो वाकबगार होता. तो नेहमीच प्रसन्न आणि आनंदी असे आणि सगळ्यांशी मिळून मिसळून वागत असे.



लिओनार्दोची सर्वोत्कृष्ट समजली जाणारी, प्रचंड गाजलेली जगप्रसिद्ध कलाकृती म्हणजे 'मोनालिसा'चं चित्र.

१५०३ ते १५०५ अशी तीन वर्षं लिओनार्दो या चित्रावर काम करत होता. मोनालिसाच्या चेहऱ्यावरचं स्मित आजही भल्याभल्यांना कोड्यात टाकतं. फ्रान्सेस्को दी बार्टोलामिओ डेल गिओकोंडो नावाच्या एका व्यापाऱ्याच्या मोनालिसा उर्फ मॅडोना लिसा नावाच्या चोवीस वर्षांच्या बायकोचं हे चित्र होतं. हे चित्र 'ला गिओकोंडा' या नावानंही ओळखलं जातं. हे चित्र काढताना लिओनार्दोनं मोनालिसा हिला मॉडेल म्हणून बसून राहण्याचा कंटाळा येऊ नये, म्हणून तिचं मन रमवण्यासाठी गायक-वादकही ठेवले होते असं म्हणतात. आजही इतक्या वर्षांनंतर मोनालिसाच्या डोळ्यांतली ओलसर चमक आणि तेज अचंबित करणारं आहे. 'मोनालिसा' हे चित्र आज पॅरिसच्या 'लुव्र' संग्रहालयात आहे.

लिओनार्दो दा व्हिंची कोण नव्हता? तो एकाच वेळी चित्रकार, शिल्पकार, वास्तुशास्त्रज्ञ, शरीरशास्त्रज्ञ, गणिती, वैज्ञानिक, संशोधक, लष्करी अभियंता, साहित्यिक, संगीतकार, नेपथ्यकार, लेखक, तंत्रज्ञ आणि तत्त्वज्ञ या सगळ्या भूमिका निभावणारा कलावंत होता! लिओनार्दोनं काढलेल्या 'मॅडोना ऑन दी रॉक्स', 'लास्ट सपर' आणि 'मोनालिसा' यांसारख्या मोजक्या चित्रांनी त्याचं नाव जगात अजरामर झालं. लिओनार्दोनं अनेक यंत्रंही तयार केली, अनेकांचे आराखडे तयार केले आणि अनेक गोष्टींचे शोधही लावले. आज आपण जी हेलिकॉप्टर्स बघतो, तशाच हेलिकॉप्टर्सची लिओनार्दोच्या नोंदवह्यांत अनेक रेखाटनं आणि गणितं बघायला मिळतात! सायकल अस्तित्वात येण्यापूर्वी तीनशे वर्षे आधीच लिओनार्दोनं सायकलचा आराखडा तयार करून ठेवला होता. लिओनार्दोच्या नोंदवह्यांचा अभ्यास करून त्यांतली तंत्रं समजून घेण्याचे अभ्यासकांचे प्रयत्न आजही चालू आहेत.

आपल्या आयुष्याच्या अंतापर्यंत लिओनार्दोनं वेगवेगळ्या विषयांवर टिपणं करून ठेवली होती. त्यात प्रकाशविज्ञान, आवाजविज्ञान, मेकॅनिक्स, हैड्रोलिक्स उड्डाण, खगोलशास्त्र, शस्त्रविज्ञान आणि शरीरविज्ञान यांच्याविषयीचं संशोधन करून विचार आणि इतर माहितीही त्यानं टिपली होती. साडेतीन हजार पानं होतील अशा त्याच्या एकोणवीस वह्या आजही उपलब्ध आहेत.

२ मे, १५१९ या दिवशी वयाच्या सदुसष्टाव्या वर्षी, कला आणि विज्ञान या दोन्हीही शाखेत संचार करणाऱ्या लिओनार्दोनं या जगाचा कायमचा निरोप घेतला. आपली चित्रं, शिल्पं, आपण बांधलेल्या इमारती, पूल, तसंच आपलं संशोधन हे सारं सारं जगासाठी तो आपल्यामागे ठेवून गेला.



## स्वाध्याय

**प्र. १. फरक स्पष्ट करा.**

लिओनार्दो यांनी वर्णिलेला चित्रकला व शिल्पकला यांतील फरक

| चित्रकला | शिल्पकला |
|---|---|
| | |

**प्र. २. तुमच्या शब्दांत स्पष्ट करा.**

(अ) ‘आजही लोक लिओनार्दो यांच्या नोंदवह्यांचा अभ्यास करतात’ या विधानामागील कारण.

(आ) तुमच्या मते लिओनार्दो यांचे जगावर असलेले ऋण.

(इ) ‘चित्रकार’ म्हणून लिओनार्दो हे अजरामर होण्याची कारणे.

## खेळूया शब्दांशी.

**(अ) खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यांत उपयोग करा.**

(अ) तहानभूक विसरणे.

(आ) मंत्रमुग्ध होणे.

(इ) कोंड्यात टाकणे.

**(आ) खालील तक्त्यात दिलेली विरामचिन्हांची नावे लिहा व त्यांचा वापर करून वाक्ये तयार करा.**

| विरामचिन्हे | विरामचिन्हाचे नाव | वाक्य |
|---|---|---|
| . | | |
| ; | | |
| ? | | |
| ! | | |
| ‘ ’ | | |
| “ ” | | |

## शोध घेऊया.



- **पाच भारतीय चित्रकारांची आंतरजालावरून माहिती मिळवा आणि लिहा.**



## लिहिते होऊया.

- **‘माझी आवडती कला’ या विषयावर दहा ओळींत माहिती लिहा.**

## ओळख स्वत:ची

लिओनार्दो यांच्यामध्ये अनेक गुण होते. पाठ वाचून त्या गुणांची यादी तयार करा. या गुणांपैकी कोणते गुण तुमच्यात आहेत त्याची पडताळणी करा. नसल्यास ते अंगी बाणवण्याचा प्रयत्न करा. गुण : उदा., प्रत्येक गोष्टीच्या मुळाशी गेल्याशिवाय आणि ती गोष्ट नीट समजल्याशिवाय लिओनार्दो कामाला सुरुवातच करत नसे, म्हणजे नीट समजून घेऊन काम करत असे.

## आपण समजून घेऊया.

| प्रकार | वैशिष्ट्ये व नियम | उदाहरण |
|---|---|---|
| **व्यंजनसंधी** | एकमेकांशेजारी येणाऱ्या वर्णांपैकी दोन्ही व्यंजने असतील किंवा पहिला वर्ण व्यंजन आणि दुसरा वर्ण स्वर असेल तर तेव्हा **'व्यंजनसंधी'** होते. | सत् + जन = सज्जन<br>त् + ज् = ज्ज } **दोन्ही व्यंजने**<br>चित् + आनंद = चिदानंद<br>त् + आ = दा } **व्यंजन + स्वर** |
| **प्रथम-व्यंजनसंधी** | पहिल्या पाच वर्गांपैकी (क, च, ट, त, प) अनुनासिकाशिवाय कोणत्याही व्यंजनापुढे कठोर व्यंजन आल्यास त्या पहिल्या व्यंजनाच्या जागी त्याच्याच वर्गातील पहिले कठोर व्यंजन येऊन संधी होतो. | विपद् + काल = विपत्काल<br>द् + क् = त् + क् = त्क्<br>वाग् + पति = वाक्पती<br>ग् + प् = क् + प् = क्प् |
| **तृतीय-व्यंजनसंधी** | पहिल्या पाच वर्गांतील कठोर व्यंजनापुढे स्वर किंवा अनुनासिकाशिवाय मृदू व्यंजन आल्यास त्याच्या जागी त्याच वर्गातील तिसरे व्यंजन येऊन संधी होतो. | वाक् + ईश्वरी = वागीश्वरी<br>क् + ई = ग् + ई = गी<br>अप् + ज = अब्ज<br>प् + ज् = ब् + ज् = ब्ज् |
| **अनुनासिक संधी** | पहिल्या पाच वर्गांतील कोणत्याही व्यंजनापुढे अनुनासिक आल्यास पहिल्या व्यंजनाबद्दल त्याच्याच वर्गातील अनुनासिक व्यंजन येऊन संधी होतो. | वाक् + निश्चय = वाङ्निश्चय<br>क् + न = ङ् + न्<br>षट् + मास = षण्मास<br>ट् + म् = ण् + म् |

| | | |
|---|---|---|
| **अनुस्वार किंवा शीर्षबिंदू** | 'म्' पुढे स्वर आल्यास तो स्वर मागील 'म्' मध्ये मिसळतो. व्यंजन आल्यास मागील 'म्' बद्दल मागील अक्षरावर अनुस्वार किंवा शीर्षबिंदू येतो. | सम् + आचार = समाचार<br>म् + आ = मा<br>सम् + गती = संगती<br>म् + ग् = सं |

- **खालील शब्दांचे संधिविग्रह पूर्ण करून तक्ता पूर्ण करा.**

| संधी | संधिविग्रह |
|---|---|
| शरत्काल | ........... + ........... |
| जगन्नाथ | ........... + ........... |
| तल्लीन | ........... + ........... |
| संताप | ........... + ........... |

- **खालील तक्ता पूर्ण करा.**

| संधिविग्रह | संधी |
|---|---|
| सत् + आचार | |
| सत् + मती | |
| शब्द् + छल | |
| शरद् + चंद्र | |

[**टीप :** जिथे उच्चाराची तीव्रता दिसते ती कठोर व्यंजने समजावीत आणि तुलनेने ज्यांचा उच्चार सौम्य असतो त्यांना मृदू व्यंजने समजावीत.]

**कठोर व्यंजने** – क्, ख्, च्, छ्, ट्, ठ्, त्, थ्, प्, फ्


**मृदू व्यंजने** – ग्, घ्, ज्, झ्, ड्, ढ्, द्, ध्, ब्, भ्

## बातमी लेखन

दैनंदिन व्यवहारात घडणाऱ्या घटनांच्या बातम्या आपण वृत्तपत्रे, टी. व्ही., रेडिओ यांसारख्या माध्यमांतून वाचत व ऐकत असतो. त्यामुळे घडून गेलेल्या, घडत असलेल्या आणि घडणाऱ्या विविध घटनांविषयी आपणाला सविस्तर माहिती बातमीच्या माध्यमातून मिळत असते.

- **बातमी लेखनासाठी आवश्यक गुण–**

(१) लेखन कौशल्य.
(२) भाषेचे उत्तम ज्ञान.
(३) व्याकरणाची जाण.
(४) सोपी, सुटसुटीत वाक्यरचना.
(५) चौफेर वाचन.



- खालील बातमी वाचून त्या खाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.

**जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, उत्रौली या शाळेत कला शिबिराचा समारोप संपन्न.**

दिनांक : २० डिसेंबर

***लोकप्रतिभा***

## *चित्रकला शिबिराचा समारोप*

उत्रौली (ता. भोर) : उत्रौली येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत दहा दिवसांचे चित्रकला शिबिर नुकतेच संपन्न झाले. १९ डिसेंबर रोजी दुपारी ४.०० ते ६.०० या वेळात शिबिराचा समारोप समारंभ साजरा झाला. या शिबिराची सांगता प्रसिद्‌ध चित्रकार श्री. अविनाश शिवतरे यांच्या सप्रात्यक्षिक मनोगताने करण्यात आली.

आपल्या जीवनातील कलेचे महत्त्व सांगताना प्रत्येकाने कोणती-ना-कोणती कला शिकणे आवश्यक आहे, हा विचार त्यांनी आपल्या मनोगतातून व्यक्त केला. समारंभाचे अध्यक्षस्थान प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक श्री. सदाशिव शिंदे यांनी भूषवले. कलाशिक्षिका श्रीमती सुनीता सोमण यांनी प्रमुख पाहुणे व उपस्थितांचे आभार मानले.

या निमित्ताने सर्व पंचवीस शिबिरार्थींच्या चित्रांचे प्रदर्शन भरवण्यात आले होते. त्याला रसिकांचा उदंड प्रतिसाद मिळाला.

(१) **कोण ते लिहा.**

(अ) समारंभाचे प्रमुख पाहुणे-

(आ) समारंभाचे अध्यक्ष-

(इ) चित्रकला प्रदर्शनास प्रतिसाद देणारे-

(२) **चौकट पूर्ण करा.**

(अ) शिबिरार्थींची संख्या

(आ) शिबिरार्थींनी शिबिरात शिकलेली कला

(इ) शिबिराचे ठिकाण

(ई) शिबिर सुरू झाले ती तारीख

(३) **वरील बातमीमध्ये ज्या ज्या गोष्टींविषयी माहिती दिलेली आहे ते घटक लिहा.**

M2IAJ4

# ११. स्वामी विवेकानंदांची भारतयात्रा

भाग–३

**सुनील चिंचोलकर** (१९५१–२०१८) : सुप्रसिद्ध लेखक, संत साहित्याचे अभ्यासक. ‘संस्काराचे मोती’, ‘समर्थ रामदासांचे व्यवस्थापन’, ‘विद्यार्थ्यांचे श्री रामदास’, ‘श्री दासबोध विवरण संच (भाग १ ते ६)’, ‘दहा संत चरित्रे’ इत्यादी चाळीस पुस्तके प्रकाशित. शिवसमर्थ पुरस्कार, कृतज्ञता पुरस्कार, समर्थ रामदास पुरस्कार इत्यादी पुरस्कारांनी सन्मानित.

या पाठात स्वामी विवेकानंदांच्या भारतयात्रेदरम्यानचे प्रसंग आले आहेत. त्यात स्वामी विवेकानंदांच्या वाचनाची गती, त्यांची आकलनशक्ती या विषयीचे वर्णन आले आहे. भारतयात्रेच्या समारोप प्रसंगी कन्याकुमारी येथील शिलाखंडावर स्वामी तीन दिवस ध्यानस्थ बसले होते. सलग तीन दिवस आणि तीन रात्री त्यांनी भारतभूमीच्या सद्यस्थितीचे आणि त्या परिस्थितीमध्ये परिवर्तन घडवून आणण्याविषयीचे चिंतन केले. या प्रसंगातून स्वामीजींची राष्ट्रभक्ती आणि जनसामान्यांच्या जीवनात परिवर्तन घडवून आणण्याची आंतरिक तळमळ दिसून येते. प्रस्तुत पाठ हा ‘मानवतेचा महापुजारी : स्वामी विवेकानंद’ या पुस्तकातून घेतला आहे.



ज्या देशाची आपल्याला सेवा करायची आहे, ज्या समाजाची आपल्याला सेवा करायची आहे, तो देश, तो समाज एकदा डोळ्यांखालून घालावा, म्हणून स्वामी विवेकानंदांनी हिमालयापासून कन्याकुमारीपर्यंत भ्रमण केले.

पोरबंदरच्या वास्तव्यामध्ये स्वामी विवेकानंद काही इंग्रजी ग्रंथांचे खंडच्या खंड वाचत असत. ते रोज एक खंड वाचायचे आणि तो ग्रंथपालाला परत करायचे. त्यांनी तीन खंड एकेका दिवसात वाचून परत केले. ग्रंथपालाने स्वामीजींच्या शिष्याला विचारले, की ‘‘स्वामीजी, न वाचता पुस्तकं परत करतात वाटतं, कारण एका दिवसामध्ये एवढा मोठा खंड वाचून होणे हे शक्यतेच्या बाहेर आहे. असे घडूच शकत नाही. काही लोकांना ग्रंथालयातून जाडीजाडी पुस्तकं न्यायची आणि न वाचता ती परत करायची अशी सवय असते. थोडं चाळायचं आणि वाचल्यासारखं दाखवायचं. तसंच बहुतेक हा साधू करत असेल.’’ शिष्यांनी हे सगळे स्वामीजींना सांगितले. चौथ्या दिवशी चौथा खंड घेण्यासाठी स्वामीजी स्वत: गेले. त्यांनी तो ग्रंथपालाकडे मागितला आणि त्याला सांगितले, ‘‘पहिले तीन खंड माझे पूर्ण वाचून झालेले आहेत. तुम्हांला शंका असेल, तर त्यातले तुम्ही काहीपण विचारू शकता.’’

आता स्वामीजींनीच आव्हान दिल्यामुळे ग्रंथपालाने विचार केला, की हे जाणून घेऊया की ते किती प्रामाणिक आहेत. ग्रंथपालाने स्वामीजींना त्या तीन खंडांतले उभे–आडवे प्रश्न विचारले. तो जे प्रश्न विचारायचा त्याचे उत्तर ज्या पानावर असायचे, ते अर्धे–पाऊण पान स्वामीजी कंठस्थ सांगायचे. हे पाहून त्या ग्रंथपालाने सांगितले, ‘हे मानवी कक्षेच्या बाहेरचे काम आहे.’

खेत्रीच्या महाराजांनी एकदा स्वामीजींना विचारले, ‘‘स्वामीजी एवढे लक्षात ठेवणे तुम्हांला कसे शक्य होते?’’ स्वामीजींनी खेत्रीच्या महाराजांना दिलेले उत्तर फार तर्कशुद्ध आहे, तर्कसंगत आहे. स्वामीजींनी सांगितले, ‘‘मी माझं मन कुठेही एकाग्र करू शकतो, तसेच माझा तासन्‌तास ध्यानाचा अभ्यास असल्यामुळे मी जे वाचतो, त्यावर मन केंद्रित झाल्यामुळे माझ्या ते लक्षात राहते, पाठ होऊन जाते.’’ पुढे स्वामीजी म्हणाले, ‘‘असं बघा राजेसाहेब, आपण मुलांना अक्षरे शिकवतो, शब्द शिकवतो आणि त्यानंतर वाक्य शिकवतो. आपण वाक्यापाशी

थांबतो. वाक्य बोलता येणे, वाक्य वाचता येणे, वाक्य लिहिता येणे आपल्या शिक्षणाची शेवटची पायरी आहे. त्यापुढे जाऊन जर प्रयत्न केला, आपल्या मनाची, बुद्धीची आणि नेत्रेंद्रियांची शक्ती आणखी विकसित करू शकलो, तर आपल्याला एकदम परिच्छेद वाचता येईल. मी ग्रंथाचे परिच्छेदच्या परिच्छेद एका दृष्टिक्षेपात वाचतो. काही ग्रंथांची पानेच्या पाने मी वाचू शकतो.''

जेव्हा स्वामी विवेकानंद कन्याकुमारीला आले, तेव्हा त्यांनी कन्याकुमारीचे दर्शन घेतले. मनाला अतिशय आनंद झाला आणि दर्शन घेऊन ते बाहेर आले, समुद्राच्या काठी उभे राहिले. सगळीकडे अनंत अनंत असा तीन दिशेला सागर पसरलेला. एकदम स्वामीजींचे लक्ष गेले, की मध्यभागी एक-दीड फर्लांग अंतरावर दोन शिलाखंड आहेत आणि ते पाण्याच्या भरपूर वर आहेत. तिथे आपण गेलो तर?

त्यांनी तिथे असणाऱ्या त्या नावाड्यांना विचारले, ''ते काय आहे?'' नावाडी म्हणाले, ''त्याला श्रीपादशिला म्हणतात.'' स्वामी विवेकानंदांच्या मनात आले, की आपली भारतयात्रा आता संपत आहे. आपण देशाच्या टोकापर्यंत आलेलो आहोत; पण जिथे आपण उभे आहोत ते देशाचे टोक नाही. तो शिलाखंड हे देशाचं टोक आहे. त्या शिलाखंडावर आपण जावे. कन्याकुमारीच्या चरणी भारतयात्रा समर्पित करावी. या भावनेने स्वामी विवेकानंदांनी एका नावाड्याला सांगितले, ''बाबा रे, मला तू त्या शिलाखंडावर सोड.'' नावाड्याने सांगितले, ''तुम्हांला पाच पैसे मला द्यावे लागतील.'' स्वामीजी म्हणाले, ''माझ्याकडे पैसे काहीच नाहीत. मी निष्कांचन संन्यासी आहे.'' नावाडी म्हणाले, ''ते तुमचे तुम्ही बघा. आम्ही पैसे घेतल्याशिवाय तुम्हांला सोडणार नाही.'' स्वामी विवेकानंदांनी एकदम त्या सागरामध्ये उडी मारली. कल्पना करा, फर्लांग-दीड फर्लांग अंतर पोहत जायचे होते. त्यात स्वामीजींना आणखी एक धोका माहीत नव्हता. कन्याकुमारीच्या त्या समुद्रामध्ये शार्क मासे आहेत आणि या शार्क माशांचा जबडा इतका जबरदस्त असतो, की त्यातले दात हे हत्तीच्या सुळ्यांसारखे असतात. एखादा मनुष्य जर जबड्यांमध्ये सापडला, तर ते त्याला काकडीसारखे तोडून तोडून खाऊन टाकतात. जेव्हा स्वामी विवेकानंदांनी समुद्रात उडी मारली, तेव्हा ते नावाडी घाबरून गेले. लगेच त्या दोघा-तिघांनी आपल्या नावा काढल्या आणि स्वामीजींचा पाठलाग सुरू केला. त्यांना वाटले, या माणसाला वाटेत काही संकट आले तर? दम संपला तर? स्वामीजी त्या खडकावर, शिलाखंडावर पोहोचले. त्या नावाड्यांच्या लक्षात आले, की हा संन्यासी सामान्य मनुष्य नाही. हा कोणीतरी अद्वितीय शक्तिशाली मनुष्य आहे.

स्वामीजी त्यांना म्हणाले, ''मी आता दोन-तीन दिवस इथेच राहणार आहे.'' तेव्हा ते नावाडी आणखी थक्क झाले. स्वामीजी तीन दिवस तिथे राहिले. रात्री एकटे, सोबतीला कोणी नाही. तीन दिवस नुसते थांबले नाहीत. ते ध्यानस्थ बसले, त्यांना काहीतरी खायला द्यावे म्हणून अनेकदा हे नावाडी लोक यायचे आणि त्यांच्यासाठी काहीतरी खाण्याचे आणायचे. त्यांना हाका मारायचे; पण त्यांच्या लक्षात आले, की स्वामीजी भावसमाधीमध्येच आहेत. त्यांना काही ऐकू जात नाही. त्या नावाड्यांना किती वाईट वाटले असेल, की आपण पाच पैशासाठी या माणसाला नाही म्हणून म्हटले; पण त्यामुळेच स्वामीजींचा अंत:स्थ अग्नी प्रदीप्त झाला. स्वामीजी म्हणतात, ''जितका विरोध असेल, जितकी प्रतिकूलता असेल, तितका माणसातला अंत:स्थ अग्नी प्रदीप्त होत असतो. अनुकूलतेमुळे माणसातले फूल कोमेजून जाते. त्याला जरा संघर्ष करता आला पाहिजे. थोडी संकटं असली पाहिजेत. थोडा विरोध असला पाहिजे. म्हणजे माणसातली अंत:स्थ चेतना फुलते.''

स्वामीजी तीन दिवस आणि तीन रात्री तिथे राहिले. तीन दिवस, तीन रात्र ते फक्त भारतमातेचे चिंतन करत होते. डोळ्यांसमोर त्यांना सतत दिसत होता तो आपला भारत. आपल्या भारतातील गोरगरीब जनता. स्वामी विवेकानंदांच्या लक्षात आले, की या देशातले अनेक लोक उपाशी आहेत. त्यांना जेवायला अन्न नाही. त्यांना आपण वेदान्ताचा काय उपदेश करत असतो? भाकरीची भ्रांत असताना, वेदान्त सांगणे धादांत खोटे आहे. लोकांना आधी दोन वेळ जेवायला द्या. खरा धर्म हा सूर्यासारखा सर्वप्रकाशक असतो. वसुंधरेसारखा सर्वसंग्राहक असतो. हे सर्वधर्म समन्वयाचे सूत्र समस्त समाजाला स्वामीजींनी समजावून सांगितले.



## स्वाध्याय

**प्र. १. चौकटी पूर्ण करा.**

खेत्रीच्या महाराजांना स्वामीजींनी दिलेल्या उत्तराची वैशिष्ट्ये

→ ☐ ☐

**प्र. २. वैशिष्ट्ये लिहा.**

(अ) ← श्रीपादशिला →

(आ) ← शार्क मासे →

**प्र. ३. हे केव्हा घडेल ते लिहा.**

(अ) परिच्छेद वाचल्यानंतर तो लक्षात राहील. ______________

(आ) माणसाची अंत:स्थ चेतना फुलेल. ______________

**प्र. ४. परिणाम लिहा.**

(अ) स्वामीजींनी ग्रंथपालाला आव्हान दिले–

(आ) नावाड्यांनी पैशाशिवाय स्वामीजींना नावेतून न्यायचे नाकारले–

**प्र. ५. तुमचे मत लिहा.**

(अ) ग्रंथपालाने स्वामीजींच्या शिष्याजवळ त्यांच्या ग्रंथवाचनाबद्‌दल व्यक्त केलेले मत.

(आ) पैसे घेतल्याशिवाय स्वामीजींना श्रीपादशिलेवर न नेणाऱ्या नावाड्यांबाबत तुमचे मत.

**प्र. ६. स्वामीजींचे खालील गुण दर्शवणारी वाक्ये पाठातून शोधा व लिहा.**

(अ) निर्भयता–

(आ) मनाची एकाग्रता–

(इ) दृढनिश्चय–

(ई) देशप्रेम–

(उ) वाचनप्रेम–

**प्र. ७. तुमचा अनुभव लिहा.**

(अ) 'काम करत असताना एखादे संकट आले, की माणूस जागरूक राहून काम करतो', याविषयी तुमचा अनुभव.

**प्र. ८. खालील दोन प्रसंगांतील फरक स्पष्ट करा.**

स्वामीजींच्या समुद्रात उडी मारण्याबाबतचे नावाड्यांचे विचार

| उडी मारण्यापूर्वी | उडी मारल्यानंतर |
|---|---|
| | |

## खेळूया शब्दांशी.

**(अ) 'निर्भय'पासून 'निर्भयता' भाववाचक नाम तयार होते. त्याप्रमाणे 'ता', 'त्व', 'आळू', 'पणा' हे प्रत्यय लावून तयार झालेली भाववाचक नामे खालील तक्त्यात लिहा.**

| –ता | –त्व | –आळू | –पणा |
|---|---|---|---|
| | | | |

**(आ) खालील वाक्यांतील अधोरेखित शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहून अर्थ न बदलता वाक्य पूर्ण करा.**

(अ) सर्वांनी बेसावध राहून काम करू नये.

(आ) गाडी वेगाने चालवू नये.


(इ) शिळे अन्न खाऊ नये.

(ई) कोणीही कार्यक्रमास अनुपस्थित राहू नये.

(उ) जॉन अप्रमाणिक मुलगा नाही.

**(इ) खालील चौकटींत 'बे' हे अक्षर जोडून नवीन अर्थपूर्ण शब्द तयार करा.**

उदा.,बेसावध.




## शोध घेऊया.



- **गोरगरीब जनतेच्या कल्याणासाठी काम करणाऱ्या भारतातील पाच व्यक्तींची माहिती आंतरजालाचा वापर करून मिळवा. मिळवलेली माहिती वर्गात सांगा. मुद्दे– संक्षिप्त परिचय, उल्लेखनीय कार्य, मिळालेले पुरस्कार.**



## लिहिते होऊया.

- **तुम्ही आतापर्यंत वाचलेल्या पुस्तकांविषयीची माहिती खालील मुद्द्यांच्या आधारे लिहा.**
  **मुद्दे–** पुस्तकाचे नाव, लेखक/लेखिका, पुस्तकाचा विषय, साहित्याचा प्रकार, तुम्हांला आवडलेली पात्रे, त्यातील तुम्हांला विशेष आवडलेल्या घटना इत्यादी.

## आपण समजून घेऊया.

| प्रकार | वैशिष्ट्ये व नियम | उदाहरण |
|---|---|---|
| **विसर्गसंधी** | एकत्र येणाऱ्या वर्णांतील पहिला वर्ण विसर्ग व दुसरा वर्ण व्यंजन किंवा स्वर असतो तेव्हा त्याला **'विसर्गसंधी'** असे म्हणतात. | मन: + रंजन = मनोरंजन<br>न: + रं<br>न् + अ + विसर्ग + र् + अ + अनुस्वार<br>म्हणजे विसर्ग + र् असे वर्ण इथे एकत्र आले व मनोरंजन असा जोडशब्द तयार झाला आहे. |

- **खालील तक्त्याचा काळजीपूर्वक अभ्यास करा व विसर्गसंधीचे काही नियम समजून घ्या.**

| पोटशब्द | एकत्र येणारे स्वर, विसर्ग, संधी | उदाहरण |
|---|---|---|
| यश: + धन | श् + अ + विसर्ग + धन= श् + ओ + धन | यशोधन |
| दु: + जन | (द्) + उ + विसर्ग + जन= (दु) र्ज | दुर्जन |
| नि: + रस | नि + र् + रस = 'र' पुढे 'र्' आणि मागील स्वर दीर्घ होतो. | नीरस |
| नि: + कारण | नि + ष् + कारण = विसर्गाच्या मागे 'इ', 'उ' व पुढे 'क्', 'ख्', 'प्', 'फ्' असताना विसर्गाचा 'ष' होतो. | निष्कारण |
| नि: + चल | नि: + श् + चल = विसर्गाच्या पुढे च, छ आल्यास विसर्गाचा 'श' होतो. | निश्चल |
| मनस् + पटल | स् + प = (:) विसर्ग– शेवटच्या स् पुढे कोणतेही व्यंजन आल्यास 'स' चा विसर्ग होतो. | मन:पटल |
| पुनर् + जन्म | 'र्'च्या मागे अ व पुढे मृदू वर्ण आल्याने 'र्' तसाच राहतो.<br>= अ + र + ज = र्ज | पुनर्जन्म |
| प्रात: + काल | विसर्गाच्या मागे 'अ' हा स्वर आणि पुढे 'क', 'ख', 'प' असल्यास विसर्ग कायम राहतो. | प्रात:काल |
| दु: + शासन | विसर्गाच्या पुढे श्, स् आल्यास विसर्ग **कायम राहतो** किंवा लोप पावतो. | दु:शासन |
| अंत: + स्थ | विसर्गाच्या पुढे श्, स् आल्यास विसर्ग कायम राहतो किंवा **लोप पावतो.** | अंतस्थ |
| नम: + स्कार | विसर्गाच्या पुढे कृ धातूची रूपे आली असताना विसर्गाचा 'स्' होतो. = नम् + स् + कार | नमस्कार |

(वरील तक्त्यात विसर्गसंधी संदर्भातील काही नियम व उदाहरणे दिली आहेत. या उदाहरणांचा सराव करावा.)

- **खालील शब्दांचे संधिविग्रह करून किंवा संधी करून तक्ता पूर्ण करा.**

| संधी | संधिविग्रह |
|---|---|
| अधोमुख | ........... + ........... |
| दुर्दैव | ........... + ........... |
| मनोबल | ........... + ........... |
| दुष्कीर्ती | ........... + ........... |
| बहिष्कृत | ........... + ........... |

- **खालील तक्ता पूर्ण करा.**

| संधिविग्रह | संधी |
|---|---|
| मन: + वृत्ती | |
| नि: + विवाद | |
| मन: + धैर्य | |
| तेज: + पुंज | |
| आयु: + वेद | |

- **मराठीचे– विशेष संधी.**

| | | |
|---|---|---|
| **(१) पूर्वरूप संधी** | कधी कधी दोन स्वर एकापुढे एक आले असता त्यातील पहिला स्वर (=पूर्व स्वर) न बदलता तसाच राहतो व दुसरा स्वर लोप पावतो. (लोप होणे म्हणजे नाहीसा होणे.) | नाही + असा = नाहीसा<br>ई + अ = अ चा लोप<br>नदी + आत = नदीत<br>ई + आ = आ चा लोप |
| **(२) पररूप संधी** | कधी कधी शब्दांचा संधी होताना पहिल्या पदातील शेवटचा स्वर लोप पावतो व दुसरा स्वर (=पर स्वर) कायम राहून संधी होते. | घर + ई = घरी<br>अ + ई = अ चा लोप<br>भेट + ऊन = भेटून<br>अ + ऊ = अ चा लोप |

(वरील तक्त्यात दिल्याप्रमाणे पूर्वरूप संधी व पररूप संधी यांच्या नियमाप्रमाणे इतरही काही विशेष संधी पाहायला मिळतात.)



## वाचा.

- उतारा वाचा व त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.

पुस्तकाकडे केवळ कागदांवर छापलेला मजकूर इतक्या मर्यादित अर्थाने पाहता येणार नाही. पुस्तकांनाही जीव असतो. त्यांना स्वत:चं व्यक्तिमत्व असतं. पुस्तकं आपल्याशी बोलण्यासाठी उत्सुक असतात. गरज असते ती आपण त्यांच्याशी बोलण्याची; संवाद साधण्याची! एकदा का पुस्तकांशी मैत्री जुळली, नातं निर्माण झालं, की मग पुस्तकांकडून फक्त घेत राहायचं. परमेश्वरानं आपल्याला एकच आयुष्य दिलं आहे; पण या एकाच आयुष्यात अनेक आयुष्ये जगण्याचा अनुभव आपल्याला केवळ पुस्तकंच देऊ शकतात. शिवकथा वाचायला लागलो, की त्यांच्या शब्दाशब्दांतून इतिहास जिवंत होतो. जंगलाबाबतचं वर्णन वाचताना घनदाट अरण्य, सृष्टीची मनोहारी रूपं पाहत पशुपक्षी, प्राण्यांशी संवाद साधतो, विनोदी कथेमुळे भन्नाट आणि गमतीदार लोकांच्या विश्वात आपण हरवून जातो, तर चरित्र वाचताना प्रतिकूल परिस्थिती आणि थोरामोठ्यांचे कार्य आपल्याला अंतर्मुख बनवते. पुस्तक हे आयुष्याला संपन्न आणि श्रीमंत करणारं ज्ञानभांडार आहे. त्यातून मनोरंजन तर होतंच आणि जाणिवाही प्रगल्भ होतात. शरीराला आवश्यक असणारी जीवनसत्त्वे अन्नातून, तर मन आणि बुद्धी यांच्या भरण पोषणासाठी आवश्यक सत्त्वे केवळ पुस्तकेच देतात म्हणूनच पुस्तक प्रकाशवाटा दाखवणारा मित्र असतो. त्याच्याशी नातं जोडायलाच हवं.

(१) पुस्तकांची वैशिष्ट्ये कोणती?

(२) पुस्तकांना लेखकांनी कोणती उपमा दिली आहे?

(३) 'थोरामोठ्यांची चरित्रे' आणि 'विनोदी कथा' वाचनाचा तुमच्या मनावर कोणता परिणाम होतो, असे लेखकांना वाटते.

(४) पुस्तकांशी मैत्री करण्याचे फायदे तुमच्या शब्दांत लिहा.

## सुविचार

- संकटांना घाबरून न जाता जो जीवन यशस्वी करतो तोच खरा पराक्रमी होय.
- मैत्री ही नात्यापेक्षा कितीतरी श्रेष्ठ आहे.
- नम्रता हा सर्व सद्गुणांचा पाया होय.
- आवड आणि आत्मविश्वास असेल तर कोणतीही गोष्ट अवघड नाही.
- शरीराला श्रमाकडे, बुद्धीला मनाकडे आणि हृदयाला भावनेकडे वळवणे म्हणजे शिक्षण होय.
- अनुभवासारखा उत्तम शिक्षक नाही.

H2S6KR

# १२. गोधडी

**डॉ. कैलास दौंड** (१९७३) : मराठी ग्रामीण कादंबरीकार. ग्रामजीवनातील वास्तवाचे चित्रण करणारे लेखक-कवी म्हणून प्रसिद्ध. त्यांच्या 'पाणधुई' व 'कापूसकाळ' या कादंबऱ्या; 'उसाच्या कविता', 'वसाण', 'भोग सरू दे उन्हाचा', 'अंधाराचा गाव माझा' हे कवितासंग्रह; 'एका सुगीची अखेर' हा कथासंग्रह; 'तऱ्होळीचं पाणी' हा ललित लेख संग्रह इत्यादी लेखन प्रसिद्ध. लेखनासाठी पंचवीसहून अधिक साहित्य पुरस्कारांनी सन्मानित.

गोधडी हे केवळ पांघरूण नव्हे, तर दारिद्र्याने पोळलेल्या जगण्यावर फुंकर घालणाऱ्या प्रेमाचा, मायेचा स्पर्श होय. गोधडी हे आईवडिलांच्या कष्टमय जीवनाचे प्रतीक आहे. गोधडीच्या रूपाने कौटुंबिक नात्यामधील आठवणींचा गोफ विणला आहे. याविषयीचे भावस्पर्शी चित्रण प्रस्तुत कवितेतून कवीने केले आहे. प्रस्तुत कविता 'ऊसाच्या कविता' या काव्यसंग्रहातून घेतली आहे.

- **ऐका. वाचा. म्हणा.**

**गोधडी म्हणजेच**
**नसतो फक्त चिंध्यांचा बोचका**
**गोधडी म्हणजेच गोधडी असते.**
**मायेलाही मिळणारी ऊब असते.**
**गोधडीला असते अस्तर**
**बापाच्या फाटक्या धोतराचे**
**किंवा**
**आईला बापाने घेतलेल्या**
**फाटक्या लुगड्याचे**
**आत-**
**गोधडीत**
**अनेक चिंध्या असतात**
**बसलेल्या दाटीवाटीनं**
**आईनं दटावून बसवलेल्या.**
**तेव्हा त्या फक्त चिंध्याच नसतात**
**त्यात असतो**
**मामानं घेतलेला, भाच्याचा**
**जीर्ण कुडता**
**माहेरातून आलेलं**
**आईच्या लुगड्याचं पटकुर**
**आणि**
**पहिल्या संक्रांतीला**
**बानं घेतलेलं-**
**आईनं असंख्य ठिगळं लावलेलं**
**तिचं लाडकं लुगडं**
**आणि**
**बाच्या कोपरीच्या बाह्या**
**आईनं ते सगळं**
**स्मृतीच्या सुईनं**
**शिवलेलं असतं त्यात.**
**म्हणून गोधडी म्हणजे**
**नसतो चिंध्यांचा बोचका**
**ऊब असते ऊब!**



## स्वाध्याय

**प्र. १. आकृत्या पूर्ण करा.**

(अ) गोधडीची वैशिष्ट्ये

(आ) गोधडीत चिंधीच्या स्वरूपात आठवणीत दडलेल्या व्यक्ती

**प्र. २. कवितेच्या आधारे आईची वैशिष्ट्ये लिहा.**

(अ) ............. (आ) ............ (इ) ............ (ई) ............

**प्र. ३. तुमच्या घरातल्या एखाद्या जुन्या वस्तूशी जुळलेले तुमचे भावनिक नाते तुमच्या शब्दांत व्यक्त करा.**

**प्र. ४. आईविषयीच्या भावना व्यक्त करणारे कवितेतील शब्द/शब्दसमूह लिहा.**

**प्र. ५. खालील ओळींतील भाव स्पष्ट करा.**

(अ) 'गोधडीला आईच्या फाटक्या लुगड्याचे आणि बापाच्या फाटक्या धोतराचे अस्तर असते.'

(आ) 'गोधडी म्हणजे नसतो चिंध्यांचा बोचका, ऊब असते ऊब.'



## लिहिते होऊया.

- **'गोधडीचे आत्मकथन' या विषयावर दहा ते पंधरा ओळी निबंध लिहा.**

**उपक्रम :** आईने घरातील टाकाऊ वस्तूंपासून जशी स्वकष्टाने गोधडी बनवली, तशी 'मकरसंक्रांत' या सणाला प्रेमाची भेट देण्यासाठी टाकाऊ वस्तूंपासून भेटकार्डे बनवा. मित्रांना, नातेवाईकांना, शिक्षकांना प्रेमाने भेट द्या.

## आपण समजून घेऊया.

आपण जेव्हा कथा, कादंबरी, कविता, नाटक वगैरे साहित्य वाचतो, तेव्हा दैनंदिन जगण्यातील भाषेपेक्षा थोडी वेगळी भाषा आपल्याला वाचायला मिळते. आपल्याला साहित्य वाचनाचा आनंद मिळवून देण्यात या भाषेचा मोठा वाटा असतो. दैनंदिन व्यवहारातील भाषेपेक्षा साहित्याची भाषा ज्या घटकांमुळे वेगळी ठरते, त्यांतील एक घटक म्हणजे 'अलंकार'.

**अलंकाराचे दोन प्रकार**

**(अ) शब्दालंकार**
यमक, अनुप्रास, श्लेष

**(आ) अर्थालंकार**
उपमा, उत्प्रेक्षा, रूपक, अपन्हुती, व्यतिरेक, चेतनगुणोक्ती इत्यादी.

**(अ) आता आपण शब्दालंकारातील 'यमक' आणि 'अनुप्रास' या अलंकाराचा अभ्यास करूया.**

## (१) यमक अलंकार

- **खालील ओळी वाचा व निरीक्षण करा.**

मना चंदनाचे परी त्वा झिजावे ।
परी अंतरी सज्जना नीववावे ।।

अधोरेखित शब्दांच्या उच्चारांमध्ये साम्य आढळते का? [ ]

कवितेच्या चरणाच्या शेवटी, मध्ये, किंवा ठरावीक ठिकाणी एक किंवा अनेक अक्षरे वेगळ्या अर्थाने आल्यास, तेथे '**यमक**' हा अलंकार होतो.

- **खालील ओळी वाचा व ज्यामुळे यमक अलंकार होतो अशा समान अक्षर/शब्दांच्या जोड्या शोधा.**

(अ) नाचे दरी डोंगरात झिम्मा खेळतो नदीशी
रिमझिम पहाळीचं गाणं बोलतो झाडांशी

(आ) आई, तुझ्या पुढे मी आहे अजून तान्हा;
शब्दात सोड माझ्या आता हळूच पान्हा

(इ) कडीस जोडोनि दुज्या कडीला
मनुष्य बनवीतसे साखळीला

## (२) अनुप्रास अलंकार

- **खालील ओळी वाचा आणि त्यांतील कोणत्या अक्षराची पुनरावृत्ती झाली आहे ते शोधून काढा.**

गडद निळे गडद निळे जलद भरूनि आले.
शीतलतनु चपलचरण अनिलगण निघाले.
पुनरावृत्ती झालेले वर्ण लिहा. [ ] [ ]

एखाद्या वाक्यात किंवा कवितेच्या चरणात एकाच अक्षराची पुनरावृत्ती होऊन त्यातील नादामुळे जेव्हा त्याला सौंदर्य प्राप्त होते, तेव्हा '**अनुप्रास**' हा अलंकार होतो.

- **खालील ओळींत कोणत्या अक्षरामुळे अनुप्रास झाला आहे ते सांगा.**

(अ) रजतनील, ताम्रनील
स्थिर पल जल पल सलील [ ]

(आ) संत म्हणती, ''सप्त पदें सहवासें सख्य साधूशीं घडतें । [ ]

## भाषासौंदर्य

- **आलंकारिक शब्दांची रचना करून भाषेचे सौंदर्य वाढवता येते. आपले विचार अधिक परिणामकारक, अधिक आकर्षक होण्यासाठी आलंकारिक शब्दांचा उपयोग केला जातो. खाली काही आलंकारिक शब्द दिलेले आहेत. त्यांचा अभ्यास करा व लेखनात उपयोग करा. या शब्दांप्रमाणे इतर काही आलंकारिक शब्दांची यादी तयार करा.**
    - गजान्तलक्ष्मी – श्रीमंत मनुष्य
    - गळ्यातला ताईत – अत्यंत प्रिय
    - बाळकडू – लहानपणीचे संस्कार
    - काथ्याकूट – निष्फळ चर्चा
    - अष्टपैलू – अनेक बाबींमध्ये प्रवीण
    - अळवावरचे पाणी – अल्प काळ टिकणारे
    - अजातशत्रू – ज्याला कोणी शत्रू नाही असा
    - झाकले माणिक – गुणांचे प्रदर्शन न करणारा गुणी मनुष्य
    - इतिश्री – शेवट
    - अक्षरशत्रू – निरक्षर, अशिक्षित

- **वाचा आणि समजून घ्या.**

**आई :** अरे जॉन, किती हा तुझ्या कपड्यांचा ढीग?

**जॉन :** आई, काय करू मी या जुन्या कपड्यांचं?

**आई :** मुळात आवश्यक आहे तेवढेच नवीन कपडे घ्यावेत. त्यांचा पुरेपूर वापर करावा.

**जॉन :** अगं हो, पण आता काय करू ते सांग ना!

**आई :** यातले जे कपडे वापरण्यासाठी चांगले आहेत, ते बाजूला कर. जे तुझ्या अंगाला येत नाहीत, जे फाटले आहेत ते वेगळे वेगळे कर.

**जॉन :** आई, आपण या जुन्या कपड्यांचा पुनर्वापर करू शकतो का?

**आई :** हो, नक्कीच. त्यासाठी आपल्यात फक्त कलात्मकता पाहिजे.

**जॉन :** आई, काय काय बनवता येईल गं या कपड्यांचं?


**आई :** तुला सुट्टी आहे ना आज, चल आपण दोघं मिळून बनवूया.

(आई जॉनला पर्स, तोरण, पायपुसणी बनवून दाखवते.)

**जॉन :** आई, किती छान झाल्यात गं या वस्तू. खूपच छान दिसत आहेत. खरंच, आपण जुन्या कपड्यापासून वेगवेगळ्या सुंदर वस्तू बनवू शकतो. यामुळे नक्कीच कपड्याचा अपव्यय न होता पुर्नवापर होईल.







H322ME

❀❀❀

# १३. पाड्यावरचा चहा

**गोदावरी परुळेकर** (१९०८-१९९६) : सामाजिक कार्यकर्त्या व प्रसिद्ध लेखिका. १९४५ ते १९५३ या काळात डहाणू-उंबरगाव भागात त्यांनी आदिवासींमध्ये जागृतीचे कार्य केले. त्यांच्याबरोबर काम करत असताना आलेले अनुभव 'जेव्हा माणूस जागा होतो' या पुस्तकातून त्यांनी मांडले आहेत. तसेच त्यांचे 'बंदिवासाची आठ वर्षे' हे पुस्तकही प्रकाशित आहे. 'जेव्हा माणूस जागा होतो' या पुस्तकासाठी १९७२ साली साहित्य अकादमी पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात आले आहे.

प्रस्तुत पाठ 'जेव्हा माणूस जागा होतो' या पुस्तकातून घेतला आहे. निसर्गाच्या सान्निध्यात राहणाऱ्या वारली समाजाच्या त्या काळातील कष्टमय, खडतर जीवनाचे चित्रण प्रस्तुत पाठात लेखिकेने केले आहे.

सात-आठ किंवा दहा-पंधरा खोपट्यांचा समूह ज्या ठिकाणी असेल त्याला पाडा म्हणतात. असे पाच-सात अगर जास्तीत जास्त दहा, क्वचित पंधरा पाडे मिळून एक गाव होते. एक पाडा दुसऱ्या पाड्यापासून अर्धा मैल, मैल, काही ठिकाणी दोन-तीन मैल अंतरावर वसलेला असतो. एका गावातल्या साऱ्या पाड्यांना भेट द्यायची म्हणजे पाच-सहा मैलांचा फेरफटका करावा लागतो. साधारण उंचवट्यावर झाडांचा आश्रय घेऊन सावलीला हे पाडे वसलेले आहेत.

अशा एका 'सालकर पाडा' नावाच्या पाड्यावर आम्ही गेलो. तेथे कारव्यांच्या किंवा बांबूच्या काठ्यांच्या भिंती करून त्या शेणामातीने सारवून तयार केलेली खोपटी आमच्या स्वागतासाठी हजर होती. वारल्यांच्या घरांना लाकूड फार कमी वापरतात. मेढी, चौकटीची लाकडे व इतर चार-सहा वासे. काही खोपटांना एवढेही लाकूड नसते. काही खोपटी इतकी ठेंगणी असतात, की आत जायचे म्हटले, तरी वाकून जावे लागते. आमचा एक कार्यकर्ता लक्ष्मण सापट याचे घर असेच होते. मला नेहमी अगदी जपून आत-बाहेर करावे लागे. बहुतेक घरे एकदालनीच आहेत. एकच दार. कुठल्याही कारव्या अगर कामट्या मोडल्या की खिडकी तयार! पावसापासून संरक्षण म्हणून काही घरांवर पेंढा, तर काहींवर पळसाची पाने घालतात. कौलारू घरे क्वचितच दिसत असत. वारल्यांच्या घरांत रक्षण करण्याची गरज भासावी असे काहीच नसल्यामुळे ढकलली तर कोसळून पडतील अशीच ती खोपटी होती. खोपट्याच्या भोवताली सुमारे सहा ते नऊ इंच उंचीचा, कडेला दगड लावून केलेला, सारवलेला ओटा असे. आम्ही एका ओट्यावर जाऊन बसलो. प्रत्येक खोपट्याच्या पुढे बांबू व कामट्यांची लहान टेबलासारखी माची केली होती. त्यावर पिण्याच्या पाण्याची मडकी होती. खोपट्याच्या बाहेर लहान लहान खड्डे करून त्यांत कोंबड्यांसाठी पाणी ओतून ठेवले होते.

आम्ही काही वेळ बसलो तरी माणसांची चाहूल लागेना. कोणी दिसेना. आम्ही तेथे कशाला गेलो होतो, आम्हांला काय हवे होते, ते विचारायलासुद्धा कोणी येईना. पाखरांचा चिवचिवाट व कोंबड्यांचा फडफडाट सोडला, तर सारा शुकशुकाट होता. थोड्या वेळाने आम्ही उठून आजूबाजूला फिरू लागलो. एका ठिकाणी केविलवाणी दिसणारी मुले बसलेली होती. त्यांना सांभाळण्यासाठी घरी राहिलेली एक-दोन मुले तेथेच शेजारी उभी होती. मुलांमुळे व कुत्र्यांच्या भुंकण्यामुळे तेथे मनुष्यवस्तीचा भास होत होता.

मी काही खोपट्यांत गेले. तेथे काय दृश्य दिसले? एका बाजूला तीन दगडांची चूल. चुलीत व बाहेर ढीगभर राख! सतत चुलीवर ठेवून राप बसलेले एखादे ॲल्युमिनिअमचे पातेले, एक-दोन मडकी, एक-दोन तवल्या (खापरांची खोलगट तव्यासारखी भांडी), एखाद्या मडक्यात तळाशी चार भाताचे दाणे, शिंक्यावर एक आंबील भरलेले मडके, एका तवलीत एखादे हळकुंड, एक-दोन कांदे, लसणीच्या पाकळ्या, विड्या वळण्यासाठी आणलेली व कुडाला अडकवलेली आपट्याची पाने, फूट-दीड फूट लांबीचा, एका बाजूने बंद असलेला बांबूच्या पेराचा तुकडा भिंतीच्या कारव्यांना अडकवलेला होता. त्यात तंबाक म्हणजे तंबाकूची पाने किंवा तंबाकू ठेवत असत. हा बांबूचा तुकडा म्हणजे जंगलातील बरणीच होती.

आम्ही खोपट्यात गेलो. बाहेर आलो. आम्हांला कोणीही हटकले नाही, की तुम्ही कोण? येथे काय करता वगैरे काही विचारले नाही. ग्लानी येऊन निपचित पडलेल्या माणसासारखा सारा पाडा निपचित पडलेला होता. त्या खोपट्याची ती कळा, तेथे नांदणारे अठराविश्वे दारिद्र्य, त्यातच भर म्हणून तेथील भयाण, भकास वातावरण– हे सारे पाहून मी थोडी घाबरलेच. हा भयाण, निर्मनुष्य पाडा आता आपल्याला गिळून टाकणार की काय, असे वाटू लागले. मन अगदी उदास झाले. एक प्रकारची हुरहुर वाटू लागली. मला वाटले, आपण कुठल्या या खाईत येऊन पडलो? पुढे काय होणार? आपल्याला माघार घ्यावी लागणार काय? आपल्याला हे झेपेल काय?


आम्ही सुमारे तीन मैल चालत गेलो होतो. काहीच काम साधले नाही, तर उन्हातान्हातून परत तेवढीच रपेट करावी लागणार होती. मला चहाची फार सवय होती. पुन्हा संजाण स्टेशन गाठीपर्यंत घोटभर चहासुद्धा मिळणे शक्य नव्हते. माझा जीव अगदी रडकुंडीला आला. ध्येयावरील निष्ठा व गरीब लोकांबद्दलची तळमळ अविचल असल्यामुळेच मी स्वत:ला सावरून घेऊ शकले. कोणीतरी वयस्क माणूस केव्हातरी भेटेलच, तेव्हा पाहू काय करायचे ते, असा विचार करून, कॉम्रेड दळवींनी खजुरीच्या झाडाच्या थोड्या खजुऱ्या गोळा करून आणल्या होत्या, त्या चघळत एका ओट्यावर बसलो.

हळूहळू गुरांच्या व बकऱ्यांच्या मागे गेलेल्या मुलांना आम्ही तेथे असल्याची बातमी समजली. बरीच मुले आम्हांला बघण्यासाठी आमच्याभोवती जमा झाली. कोणी हातातल्या काठ्यांवर हनुवट्या ठेवून तर कोणी तशीच उभी राहून नुसती आमच्याकडे टकमका बघू लागली. घरातली मोठी माणसे कोठे आहेत अशी चौकशी त्यांच्याकडे केल्यावर समजले, की गावातली सारी जाणती माणसे, एकूण एक जमीनमालकांकडे कामाला गेलेली होती. त्या मुलांपैकी एक-दोन समंजस वाटली. त्यांना आम्ही सांगितले, ''मोठ्या माणसांना जाऊन सांगा, की टिटवाळ्याच्या सभेतले लोक आले आहेत. त्यांनी तुम्हांला बोलावलं आहे. त्यांना घेऊनच तुम्ही परत या.'' त्या मुलांनी आपापसात काहीतरी कुजबुज केली व ती मार्गाला लागली. ती आमचा निरोप पोचवणार, की काय करणार आम्हांला काहीच समजले नाही. त्यानंतर बाकीच्या मुलांपैकी बरीचशी पांगली व आम्ही त्यांच्या नजरकैदेतून सुटलो.

बराच वेळ गेला तरी कोणी येण्याचे चिन्ह दिसेना. त्या भयाण जागेत एक-एक क्षण आम्हांला तासासारखा भासू लागला. ती मुले जी गेली ती कोठे गेली, कोणाला बोलावून आणणार का तशीच कुठेतरी निघून जाणार काहीच समजेना. मधेच उठावे, पुन्हा बसावे, पुन्हा उठावे असे करत आम्ही तिथेच घुटमळत राहिलो. चहाची तल्लफ जाणवू लागली. दुसरे काहीच करण्यासारखे नसल्यामुळे भूक व तहान तीव्रतेने भासू लागली. मला तर ब्रह्मांड आठवू लागले. मनातली कालवाकालव दडपून, जणू विशेष काहीच नाही असे चेहरे करून, कॉ. दळवी व मी चिकाटीने वारल्यांच्या येण्याची वाट पाहात बसलो.

कंटाळून नाइलाजाने आम्ही परत जाण्याचा विचार करत होतो. तेवढ्यात आम्ही पाठवलेली मुले व त्यांच्या मागोमाग दोन-तीन वारली येताना दिसले. त्यांना येताना पाहिले तेव्हा माझ्या जिवात जीव आला. त्यांना लवकर येता आले नाही, कारण मुकादम त्यांना कामावरून जाऊ देईनात. 'टिटवाळा परिषदेतले लोक' आले आहेत हे कळल्यामुळेच मुकादमाशी थोडा तंटा करून ते आले होते. त्यांच्या चेहऱ्यावर कोणतीच भावना दिसत नव्हती. ते अगदी निर्विकार दिसत होते. आमच्याजवळ आल्यावर त्यांनी त्यांच्या पद्धतीने म्हणजे डाव्या हाताच्या तळव्यावर उजव्या हाताचे कोपरे ठेवून, तो नाकापर्यंत उभा धरून, नमस्कार केला. आपापसात थोडे बोलले व गावातल्या शाळेत, म्हणजे कुडाच्या भिंती असलेल्या एका लांबट चौकोनी झोपडीत आम्हांला घेऊन गेले. ते आमच्याशी काही बोलले नाहीत. आम्ही उभेच होतो. एकाने खोली झाडली, तर दुसऱ्याने आमच्यासाठी हातरी टाकली. मी अगदी थकले होते. कुडाला टेकून हातरीवर बसले. इतक्यात वारल्यांनी एक बाज आणली. मी झोपडीबाहेर झाडाखाली बाज टाकण्यास सांगितले. गावातील निदान प्रमुख मंडळींना बोलावून आणण्यास सांगितले; पण हे वारली लवकर जमणे शक्य नव्हते. सारे वारली जागोजाग वेठीला गेलेले होते. त्यांना वर्दी पोचून जमा होईपर्यंत दुपार उलटून जाईल असा अंदाज होता. जे दहा-पंधरा जण जमले होते ते हळूहळू कुडापाशी ओळीने बसले. मंडळी जमेपर्यंत काम होणार नाही हे त्यांना माहीत होते. आमच्याशी काय बोलावे ते

त्यांना सुचेना. सारेजण जमेपर्यंत वेळ कसा घालवावा हा आमच्यापुढेही प्रश्नच होता. कॉ. दळवी व मी आपसात बोलत होतो. थोडा चहा मिळाला तर प्रयत्न करून पाहावा, म्हणून मी त्यांच्यापैकी एकाला प्रश्न केला, ''दादू, थोडा चहा मिळेल का? सोय होईल का?'' चहाचे साधन त्यांच्याजवळ काहीच नव्हते. ते विचारात पडले. एकजण म्हणाला, ''बाई, जेवण करणार का?'' जेवण करणे चहा करण्यापेक्षा त्यांना सोपे होते. त्यांच्याबरोबर त्यांच्याच जेवणातले आम्हांला चालेल, वगैरे आम्ही त्यांना सांगितले. ''बाई, आम्ही गरीब माणसं. या जंगलात काय मिळणार?'' एवढे बोलून ते आपल्या कामाला लागले. मला वाटले, चहा काही मिळणार नाही, जेवण मिळणार; पण त्यांनी जेवण व चहा दोन्हींच्या तयारीला सुरुवात केली. चहा करायचा म्हणजे त्यांच्यापुढे प्रश्न होता. त्यांच्याकडे साखर नव्हती. त्यांना जरूर लागत नसे. कोणाकडे चहाची पावडर नव्हती. गावात गाय नाही, म्हैस नाही, त्यामुळे दुधाचा थेंब मिळणे कठीण! ते आपसात बोलू लागले.



पहिला वारली : चहा कसा करायचा, काय रं?

दुसरा वारली : च्या होय, सोय तर होल; पण साखर कुठं गवसंल?

तिसरा वारली : आपल्यापायी नाही; पण पाटलाकडे थोडी खांड होवि.

दुसरा वारली : पाटलाकडे गोड (गूळ) मिळेल. पाटलाकडे गोड नाही होवा तर एका शिवराईचा आणू!

पहिला वारली : बाई, तुला गोडाचा चहा चालत आहे का?

एकाने एका पोराला बोलावून गूळ आणायला सांगितला. चहाची पावडर कोणाकडे मिळेल की काय, याबद्दल थोडे बोलणे झाल्यावर दुसऱ्या एका पोराला भुक्की आणण्यासाठी दुकानावर पाठवले. मी विचारले, ''दुकान कितीसं लांब आहे?'' ते म्हणाले, ''जवळच आहे. पोर दोन टांगांत परत येईल.'' मागाहून आमच्या लक्षात आले, की सुमारे तीन मैलांच्या परिसरात दुकान नव्हते. मी विचार केला, यांचा दोन टांगांचा अंदाज तीन मैलांचा आहे तर! चहा-साखरेची विवंचना संपल्यावर त्यांना दुधाची आठवण झाली. त्यांना दुधाची आठवण होणे हेच आश्चर्य होते. ते चहा घेतलाच तर बिगरदुधाचा घेत. दूध पिणे त्यांना माहीत नव्हते. काहींना तर दुधाचा चहाच आवडत नसे. उलटी होई. चहा करून प्यायचा हे त्यांच्या कधी स्वप्नातसुद्धा आले नसेल. त्यांची परिस्थितीच अशी होती, की चहा आपल्यासाठी नाही हीच त्यांची दृढ भावना होती. आम्हांला बिगरदुधाचा चहा चालेल, असे मी त्यांना सांगितले. गावातल्या बकऱ्या चरण्यासाठी गेल्या होत्या. 'बकरी गवसावयाचे' या शब्दांत, एखादी बकरी शोधून पकडून, दूध काढून आणायचे, हा सारा अर्थ सामावलेला होता. 'बकरी गवस' एवढ्या शब्दांत त्या पोराला सारे समजले व तो त्या कामासाठी निघून गेला. चहाची व्यवस्था झाल्यावर ते जेवणाच्या खटपटीला लागले. जेवण म्हणजे त्यांना ती खटपटच होती.

सारी जमवाजमव होऊन चहा तयार होण्यास बराच वेळ लागणार, हे ओळखून मी शाळेच्या बाहेर, झाडाखाली, बाजेवर जाऊन पडले. कॉ. दळवी झाडाखाली हातरी पसरून निजले. आम्ही दोघे अतिशय थकलो होतो. झाडाखाली गार वाऱ्याच्या झुळकीमुळे आम्हांला ताबडतोब झोप लागली.

एका पळसाच्या पानावर गूळ, एकावर चहाच्या भुक्कीची पुडी, स्वच्छ पाण्याने भरलेले एक मडके, एक

स्वच्छ घासलेला टोप, तीन दगड ठेवून पेटवलेली चूल, अशी जय्यत तयारी करून चहा करण्यासाठी वारल्यांनी आम्हांला उठवले. त्यांना वाटले, त्यांनी केलेला चहा आम्हांला आवडणार नाही किंवा चालणार नाही. त्यांनी केलेलाच चहा आम्ही घेऊ असे सांगितल्यावर त्यांना बरे वाटले व एक प्रमुख वारली चहा तयार करण्यासाठी चुलीपुढे सरसावला. काही वारली त्याच्याभोवती बसले. त्यांनी गळवट पातेले भरून पाणी चुलीवर ठेवले. त्यात होता तेवढा गूळ व चहाची भुक्की टाकली आणि दुधाची वाट पाहात ते बसले. सुमारे अर्ध्या तासाने एका पोराने पळसाच्या पानाच्या द्रोणात बकरीचे दूध आणले. तेही त्या पातेल्यात ओतून ते सारे गरगट, पाण्याला थोडा चहाचा रंग येईपर्यंत, खळखळा उकळले. सगळ्यांच्या अगोदर पाहुण्यांनी चहा घ्यावा म्हणून प्रथम दोन लहान लहान पितळ्यांत चहा ओतला. वारल्यांना आम्ही आमच्याबरोबर चहा घेण्यास सांगितले. तेव्हा प्रत्येकाने एक-एक पळसाचे पान घेऊन ते द्रोणासारखे वळवून हातात धरले. चहा करणाऱ्याने प्रत्येकाच्या द्रोणात घोट घोट चहा ओतला. अशा प्रकारे आम्हां दहा-पंधरा माणसांची चहा-पार्टी सर्वांच्या एकत्र येण्याने मोठ्या आनंदात पार पडली.



## स्वाध्याय

**प्र. १. पाठाधारे वारली लोकांच्या खोपटाच्या बाबतीत खालील मुद्द्यांना अनुसरून उत्तरे लिहा.**

(अ) खोपटे वसण्याचे ठिकाण-

(आ) खोपटे तयार करण्यासाठी वापरले जाणारे साहित्य-

(इ) दारे, खिडक्या व छप्पर-

(ई) दालन-

**प्र. २. पाठाधारे खाली दिलेल्या गोष्टींचे उपयोग सांगा.**

(अ) माची-

(आ) लहान लहान खड्डे-

(इ) सारवलेला ओटा-

**प्र. ३. आकृत्या पूर्ण करा.**

(अ) **निर्मनुष्य पाड्यासाठी लेखिकेने वापरलेला शब्द** → [ ]

(आ) **वारली लोकांची नमस्कार करण्याची पद्धत** → [ ]

**प्र. ४. कारणे लिहा.**

(अ) लेखिका निराश झाली तरी तिने स्वत:ला सावरले, कारण..........

(आ) लेखिका कंटाळून नाइलाजाने परतीच्या प्रवासाचा विचार करू लागली, कारण ..........

**प्र. ५. लेखिका आणि कॉ. दळवी यांच्या वारली लोकांबरोबर होणाऱ्या सभेच्या तयारीचा ओघतक्ता करा.**

पाहुण्यांना झोपडीत नेलं

↓

___________

↓

___________

↓

___________

↓

___________

**प्र. ६. पाठाच्या आधारे लिहा.**

(अ) चहा तयार करण्यापेक्षा जेवण तयार करणे वारली लोकांना सोपे होते, स्पष्ट करा.

(आ) तुमच्या घरची चहा करण्याची पद्धत आणि वारली लोकांची चहा करण्याची पद्धत यांतील फरक स्पष्ट करा.

## खेळूया शब्दांशी.

**(अ) जोड्या लावा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
| --- | --- |
| (१) ब्रह्मांड आठवणे. | (अ) कायमची गरिबी असणे. |
| (२) अठरा विश्वे दारिद्र्य असणे. | (आ) शांत पडून राहणे |
| (३) निपचित पडणे. | (इ) अनिश्चिततेतून येणारी अस्वस्थता. |
| (४) हुरहुर वाटणे. | (ई) असाहाय्यतेतून भीती वाटणे. |

**(आ) खालील नादानुकारी शब्द लिहा.**

उदा., ढगांचा – गडगडाट

(अ) कोंबड्यांचा

(आ) पाखरांचा

(इ) पाण्याचा

**(इ) खालील शब्दांसाठीचे विरुद्धार्थी शब्द पाठातून शोधून लिहा.**

(अ) गैरहजर ×

(आ) उंच ×

(इ) भरभर ×

(ई) अदृश्य ×

(उ) उशिरा ×

**उपक्रम :** तुमच्याजवळची झोपडपट्टी, पाडा, वाडी-वस्ती, तांडा, फिरत्या लोकांची पालं यांपैकी शक्य त्या ठिकाणास शिक्षक किंवा पालक यांच्यासोबत भेट द्या. तेथील लोकांचे जीवन समजून घेण्यासाठी त्यांच्याशी बोला. त्या भेटीतील लोकांचे जीवन आणि पाठातील लेखिकेचे अनुभव यांची तुलना करून भेटीचा अहवाल लिहा. तो वर्गात वाचून दाखवा. तुम्हांला अशा लोकांसाठी काही करता येईल का ते गटात मित्रांशी चर्चा करून ठरवा.

## आपण समजून घेऊया.

### (आ) आता आपण अर्थालंकारातील 'उपमा' व 'उत्प्रेक्षा' या अलंकारांचा अभ्यास करू.

अर्थालंकारात खालील गोष्टी नीट अभ्यासा.

उदा., हा आंबा साखरेसारखा गोड आहे.

| **उपमेय** | **उपमान** | **साम्यवाचक शब्द** | **समान धर्म** |
|---|---|---|---|
| आंबा | साखर | सारखा | गोडी |

खालील संकल्पना लक्षात ठेवा.

(अ) ज्या वस्तूला उपमा दिलेली असते तिला उपमेय म्हणतात.

(आ) ज्या वस्तूची उपमा दिलेली असते तिला उपमान म्हणतात.

(इ) दोन वस्तूंत असणारा सारखेपणा याला समान धर्म म्हणतात.

(ई) सारखेपणा दाखवण्यासाठी वापरला जाणारा शब्द त्याला साम्यवाचक शब्द म्हणतात.

### (१) उपमा अलंकार

- **खालील उदाहरण वाचा, समजून घ्या व कृती सोडवा.**

सावळाच रंग तुझा पावसाळि नभापरी ।

(अ) प्रस्तुत वाक्यातील उपमेय– [ ]

(आ) प्रस्तुत वाक्यातील उपमान– [ ]

(इ) प्रस्तुत वाक्यातील समान धर्म– [ ]

(ई) प्रस्तुत वाक्यातील साम्यवाचक शब्द– [ ]

### उपमा अलंकाराची वैशिष्ट्ये

- उपमेय व उपमान यांच्यात साम्य असते.
- हे साम्य दाखवण्यासाठी सम, समान, सारखा, प्रमाणे, परि, गत इत्यादी साम्यवाचक शब्द वापरले जातात.

दोन वस्तूंतील साम्य चमत्कृतिपूर्ण रीतीने वर्णन केलेले असते, तिथे '**उपमा**' अलंकार होतो.

## (२) उत्प्रेक्षा अलंकार

- **खालील उदाहरण वाचा, समजून घ्या व कृती सोडवा.**

हा आंबा म्हणजे जणू साखरच!

(अ) प्रस्तुत वाक्यातील उपमेय– [ ]

(आ) प्रस्तुत वाक्यातील उपमान– [ ]

(इ) प्रस्तुत वाक्यातील समान धर्म– [ ]

(ई) प्रस्तुत वाक्यातील साम्यवाचक शब्द– [ ]

### उत्प्रेक्षा अलंकाराची वैशिष्ट्ये

- उपमेय हे जणू उपमानच असते.
- या अलंकारात जणू काय, जेवि, गमे, भासे, वाटे, की, जसे, तसे हे शब्द येतात.

उपमेय हे जणू उपमानच आहे असे जिथे वर्णिलेले असते, तिथे '**उत्प्रेक्षा**' अलंकार होतो.

- **खालील वाक्ये वाचा व तक्ता पूर्ण करा.**

| वाक्य | उपमेय | उपमान | साम्यवाचक शब्द |
|---|---|---|---|
| (अ) आईचे प्रेम म्हणजे जणू सागरच. | | | |
| (आ) आभाळागत माया तुझी आम्हांवरी राहू दे. | | | |
| (इ) त्याचे अक्षर मोत्यासारखे सुंदर आहे. | | | |
| (ई) ती गुलाबी उषा म्हणजे परमेश्वराचे प्रेम जणू. | | | |

M3AXP2

# १४. फुलपाखरे


**वि. पां. दांडेकर** (१९०५-१९७४) : प्रसिद्ध कादंबरीकार, समीक्षक, लघुनिबंधकार. निकोप, आशावादी, आनंदी वृत्ती, जीवनाकडे उदारपणे पाहणारी जीवनदृष्टी, सौंदर्यदृष्टी, कल्पकता आणि विनोद यांचे उत्तम मिश्रण त्यांच्या लघुनिबंधात आढळते. त्यांची 'फेरफटका', 'टेकडीवरून', 'एक पाऊल पुढे', 'काळ खेळतो आहे', 'पंचवीस वर्षांनंतर' हे लघुनिबंधसंग्रह; 'प्रतारणा', 'कुचंबणा', 'तिशीचा तरुण' या कादंबऱ्या; 'मराठी नाट्यसृष्टी : पौराणिक नाटके' व 'मराठी नाट्यसृष्टी : सामाजिक नाटके' हे ग्रंथ; 'केळकरांची सहा नाटके' हे समीक्षात्मक पुस्तक', 'मराठी साहित्याची रूपरेषा' हा साहित्येतिहास संक्षेपाने मांडणारा ग्रंथ ही पुस्तके प्रसिद्ध आहेत.

नानाविध अडचणींमुळे मानवी जीवनात ताणतणाव निर्माण होतात. माणसाचे मन निराश होते; परंतु माणूस ज्या वेळी वृक्षवेली, पशु-पाखरे, फुले-फुलपाखरे यांच्या सान्निध्यात जातो त्या वेळी निसर्गाच्या नित्य नव्या चैतन्यदायी रूपाने माणसाच्या मनावरील नैराश्याचे सावट कुठल्या कुठे पळून जाते. जीवनाकडे आनंदाने आणि आशादायक दृष्टीने पाहायला हवे असा संदेश प्रस्तुत पाठातून मिळतो.

मी प्रवासात होतो. प्रकृती बरी नव्हती. आगगाडीने निघालो होतो.

दिवस पावसाळ्याचे होते. सृष्टीचे स्वरूप सुजल, सुफल, सस्यश्यामल असे दिसत होते. नदी-नाल्यांतून आणि भातशेतांतून पाणी तुडुंब भरून वाहत होते. थोडी वर आलेली पिके वाऱ्यावर डुलत होती. सृष्टी जणू आनंदाने नाचत असल्यासारखी दिसत होती; परंतु माझ्याच मनावर मळभ आल्याने मी तिच्याशी समरस होऊ शकत नव्हतो. शरीराच्या अस्वास्थ्यामुळे मनाला एक प्रकारची मरगळ आली होती. यामुळे मला सर्व गोष्टी त्या वेळेपुरत्या तरी निरर्थक, क्षणिक वाटत होत्या. नाचरे ओढे आणि हरिततृणांचे गालिचे, माझ्या मनाला नाचवू शकत नव्हते. एखाद्या पोरक्या पोराप्रमाणे मन स्वत:शीच नाराज होऊन बसले होते. निसर्गातील सुंदर दृश्यांचा त्याच्यावर काहीच परिणाम होत नव्हता.

असे सुमारे तासभर चालले, एका मोठ्या स्टेशनवर गाडी थांबली. चांगली पंधरा मिनिटे थांबली. माझा डबा जवळ जवळ शेवटचा असल्याने त्यात उतारूंची ये-जा झाली नाही. त्यामुळे स्टेशनवरील एका सुंदर दृश्याकडे माझे मन वेधले गेले. स्टेशनच्या आवारात एक सुंदर बाग होती आणि तिच्यात विविध रंगांची झेनियाची फुले उमलली होती. लाल, पिवळी, केशरी, किरमिजी, पांढरी, जांभळी अशी फुले जागच्या जागी वाऱ्याने डुलत होती. राठ दांड्याच्या व रुक्ष पानांच्या झेनियाला इतकी सुंदर फुले कशी येतात याचे मला नेहमी आश्चर्य वाटते. पारिजातकाचेही तसेच नाही का? पारिजातकाचा बुंधा, पाने, डिक्शा ही सर्व एकंदरीत खडबडीत, खरखरीत, रुक्षच; पण पारिजातकाचे फूल? नाजूकपणा, सौंदर्य नि सुगंध यांचा नमुनाच पाहून घ्यावा. तसेच झेनियाचे मानता



येईल. तसल्या त्या सुंदर, बहुरंगी व बहुढंगी फुलांवर तितकीच सुंदर, बहुरंगी व बहुढंगी फुलपाखरे उडत होती. मकरंदास्वाद घेत होती. त्या नाचणाऱ्या फुलपाखरांकडे पाहिल्यावर फुलपाखरे कोणती अन् फुले कोणती असा भ्रम मला तरी क्षणभर झाला. उडताहेत ती फुले, की डोलताहेत ती फुले, अशी शंका वाटण्याइतके रंगांचे सादृश्य झेनियाच्या फुलांत नि त्या फुलपाखरांत होते. जीवन जर कोठे फुलत असेल, डुलत असेल, नाचत असेल, गात असेल तर ते इथे, असे त्या दृश्याकडे पाहून मला वाटले. जीवनाची, चैतन्याची, आनंदाची कारंजीच येथे थुई-थुई उडत होती. तसेच ते अप्रतिम जीवननृत्य पाहून माझ्या मनावरील मळभ नाहीसे झाले, ते आनंदले. तेवढ्यात गाडी सुरू झाल्याने त्या सुंदर दृश्याचा मला नाइलाजाने निरोप घ्यावा लागला; परंतु माझे विचारचक्र गाडीच्या चक्रांबरोबरच सुरू झाले.

त्या फुलांनी आणि फुलपाखरांनी माझ्या मनाला उत्साह आणि स्फूर्ती दिली. फुलांचे नि फुलपाखरांचे आयुष्य ते किती आणि त्या मानाने त्यांनी त्या आयुष्याकरिता दाखवलेली आस्था किती? फुलांचे आयुष्य, अगदी झेनियाचे फूल झाले, तरी काही दिवसांचे. फुलपाखरांचेही तसेच. मनुष्याचे आयुष्य या दृष्टीने पाहिले असता अनेक पटींनी मोठे मानावे लागेल. एवढे मोठे आयुष्य लाभलेल्या मनुष्याने कितीतरी समाधानी व आनंदी असावयास हवे. अडचणींनी आणि रोगांनी भांबावून जाण्याचे त्याला काय कारण आहे? अडचणी, रोग, संकटे ही काही कायमची नसतात ना? मग त्यांच्याकडे सोशिकपणाने, खिलाडू वृत्तीने आपणांस का पाहता येऊ नये?

अडचणी, संकटे, रोग यांचे जेव्हा आपणांवर आक्रमण होते, तेव्हा ती फार मोठी किंवा असह्य वाटतात; परंतु ती ओसरल्यावर, आपण त्यांना का घाबरलो तेच आपणांस समजत नाही. आपण घाबरलो याचे कारण आपल्याजवळ मनाची स्थिरता किंवा शांती नसते. जीवन म्हणजे संकटे नव्हेत, रोग नव्हेत, अडचणी नव्हेत, कारण ती असतानाही जीवन चालू असते. मळभ आल्याने सूर्य जसा नाहीसा होत नाही, त्याचप्रमाणे रोगांनी नि संकटांनी जीवनाचे मूळ आनंदी स्वरूप नाहीसे होत नाही. आजारी व संकटग्रस्त माणसेही जेव्हा थट्टा-विनोद करतात, तेव्हा ती या आनंदमय जीवनाचा अनुभव घेत असतात.

मला वाटते आपण फार विचार करून किंवा अविचार करून आपले मूळचे आनंदी स्वरूप, आनंदी जीवन विसरून बसलो आहोत. फुलपाखरांना जर आनंदाने जगता येते तर आपणांस का येऊ नये? त्यांना जर जीवनातील रसास्वाद घेता येतो, तर तो आपणांस का घेता येऊ नये? आंबट तोंड आणि लांबट चेहरा करून जीवनाचा गाडा आपण ओढत आहोत, असे आपण का वागावे? मला वाटते मनुष्याखेरीज जीवनासंबंधी फाजील विचार दुसरे कोणीही करत नसेल. मनुष्याने आपल्या बुद्धीचा उपयोग करून हेच जीवन अधिक सुखदायक, आनंददायक, रसदायक बनवले पाहिजे. बुद्धीने मनुष्याचे जीवन बहारीचे बनले पाहिजे. ते बुजरे किंवा भांबावलेले बनता कामा नये.



## स्वाध्याय

**प्र. १. वैशिष्ट्ये लिहून तक्ता पूर्ण करा.**

| फुलाचे नाव | देठ | पाने | फुले |
|---|---|---|---|
| (१) झेनिया | | | |
| (२) पारिजातक | | | |

**प्र. २. कारणे लिहा.**

(अ) लेखक आनंदाने नाचणाऱ्या सृष्टीचा आनंद घेऊ शकत नव्हता, कारण.....

(आ) लेखकाच्या मनावरचे मळभ दूर झाले, कारण.....

**प्र. ३. योग्य जोड्या लावा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (१) सृष्टी | (अ) पारिजातक |
| (२) राठ दांडा | (आ) सुफल |
| (३) नाजूकपणा | (इ) फुलपाखरे |
| (४) बहुढंगी | (ई) झेनिया |

**प्र. ४. पाठाच्या आधारे तुलना करा.**

| फुलपाखराचे जीवन | मानवी जीवन |
|---|---|
| (१) | (१) |
| (२) | (२) |

**प्र. ५. पाठाच्या आधारे तुमच्या शब्दांत लिहा.**

(अ) या पाठातून लेखकाने दिलेला संदेश.

(आ) निसर्गातील घटक मानवी जीवन आनंदी करतात.

**प्र. ६. 'जशी दृष्टी तशी सृष्टी' या वचनातील विचार स्पष्ट करा.**

**प्र. ७. 'भाषेतील सौंदर्य' या दृष्टीने पाठातील वाक्ये शोधा व लिहा. उदा., जीवनाची, चैतन्याची, आनंदाची कारंजी येथे थुई थुई उडत होती.**

## खेळूया शब्दांशी.

- **खालील वाक्यांतील अधोरेखित केलेल्या अव्ययांचा प्रकार ओळखा.**

(अ) सतीश वारंवार आजारी पडतो.

(आ) रस्त्यावर वाहनांची दुतर्फा गर्दी होती.

(इ) आई सकाळी लवकर उठली कारण तिला आज गावी जायचे होते.

(ई) शाब्बास! तू खूप छान खेळलास.



## लिहिते होऊया.

- **'मी फुलपाखरू झालो/झाले तर....' या विषयावर निबंधलेखन करा.**

## शोध घेऊया.



- **आंतरजालाच्या साहाय्याने विविध प्रकारच्या फुलपाखरांची माहिती मिळवा. त्या माहितीचा संग्रह करा.**

**उपक्रम :** तुमच्या परिसरातील उद्यानाला भेट देऊन त्याचे निरीक्षण करा. मिळवलेली माहिती वर्गात सांगा.

**प्रकल्प :** तुमच्या परिसरात आढळणाऱ्या किमान पाच फुलांचे नमुने गोळा करा. वर्गात त्याचे प्रदर्शन भरवा. तुम्ही जमा केलेल्या 'फुलांचे विशेष' या विषयीची माहिती वर्गात सांगा. कोणती फुले तुमच्या परिसरात जास्त प्रमाणात आढळतात, ते जमा केलेल्या फुलांच्या नमुन्यांवरून सांगा.

## शब्दकोडे सोडवूया.

- खालील शब्दकोड्यामध्ये नामे, सर्वनामे, विशेषणे व क्रियापदे लपली आहेत, ती शोधा व दिलेल्या तक्त्यात भरा.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| र | अ | न | या | नि | कि | ता |
| मे | ज | य | तु | र | म | जा |
| श | आ | न | म्ही | जा | ला | त |
| सुं | म्ही | सा | ट | हु | र | वा |
| द | क | क्षी | व | शा | श्मी | ना |
| र | ल्प | रा | ट | र | तु | ला |
| त्या | क | ह | वी | तो | षा | मी |
| ला | जा | णे | त | क | र | णे |

| | |
|---|---|
| नामे | |
| सर्वनामे | |
| विशेषणे | |
| क्रियापदे | |

## आपण समजून घेऊया.

- खालील वाक्ये वाचा व अभ्यासा.

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (अ) चंद्राचा उदय झाला. | (इ) चंद्रोदय झाला. |
| (आ) दिवसामागून दिवस चालले तशी त्यांची प्रतिष्ठा वाढत गेली. | (ई) दिवसेंदिवस त्यांची प्रतिष्ठा वाढत गेली. |

- उत्तरे लिहा.

(अ) दोन्ही गटांतील वाक्याचा अर्थ एकच आहे का ? ______

(आ) दोन गटांतील शब्द सारखे आहेत का ? ______

(इ) 'अ' गटातील व 'ब' गटातील अधोरेखित शब्दांमधील फरक लिहा. ______

बोलण्याच्या ओघात आपण शब्दातील परस्परसंबंध दाखवणारे विभक्ती प्रत्यय व काही शब्द गाळून सुटसुटीत असे शब्द तयार करतो. उदा., ग्रंथाचे आलय = ग्रंथालय. शब्दांच्या अशा एकत्रीकरणाला '**समास**' असे म्हणतात. शब्दांच्या या एकत्रीकरणाने जो शब्द तयार होतो त्यांना '**सामासिक शब्द**' म्हणतात.

**समासाचा विग्रह–** सामासिक शब्द कोणत्या शब्दांपासून तयार झाला हे स्पष्ट करण्यासाठी आपण त्याची फोड करतो. या फोड करून दाखवण्याच्या पद्धतीला '**समासाचा विग्रह**' असे म्हणतात.

- **खालील सामासिक शब्द वाचा व समजून घ्या.**

(अ) ज्ञानरूपी अमृत–ज्ञानामृत

(आ) पाच आरत्यांचा समूह–पंचारती

(इ) प्रत्येक घरी–घरोघरी

(ई) नीळा आहे कंठ ज्याचा असा तो–नीलकंठ

(उ) गुरू आणि शिष्य–गुरूशिष्य

- समासात कमीत कमी दोन शब्द असावे लागतात. त्या प्रत्येक शब्दाला '**पद**' असे म्हणतात. त्या दोन पदांपैकी कोणत्या पदाला प्राधान्य आहे यावरून समासाचे चार प्रकार ठरतात.

| पद | प्रधान/गौण (कमी महत्त्वाचे) | समासाचे नाव |
|---|---|---|
| (अ) पहिले पद | प्रधान | अव्ययीभाव समास |
| (आ) दुसरे पद | प्रधान | तत्पुरुष समास |
| (इ) दोन्ही पदे | प्रधान | द्वंद्व समास |
| (ई) दोन्ही पदे | गौण | बहुव्रीही समास |

## सूचनाफलक

- **सूचनाफलक तयार करणे.**

एखाद्या गोष्टीची माहिती दुसऱ्यांपर्यंत पोहोचवण्याचे सूचना हे एक माध्यम आहे. दैनंदिन व्यवहारात अनेक ठिकाणी आपल्याला सूचना द्याव्या लागतात. दुसऱ्याने दिलेल्या सूचना वाचून त्याचा अर्थ समजून घ्यायचा असतो. अपेक्षित कृती योग्य तऱ्हेने होण्यासाठी दिलेल्या सूचनांचे आकलन होण्याचे कौशल्य निर्माण व्हायला हवे. इयत्ता सहावी व सातवीमध्ये तुम्ही सूचनाफलक वाचून त्यांचा अभ्यास केला आहे. या इयत्तेत तुम्ही स्वत: सूचनाफलक तयार करायला शिकणार आहात.

- **सूचनाफलकाचे विषय**

(१) शाळेतील सुट्टीच्या संदर्भात सूचना.

(२) सहलीसंदर्भात सूचना.

(३) रहदारीसंबंधी सूचना.

(४) दैनंदिन व्यवहारातील सूचना.

- **सूचना तयार करताना लक्षात घ्यायच्या गोष्टी**

(१) सूचना कमीत कमी शब्दांत असावी.

(२) सूचनेचे लेखन स्पष्ट शब्दांत, नेमके व विषयानुसार असावे.

(३) सूचनेतील शब्द सर्वांना अर्थ समजण्यास सोपे असावेत.

(४) सूचनेचे लेखन शुद्ध असावे.

- सूचनाफलक तयार करा. यासाठी खालील नमुना कृतींचा अभ्यास करा.

विषय– 'उद्या शहरातील पाणीपुरवठा बंद राहील.'

नमुना कृती १

दि. ८ नोव्हेंबर

**जलपुरवठा विभाग**

**पाणीपुरवठा बंद**

जलपुरवठा विभाग विद्याविहार, पुणे तर्फे कळवण्यात येते, की विद्याविहार या भागातील जलवाहिन्यांच्या महत्त्वाच्या दुरुस्तीच्या कामासाठी १० नोव्हेंबर रोजी पाणीपुरवठा दिवसभर बंद राहील याची नागरिकांनी नोंद घ्यावी.

विषय– 'कणखर' गिर्यारोहण संस्थेतर्फे कॅम्पचे आयोजन.

नमुना कृती २

– सूचनाफलक –

दि.१५ एप्रिल

'कणखर' गिर्यारोहण संस्था अमरावतीतर्फे उन्हाळ्याच्या सुट्टीत गिर्यारोहणाचा कॅम्प आयोजित केला आहे. संपूर्ण माहिती १४ एप्रिलच्या वृत्तपत्रात आलेली असून अधिक विस्तृत माहिती www.kankhar.com या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. इच्छुकांनी आपली नाव नोंदणी ३० एप्रिलपर्यंत करावी.

- तुमच्या शाळेत विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. हे प्रदर्शन पाहण्यासाठी पालकांना आवाहन करणारा सूचनाफलक तयार करा.

H3JTQP

# १५. आळाशी


**हनुमंत चांदगुडे** (१९७७) : प्रसिद्ध कवी व गीतकार. शेती, निसर्ग व ग्रामीण भागातील शेतकरी हे त्यांच्या लेखनाचे आवडते विषय. विविध साप्ताहिके, मासिके, दिवाळी अंक यांसाठी कथा, कविता व ललितलेखन. अनेक चित्रपट व अल्बम यांसाठी गीतलेखन. याशिवाय त्यांचा 'काकरी' हा कवितांचा अल्बम प्रसिद्ध आहे. त्यांचा 'भेगा भुईच्या सांदताना' हा काव्यसंग्रह प्रकाशित असून या काव्यसंग्रहाला आजपर्यंत १७ पुरस्कार मिळाले आहेत.

शेतकऱ्यांच्या अपार कष्टातून नभालाही पाझर फुटतो. त्याच्या परिश्रमाला पावसाच्या रूपाने फळ मिळते. भरघोस पीक यावे यासाठी शेतकरी पुन्हा रात्रंदिवस चिखलपाण्यात राबत राहतो. त्यामधून पिकणाऱ्या अन्नधान्यावर जगाचे पालनपोषण होते. त्यामुळे आपण शेतकऱ्यांविषयी कृतज्ञ राहिले पाहिजे, हे या कवितेतून स्पष्ट होते. प्रस्तुत कविता 'भेगा भुईच्या सांदताना' या काव्यसंग्रहातून घेतली आहे.

- **ऐका. वाचा. म्हणा.**

बा अनवाणी पायाचा ठसा मातीत उठतो
भाळावरल्या घामाचा पान्हा नभाला फुटतो...

नभ पाणी पाणी होतो, माती चिखल होतीया
कुणब्याच्या जीवनाची मग उकल होतीया
भेगाळल्या भुईकडं बाप पाहून फाटतो
भाळावरल्या घामाचा पान्हा नभाला फुटतो...



हातापायाला चिखल बाप घामामधी ओला
पीक पाहून शिवारी थवा पाखरांचा आला
बाप आरोळी मारता तान्हा रडत उठतो
भाळावरल्या घामाचा पान्हा नभाला फुटतो...

बाप रगात होऊन रोज पाटातून व्हातो
मग कणसाचा जन्म तेव्हा ताटातून होतो
दाणे कणसाला येता बाप हुरडा वाटतो
भाळावरल्या घामाचा पान्हा नभाला फुटतो...



येता भरात जोंधळा बाप काढणी करतो
स्वत: राहून उपाशी पोट जगाचं भरतो
जातो आळाशी होऊन तरी 'आळा' का तुटतो ?
भाळावरल्या घामाचा पान्हा नभाला फुटतो...

## स्वाध्याय

**प्र. १. खालील आकृती पूर्ण करा.**

पाऊस आल्यानंतर झालेले बदल
- ☐
- ☐

**प्र. २. हे केव्हा घडते ते लिहा.**

(अ) पाखरांचा थवा येतो..........

(आ) तान्हा रडत उठतो..........

**प्र. ३. कवितेतील शेतकऱ्याच्या कामाच्या कृतींचा ओघतक्ता तयार करा.**

अनवाणी पायाने उन्हाळ्यातले काम करणे.
↓
☐
↓
☐
|
अत्यंत मेहनतीने पाटातून शेतीला पाणी देणे.
|
☐
↓
जोंधळ्याची काढणी करणे.

**प्र. ४. कवितेतील यमक जुळणाऱ्या शब्दांच्या जोड्या शोधून लिहा.**

**प्र. ५. स्वमत लिहा.**

(अ) 'भाळावरल्या घामाचा पान्हा नभाला फुटतो' या ओळीचा तुम्हांला समजलेला अर्थ लिहा.

(आ) 'शेतकरी जगाचा पोशिंदा आहे' हे विधान तुमच्या शब्दांत स्पष्ट करा.

### गंमत शब्दांची

- **कणसाचा जन्म ताटातून होतो.**
- **आम्ही पाहुण्यांच्या जेवणासाठी ताट तयार केले.**

या दोन वाक्यांत 'ताट' शब्दाचे दोन अर्थ आलेले आहेत. याप्रमाणे काही शब्दांचे दोन किंवा अधिक अर्थ असतात. असे जास्तीत जास्त शब्द शोधा. त्यांचा भिन्न भिन्न अर्थ स्पष्ट करणारी वाक्ये लिहा. वर्गात वाचून दाखवा.

M3TPSC

# १६. चोच आणि चारा

भाग-४

**मकरंद जोशी** (१९७०) : प्रसिद्ध लेखक, निसर्ग सहल संयोजक. त्यांची 'प्रवास एका प्रवासाचा' हे केसरीभाऊ पाटील यांचे आत्मकथन; 'दोन ध्रुवावर दोन पावले' हे प्रवासवर्णन; 'घर श्रमिकांच' हा कथासंग्रह; 'पर्यटन मार्गदर्शक मालिका', 'परीसस्पर्श-एक बावनकशी कहाणी' इत्यादी पुस्तके प्रसिद्ध. विविध वृत्तपत्रे व नियतकालिके यांमधून पर्यटन, पर्यावरण, प्रासंगिक लेख आणि मुलाखती प्रसिद्ध.

मानवाला पक्षी जीवनाविषयी नेहमीच कुतूहल वाटत आले आहे. त्यापोटी झालेल्या अभ्यासातून पक्षी जीवनाचे नानाविध पैलू समोर आले आहेत. अधिवासाप्रमाणे आणि अन्नाच्या उपलब्धतेनुसार पक्ष्यांच्या चोचीचे आकार आणि रूपे कशी बदलत राहतात याचा वेध लेखकाने या पाठात घेतला आहे. प्रस्तुत पाठ 'वयम्', नोव्हेंबर २०१६ या मासिकातून घेतलेला आहे.



'तिची उलूशीच चोच, तेच दात तेच ओठ' अशा शब्दांमध्ये सुगरण पक्ष्याचं वर्णन बहिणाबाई आपल्या निरीक्षणामधून करतात. सुगरण पक्ष्याच्या चोचीचं त्यांनी केलेलं वर्णन बहुतेक सगळ्या पक्ष्यांना सहज लागू पडतं. पक्ष्यांची चोच म्हणजे केवळ त्यांच्या तोंडाचा भाग नाही, कारण या चोचीनं अन्न खाण्याबरोबरच इतर अनेक कामं सहज केली जातात. जर तुम्ही वेगवेगळ्या जातींच्या पक्ष्यांचे बारकाईने निरीक्षण केलंत तर लक्षात येईल, की पक्षी आपल्या चोचीचा उपयोग चिखलातून किंवा झाडाच्या खोडातून अन्न शोधणं, बिया फोडणं, शिकार केलेल्या प्राण्याचे तुकडे करणं यासाठी तर करतातच; पण त्याचबरोबर चोचींचा उपयोग घरटं बांधण्यासाठी, पिल्लांना भरवण्यासाठी इतकंच काय; पण झाडावर चढणं किंवा वेलीवर लटकणं यासाठी सुद्धा केला जातो. म्हणजे चोच ही जणू पक्ष्यांसाठी हात, पाय, दागिना, चमचा, फावडं, करवत आणि बरंच काही असतं.

सर्वसाधारणपणे पक्षी निरीक्षण करताना पक्ष्याचा रंग, उडण्याची किंवा बसण्याची पद्धत यांबरोबरच त्याच्या चोचीचा आकार कसा आहे याकडे लक्ष दिलं जातं, कारण चोचीच्या आकारावरून त्या पक्ष्याचे भक्ष्य, घरट्याचा प्रकार याचा अंदाज बांधता येतो. प्राणिसृष्टीमध्ये वेगवेगळ्या गटांतल्या प्राण्यांच्या शरीररचनेकडे बघितल्यावर जाणवतं, की फक्त पक्ष्यांना चोच असते. उत्क्रांतीच्या ओघात, बदलत्या हवामानात आणि बदलणाऱ्या नैसर्गिक परिस्थितीमध्ये टिकून राहताना प्राण्यांच्या शरीरात बदल होत गेले. त्यातले कालसुसंगत, उपयोगी आणि आवश्यक बदल टिकून राहिले. याच प्रवासात पक्ष्यांची चोच निर्माण झाली.

पक्ष्यांच्या ज्या वेगवेगळ्या जाती निर्माण झाल्या, त्यांच्या चोचींमध्ये रंग, आकार यांत विविधता निर्माण झाली, मात्र पक्ष्यांच्या प्रकारांनुसार चोचींचे प्रकार बदलताना दिसले, तरी सगळ्या पक्ष्यांच्या चोचींची मूळ संरचना समान असते. कोणत्याही पक्ष्याची चोच दोन भागांमध्ये विभागलेली असते. वरचा भाग-मॅक्सिला आणि खालचा भाग-मॅन्डिबल! बहुतेक पक्ष्यांना याच चोचीवर बाह्य श्वसनेंद्रिय असते. तुम्ही जर बारकाईनं निरीक्षण केलंत, तर पक्ष्यांच्या चोचीच्या सुरुवातीला दोन लहान छिद्रं दिसतात. या छिद्रांमधूनच पक्षी श्वासोच्छ्वास करतात. अपवाद म्हणून किवी पक्ष्यांमध्ये ही छिद्रं चोचीच्या टोकावर असतात.

पक्षी अंड्यांमध्ये असताना त्यांच्या चोचीच्या टोकावर एक दातासारखा भागही येतो. त्याला 'एग टूथ' असे म्हणतात. अंड्यात पूर्ण वाढ झालेल्या पक्ष्यांच्या चोचीवर हा चिमुकला दात उगवतो. ह्याच दाताच्या मदतीनं पक्षी आपल्या अंड्याचं कवच आतून फोडून बाहेर येतो. सगळ्याच पक्ष्यांना हा एग टूथ असतो. अपवाद म्हणजे किवी पक्ष्याची पिल्ले. ही पिल्ले लाथा मारून अंड्याचे कवच फोडतात. स्टॉर्कसारखे काही पक्षी नेहमी त्यांच्या लांब लांब चोची आपटताना दिसतात. चोचीवर चोच आपटून ते जो आवाज करतात, त्याला वेगवेगळे अर्थ असतात.

चोचीच्या वैशिष्ट्यपूर्ण आकारामुळे लक्षात राहणाऱ्या पक्ष्यांची यादी केली, तर त्यात अर्थातच धनेश म्हणजेच हॉर्नबिल पक्ष्याचा क्रमांक बहुधा पहिला लागेल.



गुलाबी फ्लेमिंगो पक्ष्यांची चोच वैशिष्ट्यपूर्ण आकाराची असते. आपल्या गुलाबी, शेंदरी पंखांनी 'अग्निपंख' हे नाव सार्थ करणाऱ्या फ्लेमिंगोंची चोच मध्येच वाकडी झालेली असते. फ्लेमिंगोची भक्ष्य शोधण्याची, खाण्याची पद्धत जरा वेगळीच आहे.

पक्ष्यांची चोच म्हटल्यावर सर्वांत आधी जो शब्द आठवतो तो आहे, 'अणकुचीदार'. तो लागू होतो गरुड, घार, ससाणा अशा शिकारी पक्ष्यांना. सापापासून ते ससापर्यंत अनेक प्रकारच्या प्राण्यांची शिकार करणाऱ्या या







पक्ष्यांना आपली शिकार घट्ट पकडता यावी, फाडता यावी, तिचे तुकडे करता यावेत म्हणून बाकदार, अणकुचीदार चोच असते. या चोचीचा वरचा भाग खालच्या भागापेक्षा थोडा लांब आणि वळलेला असतो. या उलट सुतार, हुप्पो या पक्ष्यांची चोच एकदम सरळसोट असते. त्यांना जमिनीवरचे किडे, झाडाच्या खोडात दडलेले किडे शोधून बाहेर काढून खायचे असतात.



चिमुकले शिंजीर अर्थात शक्करखोरा म्हणून ओळखले जाणारे सनबर्ड्स फुलांमधला मधुरस चोखतात. त्यासाठी त्यांना शरीरापेक्षा लांब, बाकदार चोच असते. आकाराने चिमणीपेक्षाही लहान असलेला सनबर्ड एखाद्या फुलाच्या पाकळीवर आरामात बसून फुलाला धक्काही न लावता, आपल्या पातळ, बाकदार, लांब चोचीनं फुलातला मध खातो.

चोचीचा सर्वांत आगळा उपयोग करणारा पक्षी म्हणजे पोपट. आपल्या काहीशा जाडसर शिवाय बाकदार चोचीने पोपट शेंगा किंवा अगदी तिळाइतक्या लहान बिया तर आरामात फोडून खातोच, शिवाय झाडाच्या डहाळ्यांवरून चालताना, याच चोचीने डहाळी पकडून पोपट आपल्या चोचीचा उपयोग पायांसारखाही करतो. उडता उडता पाण्यावर सूर मारून अचूक मासे पकडणाऱ्या खंड्याची चोच सरळसोट आणि टोकदार असते. कीटकांवर, विशेषत: माशांवर, उदरनिर्वाह करणाऱ्या वेड्या राघूची चोचही त्याला उडता उडता माश्या, टोळ पकडायला सोपं जावं अशीच सरळ आणि लांब असते. आपलं नजाकतदार घरटं विणणाऱ्या सुगरण किंवा बाया पक्ष्याची चोच फार वेगळी नसते. बहिणाबाईंनी वर्णन केल्याप्रमाणे 'तिची उलूशीच चोच' असून सुगरण पक्षी घरटे विणण्याची कलाकुसर कशी करतो, हा प्रश्न पडतोच. या उलट चोचीने पाने शिवून घरटे विणणाऱ्या शिंपी पक्ष्याची चोच एखाद्या सुईसारखी पातळ आणि टोकदार असते.




पक्ष्याचं हे चोचपुराण पाहिल्यावर एक गोष्ट लक्षात येते. निसर्गाच्या या अफाट पसाऱ्यामध्ये प्रत्येक जिवाला विशिष्ट असं स्थान आहे आणि त्या स्थानावर तो जीव राहावा म्हणून निसर्गाने त्याला काही आयुधं, हत्यारं दिली आहेत. पक्ष्यांची चोच हे त्याचं उत्तम उदाहरण म्हणता येईल. प्रत्येक पक्ष्याची चोच त्याच्या अधिवासाप्रमाणे, अन्नानुसार बदलताना दिसते; पण जर असे वेगवेगळी भूमिका बजावणारे पक्षी एखाद्या परिसरात नसतील तर? या 'तर'वरही निसर्गाकडे उत्तर आहे. दक्षिण अमेरिकेतल्या गॅलापॅगोस बेटावर फिंच पक्ष्याच्या तेरा जाती आढळतात. आता फिंच या एकाच प्रकारातले असल्याने त्यांची मूळ शरीररचना सारखीच आहे, पण या सगळ्यांचं खाद्य मात्र वेगवेगळं आहे, म्हणजे एक फिंच जमिनीवरील किडे खातो, दुसरा कठीण कवचाची फळे खातो. तिसरा धान्य खातो, तर चौथा झाडाच्या सालीतील किडे खातो. आता खाणं बदलल्यामुळे या सगळ्यांच्या चोचीचे आकार, रचना बदललेली पाहायला मिळते. पक्ष्यांच्या चोचींची ही माहिती वाचल्यानंतर 'ज्याने चोच दिलीय तो चाराही देतो' या म्हणीचा नेमका अर्थ ध्यानात आला असेल.



## स्वाध्याय

**प्र. १. खालील आकृती पूर्ण करा.**


(अ)




(आ)




(इ)




**प्र. २. एका शब्दांत उत्तर लिहा.**

(अ) चोचीचा वरचा भाग–

(आ) चोचीचा टोकदार असलेला दातासारखा भाग–

(इ) चोचीचा वैशिष्ट्यपूर्ण आकार असलेला पहिल्या क्रमांकाचा पक्षी–

(ई) 'एग टूथ' नसलेला पक्षी–

**प्र. ३. कोण ते लिहा.**

(अ) 'अग्निपंख' हे नाव सार्थ करणारा पक्षी–

(आ) चोचीचा सर्वांत वेगळा उपयोग करणारा पक्षी–

(इ) 'शक्करखोरा' म्हणून ओळखले जाणारे पक्षी–

(ई) घरटे विणण्याची कलाकुसर जाणणारा पक्षी–

**प्र. ४. फरक लिहा.**

| किवी पक्षी | इतर पक्षी |
| --- | --- |
| (१) | (१) |
| (२) | (२) |

**प्र. ५. पाठाच्या आधारे तुमच्या शब्दांत लिहा.**

(अ) 'चोचींचे आकार भक्ष्याप्रमाणे बदलतात' या विधानाचा अर्थ.

(आ) पक्ष्यांच्या चोचपुराणातून तुम्हांला मिळालेली नवीन माहिती.

(इ) 'ज्याने चोच दिलीय तो चाराही देतो' या म्हणीचा अर्थ.

**प्र. ६. खालील वाक्यांतील क्रियाविशेषणे अधोरेखित करा.**

(अ) सनबर्ड्स फुलाच्या पाकळीवर आरामात बसतात.

(आ) बहिणाबाईंनी सुगरणीच्या चोचीचं अचूक वर्णन केलं.

(इ) तुम्ही पक्ष्यांचे बारकाईने निरीक्षण करा.

(ई) घार आपली शिकार घट्ट पकडते.

**प्र. ७. पाठात आलेल्या पक्ष्यांच्या नावांची यादी करा व त्या पक्ष्यांच्या नावासमोर त्याचे वैशिष्ट्य लिहा.**

## खेळूया शब्दांशी.

**(अ) खाली दिलेल्या चित्रांसाठी योग्य विशेषणे सुचवा व त्याखालील चौकटींत लिहा.**





**(आ) खाली दिलेल्या चौकोनातील शब्द असेच लिहा.**

| | | | | | | |
| --- | --- | --- | --- | --- | --- | --- |
| प्रसिद्ध | सहानुभूती | वैयक्तिक | जीवनशैली | भाषातज्ज्ञ | अभिव्यक्ती | विश्वकोश |
| वैशिष्ट्य | साहाय्यक | वैश्विक | विपरीत | मुहूर्त | जीवनध्येय | मैत्रीण |
| महत्त्व | शिरोधार्य | संस्कृती | तीर्थरूप | दृष्टी | कनिष्ठ | मैत्रिणीस |
| कर्तृत्व | निर्णय | सांस्कृतिक | दुष्काळ | दृष्टिकोन | सर्वांगीण | हार्दिक |

**उपक्रम :** या पाठातील तसेच इतर पाठांतील म्हणी शोधा. त्यांचा लेखनात उपयोग करा. वर्गात वाचून दाखवा.

## आपण समजून घेऊया.

### (१) अव्ययीभाव समास

- **खालील उदाहरणे अभ्यासा व सामासिक शब्द अधोरेखित करा.**

(अ) गरजूंना यथाशक्ती मदत करावी.

(आ) त्या शहरात जागोजागी वाचनालये आहेत.

(इ) क्रांतिकारकांनी देशासाठी आमरण कष्ट सोसले.

तुम्ही अधोरेखित केलेल्या सामासिक शब्दांची वैशिष्ट्ये पाहूया.

**अव्ययीभाव समासाची वैशिष्ट्ये**

- पहिले पद महत्त्वाचे असून ते बहुधा अव्यय असते.
- संपूर्ण सामासिक शब्द क्रियाविशेषण अव्ययाप्रमाणे काम करतो. आ, यथा, प्रति वगैरे उपसर्गांना संस्कृतमध्ये अव्यय म्हणतात.
- 'जागोजागी' या शब्दात अव्यय दिसत नसले, तरी त्याचा विग्रह अव्ययासह केला जातो म्हणून या शब्दाचा समावेश अव्ययीभाव समासात होतो. उदा., जागोजागी–प्रत्येक जागी

- **खालील विग्रहापासून सामासिक शब्द तयार करा.**

(१) प्रत्येक गावी (२) जन्मापासून (३) प्रत्येक पावलावर

### (२) तत्पुरुष समास

- **खालील उदाहरणे अभ्यासा व त्यांतील सामासिक शब्द शोधा.**

(अ) अर्णवला अनेक कविता तोंडपाठ आहेत.

(आ) मुंबई ही महाराष्ट्राची राजधानी आहे.

(इ) या सप्ताहात क्रीडामहोत्सव आहे.

| शब्द | विग्रह |
|---|---|
| (अ) तोंडपाठ | तोंडाने पाठ |
| (आ) महाराष्ट्र | महान असे राष्ट्र |
| (इ) सप्ताह | सात दिवसांचा समूह |

**तत्पुरुष समासाची वैशिष्ट्ये**

- या समासात दुसरे पद महत्त्वाचे असते.
- अर्थाच्या दृष्टीने गाळलेले शब्द किंवा विभक्ती प्रत्यय विग्रह करताना घालावा लागतो.

- **खालील सामासिक शब्दांचा विग्रह करा.**

(१) राजपुत्र (२) क्रीडांगण (३) अष्टकोन (४) अयोग्य

## भाषासौंदर्य

- **खालील म्हणी पूर्ण करा.**

(१) मूर्ती लहान पण ………………… .

(२) शितावरून …………………… .

(३) सुंठीवाचून …………………… .

(४) …………………… सोंगे फार .

(५) …………………… खळखळाट फार .

(६) दोघांचे भांडण …………………… .

(७) …………………… सव्वालाखाची .

(८) …………………… चुली .

(९) …………………… आंबट .

(१०) अंथरूण पाहून…………………… .

(११) इकडे आड…………………… .

(१२) …………………… गावाला वळसा .

(१३) …………………… तळे साचे .

(१४) …………………… उपाशी .

(१५) …………………… आरसा कशाला ?

H43KTZ

# १७. अन्नजाल

**हर्ष सदाशिव परचुरे** (१९७९) : प्रसिद्ध कवी व लेखक. सह्याद्रीच्या दरीखोऱ्यांतून भटकताना वाढलेल्या जाणिवांमधून परिस्थितीकीचा अभ्यास करण्याची गरज जाणवली. पलाश आणि इकॉलॉजिकल सोसायटी ऑफ इंडिया यांचा परिस्थितीकीचा अभ्यासक्रम त्यांनी पूर्ण केला. कॉलेजच्या दिवसांत निर्माण झालेल्या गद्य आणि पद्य लेखनाची आवड पुढे वाढत गेली. वर्तमानपत्रांतून भटकंतीवर लिखाण केले. पुढे 'वनाचे श्लोक' हे परिस्थितीकीवरचं आगळंवेगळं लेखन त्यांनी केले. आज ते त्यांच्या कवीभूषणाच्या काव्यावरील अभ्यास व व्याख्याने आणि 'वनाचे श्लोक' यासाठी ओळखले जातात.

निसर्गात सर्व सजीव आणि निर्जिवांत परस्पर संबंध असतात. ते उत्तरोत्तर गाढ आणि क्लिष्ट होत जातात. जीवसृष्टी निर्माण होताना लाखो वर्षात अन्नसाखळ्या तुटत गेल्याने निसर्गानेच अन्नजाल निर्माण केले. म्हणजेच प्रत्येक जीव एकापेक्षा जास्त जीवांना खाऊन जगू लागला. त्यामुळे या अन्नजालातल्या काही जीवजाती नष्ट झाल्या, तरी ते पूर्ण नष्ट होत नाही मात्र ते नक्कीच कमकुवत होतं. हेच या 'वनाचे श्लोक'मधून घेतलेल्या पद्याचे सार आहे.

- **ऐका. वाचा. म्हणा.**



**कडीस जोडोनि दुज्या कडीला**
**मनुष्य बनवीतसे साखळीला**
**जरी तोडिले त्यात मधल्या कडीला**
**तरी भंगुनी जाइ संपूर्ण माला! ।।१।।**

**पाहा कसे कोळि विणतात जाळे**
**धाग्यास एका बहू जोडलेले**
**बहुतांस त्या जोडलेले कित्येक**
**बिघडते न जरिही तुटले अनेक ।।२।।**

**एकीस खायी दुजी प्राणिजात**
**दुजीस तीजी अशी साखळीत**
**जर का दुजी जात मेली समस्त**
**उभी साखळी होउनी जाय नष्ट! ।।३।।**

**निसर्गनारायणें देखिले हे**
**अन् वीणिले अन्नजालासि पाहे!**
**जरी प्राणिजाती किती लोपल्या रे**
**तरिही टिकोनी महाजाल राहे! ।।४।।**

**तगले असे की महाजाल रे ते**
**तरीहि जाणा ते क्षीण होते!**
**मारीत जाता बहू प्राणिजाती**
**तुटोनि संपेल ते जाल पुढती! ।।५।।**



## स्वाध्याय

**प्र. १. अन्नजालाचे महत्त्व पटवून देण्यासाठी कवीने दिलेली दोन उदाहरणे–**

**प्र. २. चुकीचे विधान शोधा.**

(अ) (१) मधली कडी तुटली तरी संपूर्ण साखळी कायम राहते.
(२) निसर्गनारायणाने महाजाल निर्माण केले.
(३) कोळी आपले जाळे स्वकष्टाने विणतो.
(४) कोणत्याच प्राण्याची माणसाने हत्या करू नये.

(आ) (१) अन्नजालातील प्राणिजाती नष्ट झाल्यास ते क्षीण होते.
(२) कोळ्याच्या जाळ्यातील काही धागे तुटले तर काही बिघडत नाही.
(३) एक प्राणिजात नष्ट झाली तर अन्नसाखळी तुटते.
(४) अनेक प्राणिजाती मारल्या तरी अन्नजाल टिकून राहते.

**प्र. ३. कोळ्याचे जाळे व अन्नजाल यांच्यातील साम्य लिहा.**

| कोळ्याचे जाळे | अन्नजाल |
|---|---|
| | |

**प्र. ४. खालील कृतीचा/घटनेचा परिणाम लिहा.**

मानवाने प्राण्यांना मारले तर–

**प्र. ५. तुमच्या शब्दांत स्पष्ट करा.**

(अ) तुम्हांला समजलेली अन्नसाखळी तुमच्या शब्दांत सोदाहरण स्पष्ट करा.
(आ) कवितेच्या आधारे 'जीवो जीवस्य जीवनम् ।' हे सुवचन स्पष्ट करा.

## खेळ खेळूया.

- दोऱ्याचे एक रीळ घ्या. वर्गातील सर्व मुले वर्गात किंवा मैदानावर उभे राहा. दोऱ्याचे एक टोक एका मुलाच्या बोटाला बांधा. रिळाचा दोरा मोकळा करत एकेका मुलाला दोरा बोटाने धरून ठेवायला सांगा. वर्गातील सर्व मुलांनी दोरा बोटाने धरून ठेवेपर्यंत कृती कोणत्याही क्रमाने चालू ठेवा. शेवटच्या मुलाच्या बोटाला दोरा बांधा किंवा रीळ धरून ठेवायला सांगा. ही कृती चालू असताना काय घडले त्याचे निरीक्षण करा.

अन्नजालाप्रमाणे दोऱ्याचे जाळे तयार झाले का? कृती करताना दोरा सुटला किंवा तुटला तर काय होते ते पाहा. त्यावरून अन्नजालाचे महत्त्व तुमच्या शब्दांत सांगा.

## शोध घेऊया.



- **अन्नसाखळी नष्ट झाल्याचे दुष्परिणाम विज्ञान अभ्यासातून स्पष्ट होण्यासाठी आंतरजालाची मदत घ्या.**

**उपक्रम :** तुमच्या परिसरातील एका अन्नसाखळीत समाविष्ट कीटक, पशुपक्षी यांचा शोध घेऊन त्यांची माहिती मिळवा.



## वाचा.

- **खालील उतारा वाचा.**

विद्यार्थिजीवनात चांगल्या सवयींना अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. चांगले साहित्य वाचणारा, योग्य त्याच बाबी लक्षात ठेवणारा, योग्य ठिकाणी खर्च करणारा, आवश्यक असेल तेवढेच बोलणारा, नेहमीच इतरांच्या मदतीसाठी तत्पर असणारा विद्यार्थी भावी आयुष्यात समाजात आपली वेगळी ओळख निर्माण करतो. त्याने निवडलेल्या क्षेत्रात यश संपादन करण्यासाठी त्याला विशेष मेहनतीची आवश्यकता पडत नाही.

तुम्ही जोपर्यंत मार्गदर्शन मिळवण्यासाठी स्वत:हून पुढाकार घेणार नाहीत, तोपर्यंत तुम्हांला कोणाचेही मार्गदर्शन मिळणार नाही. आपल्याला काय करायचे याची दिशा दुसरा ठरवणार नाही. तुम्हांलाच दिशा ठरवायची आहे आणि तुम्हांलाच त्या दिशेने चालायचेही आहे. हे स्वप्रयत्नानेच शक्य आहे. चांगल्या सवयी केवळ स्वप्रयत्नाला चालना देत नाहीत, त्या केवळ ध्येय गाठून थांबत नाहीत, तर त्या संपूर्ण मानवी गुण वृद्धिंगत करण्यास मदत करतात.

HC3CN5

# १८. जलदिंडी

**डॉ. विश्वास येवले** (१९६०) : प्रसिद्ध लेखक, स्त्री रोग तज्ज्ञ व पर्यावरण अभ्यासक. त्यांची 'नावाडी', 'योगार्थी', 'योगार्थु', 'उवाच', 'सूर्यनमस्कार', 'द बिग मदर', 'थोरली आई', 'मैत्री करू नद्यांशी' इत्यादी पुस्तके प्रसिद्ध आहेत. त्यांनी जलदिंडीची अभिनव कल्पना साकारली आहे. नद्यांच्या जलप्रवाहांच्या प्रदूषणाबाबत समाजात भान जागवण्याचे मोठे काम त्यांनी केले आहे. 'जलदिंडीची गोष्ट' या पुस्तकरूपाने हाच प्रवास रसाळ भाषेत लेखकाने आपल्यासमोर मांडला आहे.

प्राचीन काळापासून नद्यांच्या काठी मानवी जीवन फुलले. त्यामुळेच नद्यांना लोकमाता म्हटले जाते; परंतु आजच्या 'वापरा आणि फेका' या जीवनशैलीमुळे नद्यांचे प्रवाह खूपच प्रदूषित झाले आहेत. या पार्श्वभूमीवर आळंदी ते पंढरपूर दरम्यानच्या इंद्रायणी-भीमा-चंद्रभागा नदीच्या पात्रातील प्रदूषण दूर करण्यासाठी बारा वर्षे सुरू राहिलेल्या 'जलदिंडी' या थरारक जलप्रवासाचा परिचय या पाठात करून दिला आहे. प्रस्तुत पाठ 'जलदिंडीची गोष्ट' या पुस्तकातून घेतला आहे.

झुळझुळत्या वाऱ्यानं मुळा-मुठेचं संगमपात्र आनंदाच्या डोहात बुडालेलं. काठावरच्या गर्द झाडीत पाखरांचा चिवचिवाट चाललेला. उन्हं डोक्यावर स्थिर झालेली. संगमाच्या अनुभवाने रोमांचित झालेल्या पाण्याच्या लाटांवर सूर्याचे प्रतिबिंब हलत, झुलत राहणारं. शिडाची नाव या वातावरणात हुळहुळून गेलेली. ही नौका मी संगमावर आणलेली. नौकेचं सुकाणू एका हातात धरून दुसऱ्या हातात शिडाची दोरी धरून मी पाणी कापत सुळकन नौका प्रवाहात खेचली.

मी माझ्या मुलाला आणि त्याच्या मित्रांना नौका शिकवण्याचं ठरवलेलं. सहा-सात वर्षांचं वय त्याचं. शिडाचा दोर धरून तो बसला होता. तो पहिल्यांदाच नौकेत बसत होता. बसताना उत्साह होता, पण जशी नौका वेगानं धावू लागली व जोराने हेलकावू लागली तसं त्याच्या उत्साहाचं रूपांतर भीतीत झालं. त्यानं नाव परत काठावर न्यायला सांगितली. त्याला धीर दिला, की जरी नाव उलटली तरी तुला पोहता येतं, मग काय काळजी आणि मी तशीच नौका चालवत ठेवली. तरी त्याच्या रडक्या आवाजात विनवण्या चालूच होत्या. शेवटी न राहवून रागवून त्याला 'भित्रट' म्हणत मी नाव काठाकडं वळवली.

त्या लहानग्याचा चेहरा करारी दिसू लागला. त्याचा आवाज किंचित वाढला. म्हणाला, ''खडकवासल्याच्या स्वच्छ पाण्याच्या तलावात घेऊन चला मला आणि करा नाव उलटी तळ्याच्या मध्यात. काही हरकत नाही. मी भितो आहे तो या घाण पाण्यात पडायला.''

मुलाच्या उत्तरानं नदीच्या पाण्याकडे माझी नजर वळली. नाव चालवताना वर ढगांवर पसरलेली सूर्याची लाली बघणारी नजर पाण्यावर पडलेला कचरा व घाण बघू लागली. लक्षात आलं, की या पिढीने पर्यावरणाचा केवढा ऱ्हास बघितलाय. जे पाणी प्यायलं जायचं ते करंगळीनेही स्पर्शू नये इतकं दूषित झालं होतं. कुठला वारसा ठेवणार आहोत आम्ही?

आजपर्यंत नदीच्या पाण्याच्या प्रदूषणाचं गांभीर्य माझ्या लक्षात आलं नव्हतं. पाण्याचा रंग, त्यावर तरंगत असलेल्या प्लॅस्टिकच्या पिशव्या, अमर्याद वाढलेली जलपर्णी, घाणीमुळे काळे पडलेले खडक व दलदल झालेली काठावरली माती. एक नकोसा उग्र दर्पही होता नदीला. काठाजवळील पाण्यावर एक काळी सायच जणू आली होती. तळाचा गाळ मध्येच बुडबुड्यांसहित पाण्यावर उकळी आल्यासारखा उठायचा आणि पाण्यावर पसरायचा. नदीचं सौंदर्य व पाण्याचं पावित्र्य शहराच्या धगधगीनं आणि निष्काळजीपणामुळे काळवंडलं होतं.

आपण काहीतरी करावं असं मनात ठरवलं. खडकवासला धरण शहरात आणणं शक्य नाही; पण नदीचं पाणी स्वच्छ करता येऊ शकेल, तसा प्रयत्न यशस्वी होईल का? समस्येची व्याप्ती बघून मन कातरलं. या जाणिवेनं खांद्यावर भार पडला.

नदीचे सौंदर्य कधी काळी अनुभवलेले साथी एकत्र आणावेत आणि सर्वांनी मिळून नदीच्या स्वच्छतेचं काम करावं का? पात्रात वाढलेली जलपर्णी हे अनारोग्याचं कारण आहे. नदीच्या आणि लोकांच्याही. त्यामुळे जलपर्णी निर्मूलनाचंच काम हाती घ्यायचं ठरवलं. पण एवढं मोठं कार्य! कशी सुरुवात करावी?

नदी सफाईची सुरुवात म्हणून संबंधित अधिकाऱ्यांच्या

भेटीगाठी सुरू केल्या. त्यांनी सहकार्य करायचं आश्वासन दिलं. समविचारी मित्रांची फळी तयार होऊ लागली. प्रत्येक जण चर्चेत भाग घेत अनुभवांवरून सूचना करू लागला. मग काही दिवसांत लक्षात आलं, की आमच्या चर्चाच जास्त आणि प्रत्यक्षात सफाईचं काम मात्र नगण्य झालेलं. तत्काळ चापट बसून जाग आली. आता मात्र स्वत: जमेल तेवढी कामास सुरुवात करावी. धक्क्याजवळच्या झाडीच्या जाळीत अनेक प्लॅस्टिकच्या पिशव्या आणि कचरा अडकलेला होता. तो काढावा असं ठरवलं.

मनात 'काहीतरी केलं पाहिजे' या उत्साहाचं वादळ होतं; पण प्रत्यक्ष एक पानही हलत नव्हतं.

काहीही न करता हातावर हात ठेवून मी तसाच बसून राहिलो. मग आईचे शब्द आठवले, ''हातावर हात धरून बसण्याऐवजी, दुसऱ्यांच्या हातांनी काम करवून घेण्याऐवजी स्वत:चेच हात वापर की कचरा काढायला.'' मग मी उत्साहाच्या भरात भराभर शेजारच्या झाडीत अडकलेलं प्लॅस्टिक काढू लागलो. ही कृती अन्य सहकाऱ्यांना लगेच खेचून घेऊन आली. जे काम तोंडी समजावून सांगून आठ-दहा दिवस हललं नव्हतं ते आठ-दहा मिनिटांत पार पडलं सुद्धा. आता जमेल तेवढं आणि जमेल तेव्हा स्वच्छतेचं अभियान चालवायचं होतं.

नदीचं प्रदूषण अनेक प्रकारचं होतं. मैलापाणी, रसायनं, तरंगत-बुडत असलेल्या टाकाऊ वस्तू, गाडीच्या चाकापासून ते चपलांपर्यंत. 'वापरा आणि फेका' या संस्कृतीला धरून जे काही आज मी वापरत होतो ते सर्व दिसत होतं या नदीपात्रात. या प्रदूषणाची अग्रणी म्हणून जलपर्णी बेबंद वाढली होती. नदीचा काठच काय तो तिला रोखत होता आणि तिच्यावर डासांची बेसुमार पैदास झाली होती.

दिवसभर काम करून डोळ्यांसमोरची जलपर्णी आणि तरंगता कचरा सर्वांनी काढला. कचऱ्याला हात न लावू इच्छिणारे दुसऱ्यांना बघून आपोआप आपली घृणा विसरले. दिवसभर उन्हात राबून, वल्हवून, वाकून कचरा उपसून कष्ट बरेच झाले होते; पण थकवा जाणवत नव्हता. स्वच्छ झालेला नदीचा भाग बघत समाधानात सर्वजण संध्याकाळी आपापल्या घरी गेले.

मी दुसऱ्या दिवशी नदीवर जायला निघालो. डोळ्यांसमोर कालचं नदीचं स्वच्छ झालेलं रूप होतं. सुंदर काठ आणि स्वच्छ केलेल्या नदीचं जलपर्णी आणि कचराविरहित पात्र; पण काठावर येऊन बघतोय तर नदीपात्र परत कचऱ्यानं व पाल्यानं भरलं होतं. सर्व श्रम वाया गेले होते. आम्ही आदल्या दिवशी साफ केलेल्या जागी प्रवाहाबरोबर परत कचरा वाहत आला होता. कालच्या कामाचा थकवा आता मात्र लगेच जाणवू लागला.

रात्री अंथरुणावर पडल्या पडल्या माझ्या मनात विचार आला, 'वाडी, गावापासून कसबा, नगर व आज महानगर ही वाढ होताना आधीच जर नदीकाठचा विशिष्ट रुंदीचा पट्टा फक्त वनराईसाठी राखला असता तर सांडपाणी शुद्ध होत नदीत गेलं असतं. ते पाणी झाडांसाठी खतपाणी झालं असतं. झाडीही फोफावली असती व नदीपात्रातून येत शहरात पसरत येणारी हवाही शुद्ध राहिली असती. भूतकाळात केलेल्या कामामुळे हा वर्तमान आहे. मी व्यक्तिश: व माझ्या आधीच्या पिढ्यांनी केलेल्या कामामुळे आज मी इथे आहे. भोगा आता गतकर्माची फळं!'



दुसऱ्या दिवशी जलपर्णी काढण्याचं काम पुन्हा सुरू झालं. आधी रविवारी होणारं काम हळूहळू दररोज होऊ लागलं. बहुधा ती जीवनशैलीच बनली आमची. काही वेळेसच यश मिळायचं; पण नदीचं

स्वच्छ रूप हे ध्येय आहे, हे लक्षात ठेवून काम चालू राहिलं.

आळंदीहून निघून इंद्रायणी, भीमा नद्यांतून प्रवास करताना नदीची स्वच्छता करत पंढरपूरला पोहोचायचे ठरले. नदीमार्गे प्रवास करायचा हे ठरवून प्रवासाची ढोबळ रचना आकार घेऊ लागली.

नंतरचे काही महिने साधनसामग्री जमा करण्यात गेले. मुक्कामाच्या संभाव्य गावांच्या भेटी झाल्या. मित्रांशी बोलणं झालं. संस्थांना सांगून त्यांना सहकार्यासाठी विनवलं. मदतीचा हात अनेक ठिकाणांवरून पुढे आला. 'नदीतून पंढरपूर' प्रवाशांचं एक कुटुंब तयार होऊ लागलं. जवळ जवळ सगळी तयारी झाली; पण मोहिमेचं नाव ठरलं नव्हतं.

''पंढरपूरला सगळे लोक चालत जातात. पालखीसोहळा होतो. बरोबर दिंड्या चालू लागतात. आपलीही दिंडीच. नदीच्या प्रवाहातून आपली दिंडी जाणार मग नाव ठेवूया जलदिंडी''. मी सर्वांना एकत्र बोलावून सांगितलं, ''सकारात्मक स्वास्थ्य, पर्यावरण आणि अध्यात्म यांची सांगड घालणारी दिंडी म्हणजे जलदिंडी. जलदिंडी, सर्वांची दिंडी.'' इसवी सन २००२ ला सुरू झालेली ही जलदिंडी सलग १६ वर्षे चालू राहिली.



## स्वाध्याय

**प्र. १. खालील परिणाम कोणत्या घटना वा कृतींचे आहेत ते सांगा.**

| परिणाम | घटना/कृती |
| --- | --- |
| (अ) लेखकाच्या मुलाचा चेहरा करारी दिसू लागला. | (१) |
| (आ) नदीचं सौंदर्य आणि पाण्याचं पावित्र्य काळवंडलं होतं. | (२) |
| (इ) इतर लोक आपली घृणा विसरले. | (३) |

**प्र. २. खालील आकृती पूर्ण करा.**

**पाण्यातील प्रदूषित घटक**

↓ ☐ ↓ ☐ ↓ ☐ ↓ ☐

**प्र. ३. लेखकाच्या मते भूतकाळात केलेली चूक कशी सुधारायला हवी होती या घटनाक्रमाचा ओघतक्ता बनवा.**

नदीकाठचा विशिष्ट रुंदीचा पट्टा वनराईसाठी राखणे.

↓

☐

↓

☐

↓

नदीपात्रातून येत शहरात शुद्ध हवा पसरणे.

**प्र. ४. पालखीसोहळा या शब्दातील अक्षरांपासून पालखी व सोहळा हे शब्द सोडून चार अर्थपूर्ण शब्द तयार करा.**

**प्र. ५. स्वमत लिहा.**

(अ) नदीचे पाणी प्रदूषित होण्यास कारणीभूत असलेल्या मानवी कृती लिहा.

(आ) पोहायला येत असूनही लेखकाच्या मुलाला पाण्यात पडण्याची भीती वाटली, याचे तुम्हांला समजलेले कारण स्पष्ट करा.

(इ) 'जलदिंडी'मध्ये सहभागी झाल्यास तुम्ही कोणती कामे आवडीने कराल ते लिहा.

(ई) 'स्वत:चे हात वापर की कचरा काढायला' लेखकांच्या आईच्या या उपदेशातून तुम्ही काय शिकाल? सोदाहरण लिहा.

## खेळूया शब्दांशी.

**(अ) खालील वाक्यांतील काळ ओळखा.**

(अ) जलपर्णी काढण्याचे काम सुरू होईल.

(आ) मदतीचा हात लगेच पुढे आला.

(इ) त्यांनी मुलाला नौका शिकवण्याचे ठरवले होते.

(ई) पंढरपूरला लोक चालत जातात.

**(आ) खालील वाक्यांचा प्रकार ओळखा.**

(अ) पण तसा प्रयत्न यशस्वी होईल का?

(आ) पण एवढं मोठं कार्य!

(इ) त्यांना थकवा जाणवत नव्हता.

(ई) कचरा काढायला स्वत:चेच हात वापर.



## चर्चा करूया.

- वर्गातील मित्र-मैत्रिणींशी चर्चा करून 'वापरा आणि फेका' या संस्कृतीत मोडणाऱ्या वस्तूंची यादी करा. प्रदूषण टाळण्यासाठी या वस्तूंची विल्हेवाट कशी लावावी, याबद्दल तुमचे मत वर्गात सांगा.
- प्लॅस्टिक बंदीच्या निर्णयामागील कारणांची चर्चा करा. या निर्णयाची अंमलबजावणी यशस्वी व्हावी, म्हणून तुम्ही काय कराल ते वर्गात सांगा.

**उपक्रम :** नदी/तलाव/विहीर/ओढा यांपैकी उपलब्ध जलस्रोतांची पाहणी करा. पाणीप्रदूषण व त्याची कारणे, जलचरांवरील परिणाम आणि पाणी वापराबाबत लोकांच्या सवयी यांबाबत माहिती लिहा.

## आपण समजून घेऊया.

### (३) द्वंद्व समास

- **खालील उदाहरणे अभ्यासा व त्यांतील सामासिक शब्द शोधा.**

(अ) मुलांनी आईवडिलांची आज्ञा पाळावी.
(आ) ताई गावाहून चार-पाच दिवसांत परत येईल.
(इ) दूरच्या प्रवासात सोबत अंथरूणपांघरूण न्यावे.

**द्वंद्व समासाची वैशिष्ट्ये**

- दोन्ही पदे महत्वाची असतात.
- सामासिक शब्दाचा विग्रह 'आणि', 'व', 'अथवा' 'किंवा' या उभयान्वयी अव्ययांनी करतात.
- दोन्ही पदांच्या अर्थाशिवाय त्याच जातीच्या इतर पदार्थांचाही समावेश विग्रहात केलेला असतो.

| शब्द | विग्रह |
|---|---|
| (अ) आईवडील | आई आणि वडील |
| (आ) चार-पाच | चार किंवा पाच |
| (इ) अंथरूणपांघरूण | अंथरण्यासाठी व पांघरण्यासाठी लागणाऱ्या वस्तू व इतर कपडे |

- **खालील सामासिक शब्दांचा विग्रह करा.**

(१) भाजीपाला
(२) सुखदु:ख
(३) स्त्रीपुरुष
(४) केरकचरा

### (४) बहुव्रीही समास

- **खालील उदाहरणे अभ्यासा व त्यांतील सामासिक शब्द शोधा.**

(अ) चंद्र, तारे अनंत आकाशात उगवतात.
(आ) शिक्षकांनी चौकोनाचे गुणधर्म शिकवले.
(इ) लंबोदराला मोदक आवडतात.
(ई) दुष्काळात निर्धनाने कोणाकडे बघावे ?

**बहुव्रीही समासाची वैशिष्ट्ये**

- दोन्हीही पदे महत्वाची नसून या दोन्हींशिवाय तिसऱ्याच पदाचा बोध होतो.
- हा सामासिक शब्द त्या तिसऱ्या पदाचे विशेषण असतो.

| सामासिक शब्द | विग्रह |
|---|---|
| (अ) अनंत | नाही अंत ज्याला तो |
| (आ) चौकोन | चार आहेत कोन ज्याला तो |
| (इ) लंबोदर | लंब आहे उदर ज्याचे असा तो |
| (ई) निर्धन | निघून गेले आहे धन ज्याच्यापासून तो |


- **खालील सामासिक शब्दांचा विग्रह करा.**

(१) नीरस (२) दशमुख (३) निर्बल (४) मूषकवाहन

- **खालील सामासिक शब्दांचा विग्रह करून समासाचे नाव लिहा.**

| सामासिक शब्द | विग्रह | समासाचे नाव |
|---|---|---|
| (अ) चहापाणी | | |
| (आ) क्षणोक्षणी | | |
| (इ) त्रिभुवन | | |
| (ई) गजानन | | |

- **वाचा आणि समजून घ्या.**



**नीता** : आजी हे बघ, नदीतलं पाणी दिसतच नाही.

**आजी** : हो, नदीत जलपर्णी उगवली आहे.

**नीता** : जलपर्णी म्हणजे काय गं आजी?

**आजी** : पाण्यात उगवणारी वनस्पती.

**नीता** : ती पाण्यात का उगवते?

**आजी** : पाणी अशुद्ध, प्रदूषित झालं की उगवते.

**नीता** : आजी, आपल्यामुळेच नदीचं पाणी प्रदूषित झालयं ना!

**आजी** : हो, माणसांच्या वाईट सवयींमुळे नदीची हानी होत आहे. शहराच्या सांडपाण्यातून, रासायनिक खतांचा वापर केलेल्या शेत जमिनीतून झिरपणाऱ्या पाण्यातील किंवा कारखान्याच्या सांडपाण्यातील नायट्रोजन व फॉस्फरस ही द्रव्ये पाण्यात मिसळली की जलपर्णी वाढते. जलपर्णीची वाढ ही खऱ्या अर्थाने जलप्रदूषणाची निदर्शक आहे.

**नीता** : अरेरे! आजी, आता या जलपर्णींचं काय करायचं?

**आजी** : पाणी दूषित होणार नाही याची काळजी घ्यायची.

HCC8PS

# १९. गे मायभू

**सुरेश भट** (१९३२-२००३) : सुप्रसिद्ध कवी, गझलकार. सुरेश भट यांचे खरे सामर्थ्य त्यांच्या राजकीय, सामाजिक आशयाच्या कवितांतून जाणवते. 'रूपगंधा', 'रंग माझा वेगळा', 'एल्गार', 'झंझावात' हे काव्यसंग्रह प्रसिद्ध आहेत. त्यांनी 'गझल' या रचनाबंधाचा निष्ठापूर्वक स्वीकार व प्रसार केला. त्यांच्यामुळे 'गझल' हा प्रकार मराठीत अत्यंत लोकप्रिय झाला. 'काफला' या संपादित संग्रहात त्यांच्या काही निवडक गझलांचा समावेश आहे.

मातृभूमी आपणाला वाढवते, सर्वांगाने घडवते. आपल्या जीवनात आईइतकेच मातृभूमीला अनन्यसाधारण महत्त्व असते. त्यामुळे मातृभूमीच्या ऋणातून मुक्त होण्यासाठी काय नि किती करावे असे कवीला सतत वाटत राहते. प्रस्तुत कवितेत आपल्या अंत:करणातील मातृभूमीविषयीचा अतीव आदर कवीने अतिशय गौरवपूर्ण रीतीने व्यक्त केला आहे.

- ऐका. वाचा. म्हणा.


**गे मायभू तुझे मी फेडीन पांग सारे;**
**आणीन आरतीला हे सूर्य, चंद्र, तारे.**

**आई, तुझ्यापुढे मी आहे अजून तान्हा;**
**शब्दात सोड माझ्या आता हळूच पान्हा.**

**आई, तुझ्यापुढे ही माझी व्यथा कशाला ?**
**जेव्हा तुझ्यामुळे ह्या जन्मास अर्थ आला.**

**मी पायधूळ घेतो जेव्हा तुझी जराशी,**
**माझी ललाटरेषा बनते प्रयाग काशी.**

**आई, तुझी अशी मी गाईन रोज गाणी;**
**माझी तुझ्या दुधाने गेली भिजून वाणी!**





## स्वाध्याय

**प्र. १. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) कवी कुणाचे पांग फेडू इच्छितो?

(आ) मातृभूमीची आरती करण्याची कवीची साधने कोणती?

(इ) कवीच्या जन्माला कुणामुळे अर्थ प्राप्त झाला?

**प्र. २. खालील काव्यपंक्तींचा तुम्हांला समजलेला अर्थ स्पष्ट करा.**

(अ) आणीन आरतीला हे सूर्य, चंद्र, तारे–

(आ) आई, तुझ्यापुढे मी आहे अजून तान्हा–

**प्र. ३. हे केव्हा घडते ते लिहा.**

(अ) कवीची ललाटरेषा प्रयाग काशी बनते............

(आ) कवी मातृभूमीची उत्तम गाणी गाऊ शकतो............

**प्र. ४. खालील अर्थाच्या कवितेतील ओळी शोधून लिहा.**

(अ) माझी भाषा मधुर आणि समृद्ध बनव.

(आ) शब्दसामर्थ्य, प्रतिभासामर्थ्य प्राप्त झाल्याने गाणे गाईन.

**प्र. ५. कवितेत आलेले दोन वाक्प्रचार शोधा व त्यांचा वाक्यांत उपयोग करा.**

**प्र. ६. कवितेतील यमक जुळणारे शब्द शोधून लिहा.**

**प्र. ७. स्वमत.**

(अ) कवीने पायधूळ कशाला म्हटले असावे, ते स्पष्ट करा.

(आ) 'गे मायभू तुझे मी फेडीन पांग सारे' या ओळीचा सरळ अर्थ लिहा.

(इ) कवितेतून व्यक्त झालेली मातृभूमीविषयीची भावना तुमच्या शब्दांत लिहा.



### चर्चा करूया.

- आताच्या काळात भारतभूमीचे पांग फेडण्यासाठी तुम्ही काय कराल, याची गटात चर्चा करा व वर्गात सांगा.

**उपक्रम :**

(१) आपल्या मायभूचे पांग फेडण्यासाठी काम केलेल्या पाच लोकांची माहिती मिळवा. वर्गात सांगा.

(२) स्वातंत्र्यवीर सावरकरांची 'सागरास' ही कविता मिळवून वाचा.

❀❀❀


HCL4RF

# २०. शब्दकोश (स्थूलवाचन)

दैनंदिन जीवनात आपण सहजपणे अनेक नवीन शब्द वापरतो. हे शब्द सहजपणे आपल्या कानावर पडतात अथवा वाचनातून समजतात. संदर्भानुसार आपण त्यांचे अर्थ लावतो व त्यांचा उपयोग करायला शिकतो. प्रत्येक वेळी त्या शब्दांचा नेमका अर्थ किंवा अर्थच्छटा आपल्याला समजलेली असतेच असे नाही.

भाषिक समृद्धीसाठी शब्दाचा नेमका अर्थ माहीत करून घेणे अत्यंत आवश्यक असते, यासाठी शब्दकोश हे महत्त्वाचे साधन आहे.

यावर्षी आपण शब्दाकोशाची ओळख करून घेणार आहोत. नवीन शब्दांचे अर्थ आपण शब्दकोशात पाहू शकतो. हे शब्द शब्दकोशातून कसे शोधता येतात त्याचे मार्गदर्शन या पाठातून मिळते. नवीन शब्दांचे अर्थ तुम्ही शब्दकोशात पहायला शिकावेत, त्याची सवय तुम्हांला लागावी व शब्दांच्या अर्थाची मजा घेता यावी, या दृष्टीने या पाठाचा अभ्यास महत्त्वपूर्ण आहे.



(शाळेच्या मधल्या सुट्टीमध्ये नेहा व सायली या दोन मैत्रिणींमधील हा संवाद)

**नेहा** : सायली, स्वातंत्र्यदिन-प्रजासत्ताक दिन या शब्दांमधील 'दिन' शब्दाचा अर्थ 'दिवस' असा आहे, हो ना ग?

**सायली** : हो....असाच आहे. का ग?

**नेहा** : अगं, मागच्या धड्यात हा शब्द आला होता, तेव्हा बाईंनी या शब्दाचा अर्थ सांगितला होता 'गरीब'!

**सायली** : दोन्ही शब्द नीट बघितलेस का तू? कसे लिहिले आहेत ते?

**नेहा** : आपण आता पुस्तकातच बघूया. शब्द कसा लिहिलाय ते....

**सायली** : हं. हा बघ मागचा धडा....आणि हा शब्द 'दीन'!

**नेहा** : अरे हो, शब्द एकच असला, तरी दोन्ही शब्द लिहिण्यात फरक आहे.

**सायली** : बरोबर! 'दीन' शब्दात 'दी' दीर्घ आहे. 'दीन' म्हणजे गरीब.
'दिन' शब्दात 'दि' ऱ्हस्व आहे. 'दिन' म्हणजे दिवस.

**नेहा** : शब्दांची किती गंमत आहे ना! अक्षरांत वरवर साम्य आहे; पण लेखनातल्या फरकामुळे अर्थात केवढा फरक!

**सायली** : आपण दोघीजणी असे नवीन शब्द आणि त्यांचे विविध अर्थ रोज समजून घेऊया.

**नेहा** : अगं पण कसे? आपल्याला सारखे आपल्या बाईंकडे जावे लागेल अर्थ विचारायला!

**सायली** : अगं नाही. मला माहीत आहे त्याची गंमत. शब्दांचे अर्थ आपले आपण कसे शोधायचे ते मी तुला दाखवते.

सायली आणि नेहा यांच्याप्रमाणेच शब्दांचे अर्थ शोधण्याचा आनंद तुम्हीही घ्यायला हवा आहे. त्यासाठी तुम्ही या पाठातून शब्दकोश म्हणजे काय, त्याची रचना, तो कसा पाहावा याबाबत माहीत करून घेणार आहात.

शब्दकोश म्हणजे काय, त्याची उद्दिष्टे, तो कसा पाहावा हे आपण समजून घेऊया.




मुलांनो, ज्या एका अक्षराने किंवा अक्षरसमूहाने एखादी वस्तू, विचार, कल्पना, भाव, गुण किंवा क्रिया इत्यादींचा अर्थ व्यक्त केला जातो, त्या अक्षरास किंवा अक्षरसमूहास **'शब्द'** असे म्हणतात.

कोश म्हणजे 'संग्रह' तर शब्दकोश म्हणजे 'शब्दसंग्रह' होय. हा झाला शब्दकोश शब्दाचा वाच्यार्थ; पण विकसित भाषांत शब्दसंग्रह आणि शब्दकोश यांच्या स्वरूपात थोडा फरक असतो.

एखाद्या भाषेच्या विशिष्ट क्षेत्रातील मर्यादित शब्दांच्या संग्रहाला 'शब्दसंग्रह' (Glossary) असे म्हणतात; तर त्या भाषेतील बहुतेक सर्व शब्दांचा संग्रह, विशिष्ट रचनापद्धतीचा अवलंब करून दिला असल्यास त्याला **'शब्दकोश'** (Dictionary) असे म्हणतात.

कोशात समाविष्ट केलेल्या शब्दांची रचना पद्धतशीरपणे केलेली असते. संग्रहित केलेल्या शब्दांचा क्रम कोणत्या पद्धतीने लावला आहे ते कळले तर कोणताही शब्द कोठे सहजतेने सापडेल हे नक्की कळते.

अलीकडे सर्व भाषांतील कोशातील शब्दांची योजना त्या भाषेच्या व्यवहारासाठी वापरल्या जाणाऱ्या लिपीतील वर्णांच्या क्रमाने केलेली असते. अशी योजना करताना शब्दांचे आद्य अक्षर किंवा वर्ण विचारात घेतलेला असतो. या पद्धतीमुळे कोशात शब्द कोठे सापडेल हे चटकन ठरवता येते.

## उद्दिष्टे

(१) प्रत्येक शब्दाला विशिष्ट अर्थ असतो, हे कळणे.

(२) शब्दाचा योग्य अर्थ माहीत करून घेण्याची सवय लागणे.

(३) शब्दाच्या अर्थाच्या छटा समजणे.

(४) 'शब्दकोश' ही संकल्पना समजणे.

(५) शब्दकोशाची गरज व महत्त्व लक्षात येणे.


(६) शब्दकोश हाताळता येणे.

**काय असते शब्दकोशात–**

(१) शब्दांचा संग्रह
(२) शब्दांचे प्रमाण उच्चार
(३) व्युत्पत्ती
(४) समानार्थी प्रतिशब्द
(५) संदर्भानुसार बदलणारे शब्दाचे अर्थ
(६) अर्थाचे स्पष्टीकरण करणारे वर्णन किंवा चित्र
(७) प्रसिद्ध लेखकांच्या ग्रंथातील संदर्भ

## शब्दकोश कसा पाहावा ?

**शब्दकोश पाहण्याचा क्रम :**




शब्दकोशात एखादा शब्द शोधताना 'अकारविल्हे' म्हणजे 'अ' या अक्षरापासून लावलेला क्रम महत्वाचा असतो. आपण आपल्या पाठ्यपुस्तकातील एका कवितेचे उदाहरण पाहू.

''अणूरेणूतुनि शब्द प्रगटति... 'चला चला पुढती' विज्ञानाचा प्रकाश आला घडे दिव्य क्रांती'' आता समजा, आपल्याला 'अणूरेणूतुनि', 'प्रगटति', 'विज्ञान', 'प्रकाश', 'दिव्य' आणि 'क्रांती' असे सहा शब्द शोधायचे आहेत.

पहिली महत्वाची गोष्ट म्हणजे शब्दांना लागलेले प्रत्यय वगळून, सामान्यरूप वगळून मूळचा शब्दच शोधायचा असतो. 'अणूरेणूतुनि' या शब्दातला–तुनि हा प्रत्यय वगळून मूळ शब्द शोधावा लागेल. दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे क्रियापदाचा मूळ धातू शोधायचा असतो, म्हणजे 'प्रगटति' या शब्दाचा 'प्रकट' हा मूळ धातू आपल्याला शोधावा लागेल. **'अणूरेणू', 'प्रकट', 'विज्ञान', 'प्रकाश', 'दिव्य', 'क्रांती'** या सहा शब्दांचा आता आपण क्रम लावू. आपल्या वर्णमालेनुसार यांची पहिली अक्षरे कुठल्या क्रमाने येतात ते पाहू.

आता अर्थातच स्वरापासून सुरू होणाऱ्या शब्दांचा क्रम आधी लागेल. म्हणजे इथे 'अणूरेणू' हा शब्द आधी येईल. त्याचा पहिला क्रमांक, यानंतर उरलेल्या पाचपैकी कुठलं अक्षर आधी येईल ?

यात साहजिकच स्वरानंतर येणारे पहिले व्यंजन 'क', म्हणजे दुसऱ्या क्रमांकाला येईल 'क्रांती'. नंतर क्रम येईल 'दिव्य' मधील 'द' चा. मग येतील प्रकट आणि प्रकाश हे शब्द. सर्वांत शेवटी येईल विज्ञान.

आता 'प्रकट' आणि 'प्रकाश' यांत 'प्र' नंतर कुठली अक्षरे येतात ? तर 'क' आणि 'का' आता तुम्हीच सांगा. 'क'

आणि ‘का’ यापैकी कोणाचा क्रम आधी लागेल. अर्थात ‘क’ चा. म्हणून ‘प्रकट’ आधी येईल आणि ‘प्रकाश’ नंतर. मग आता आपला क्रम तयार झाला. ‘अणूरेणू’, ‘क्रांती’, ‘दिव्य’, ‘प्रकट’, ‘प्रकाश’, ‘विज्ञान’. आहे ना सोपे?

यात ‘क्रांती’, ‘प्रकट’, ‘प्रकाश’ यांमध्ये पहिले अक्षर जोडाक्षर आहे. ते कसे शोधायचे? तर ‘अ’ पासून ‘औ’ पर्यंतचे शब्द संपले, की जोडाक्षरे सुरू होतात; म्हणजे ‘क’ पासून ‘कौ’ पर्यंतचे शब्द संपले, की जोडाक्षरे सुरू होतील. त्यात क्+र=क्र शोधायचा, मग क्रा शोधायचा, त्यावर अनुस्वार असलेले शब्द शोधायचे. तेव्हा आपल्याला ‘क्रांती’ सापडेल. आता तुम्ही स्वत: शब्दकोशात शब्द पाहायचा सराव करा.

**टीप :** ‘क्ष’, ‘ज्ञ’ यांचा क्रम अकारविल्हे लावताना ‘ळ’ या शेवटच्या व्यंजनानंतर येतो.

शब्दकोश पाहण्याची, हाताळण्याची सवय लागली, की शब्दाचे अर्थ व मोल तुम्हांला कळेल. योग्य जागी योग्य अर्थाचा शब्द तुम्ही वापरू शकाल. समर्पक शब्दमांडणीच्या प्रवासात शब्दकोश हे अत्यंत महत्त्वाचे साधन आहे. या साधनाचे महत्त्व जाणा. तुम्ही आता उच्च प्राथमिक गटात आहात. भाषिक समृद्धीच्या वाटचालीत शब्दकोशाचे महत्त्व जाणावे, यासाठी या पाठाचा अभ्यास करणे योग्य ठरेल.



## स्वाध्याय

**प्र. १. नम्रता, अंबर, आलोक, वरद, वनिता, समीर, शर्वरी, शेखर, समिरा, मानसी, माधवी हे शब्द ‘अकारविल्हे’ प्रमाणे लावा.**

**प्र. २. तुम्हांला पाठातील एखाद्या शब्दाचा अर्थ शोधायचा असेल तर यापुढे तुम्ही तो कसा शोधाल? सोदाहरण सांगा.**

**प्र. ३. शब्दकोशाचा तुम्हांला कळलेला उपयोग तुमच्या शब्दांत सांगा.**

**प्र. ४. शब्दकोशासंबंधी खालील मुद्द्यांना धरून परिच्छेद तयार करा.**

शब्दकोशाचा उपयोग

शब्दकोश पाहण्याची उद्दिष्टे

## आपण समजून घेऊया.

तुमच्या पाठ्यपुस्तकामध्ये तुम्ही धडे वाचता, कविता वाचता. धडे आणि कविता म्हणजेच गद्य आणि पद्य यांच्या रचनेत फरक आहे, हे तुम्हांला माहीत आहे. हा फरक असतो मुख्यत: लयीचा. पद्य गाता येते किंवा लयीत वाचता येते. गद्याचे तसे नसते. लय निर्माण कशी होते? कोणत्या गोष्टीमुळे होते?

वृत्त, छंद यांसारख्या गोष्टींमुळे कवितेला लय मिळते. कवितेतील ऱ्हस्व, दीर्घ स्वरांचा जो एक विशिष्ट क्रम वापरला जातो, त्याला '**वृत्त**' म्हणतात. याचाच अर्थ असा, की कविता एका विशिष्ट वृत्तामध्ये रचलेली असते, म्हणूनच कविता आपल्याला लयीत म्हणता येते. वृत्तासंबंधीच्या काही महत्त्वाच्या संकल्पना समजून घेऊया.

- **खालील तक्ता अभ्यासा.**

| व्याकरणातील संज्ञा | लघू | गुरू |
|---|---|---|
| अक्षरे | ऱ्हस्व अक्षरे | दीर्घ अक्षरे |
| अक्षरे-स्वर | अ, इ, उ, ऋ | आ, ई, ऊ, ए, ऐ, ओ, औ |
| स्वरयुक्त अक्षरे | क, कि, कु | का, की, कू, के, को, कौ |
| संकेत खूण | अर्धचंद्र ∪ | आडवी रेघ — |

| उदा., | पसारा | काकडी | मदन | पाटण | वैशाली |
|---|---|---|---|---|---|
| लघुगुरूक्रम | ∪ - - | - ∪ - | ∪ ∪ ∪ | - ∪ ∪ | - - - |

- **वृत्तांतील लघुगुरूक्रम ठरवण्याचे काही नियम आहेत.**

(१) 'पुस्तक' या शब्दातील लघुगुरूक्रम (– ∪ ∪) असा आहे, कारण 'पु' हे लघू असले, तरी पुढच्या 'स्त' या जोडाक्षराचा आघात मागील लघू अक्षरावर येतो. त्यामुळे ते गुरू समजावे. जर असा आघात येत नसेल, तर ते अक्षर ऱ्हस्व आहे ते ऱ्हस्वच (लघू) राहते.

(२) जोडाक्षरयुक्त शब्दातील शेवटचा वर्ण ऱ्हस्व असेल, तर ते जोडाक्षर ऱ्हस्व मानावे.
उदा., भास्कर (– ∪ ∪) दीर्घ असेल, तर दीर्घ उदा., इच्छा (– –)

(३) लघू अक्षरावर अनुस्वार येत असेल किंवा त्यानंतर विसर्ग येत असेल तर ते गुरू मानावे.
उदा., नंतर (– ∪ ∪) दु:खी (– –)

(४) कवितेच्या चरणातील शेवटचे अक्षर लघू असले तरी दीर्घ उच्चारले जाते. त्यामुळे ते गुरू मानतात.

**मराठी पद्यरचनेतील वृत्तांचे तीन प्रकार**

(१) अक्षरगणवृत्ते (२) मात्रावृत्ते (३) छंदवृत्ते

या इयत्तेत आपल्याला अक्षरगणवृत्ते शिकायची आहेत. ज्या वृत्तांतील अक्षरांची संख्या ठरावीक असते व त्या अक्षरांचा लघुगुरूक्रम सुद्‌धा ठरावीकच असतो, त्या वृत्तांना '**अक्षरगणवृत्ते**' म्हणतात.

**गण निश्चितीसाठी काही संकल्पना**

(१) चरणातील तीन-तीन अक्षरांचे मिळून गण तयार होतात. उर्वरित प्रत्येक अक्षराचा स्वतंत्र गण पाडावा. य, र, त, न, भ, ज, स, म असे एकूण आठ गण आहेत. गण म्हणजे कवितेतील अक्षरे मोजण्याचे माप. लघुगुरूक्रमानुसार हे गण ठरतात. यात प्रत्येक गणाच्या आरंभीच्या अक्षरापासून गणाचे नाव ठरते. उदा., 'य' गण म्हणजे 'यमाजी'. य ◡ मा – जी – यात 'य' हे अक्षर लघू आणि 'मा', 'जी' ही अक्षरे गुरू आहेत.

(२) उच्चार सुलभ व्हावा म्हणून पद्याच्या चरणातील ज्या ठिकाणी थांबायचे असते त्याला '**यती**' असे म्हणतात. यती प्रत्येक चरणाच्या शेवटी व कधी कधी मध्येही असतो.

- **लघुगुरूक्रम ओळखण्यासाठी खाली दिलेल्या गणांचा तक्ता पहा.**

| गण | गणाचे नाव | लघुगुरूक्रम |
|---|---|---|
| य गण | यमाजी | आद्यलघू |
| र गण | राधिका | मध्यलघू |
| त गण | ताराप | अंत्यलघू |
| न गण | नमन | सर्वलघू |
| भ गण | भास्कर | आद्यगुरू |
| ज गण | जनास | मध्यगुरू |
| स गण | समरा | अंत्यगुरू |
| म गण | मानावा | सर्वगुरू |

- **आता आपण भुजंगप्रयात, मालिनी, वसंततिलका या अक्षरगणवृत्तांचा अभ्यास करणार आहोत.**

## (१) भुजंगप्रयात

**वृत्ताची लक्षणे**

(अ) या वृत्तात चार चरण असतात.

(आ) प्रत्येक चरणात १२ अक्षरे असतात.

(इ) यती ६ व्या व १२ व्या अक्षरावर असतो.

(ई) भुजंगप्रयात वृत्ताचे गण- य-य-य-य असे पडतात.

उदा., मना श्रेष्ठ धारिष्ट जीवी धरावे ।<br>
मना बोलणे नीच सोशीत जावे ।<br>
स्वये सर्वदा नम्र वाचे वदावे ।<br>
मना सर्व लोकांसि रे नीववावे ।।

| म ना स | र्व लो कां | सि रे नी | व वा वे |
|---|---|---|---|
| ◡ – – | ◡ – – | ◡ – – | ◡ – – |
| य | य | य | य |

- **खालील ओळींचे गण पाडा.**

(अ) मना सज्जना तू कडेनेच जावे.

(आ) सदा सर्वदा योग तूझा घडावा.

## (२) वसंततिलका

**वृत्ताची लक्षणे**

(अ) या वृत्तात चार चरण असतात.

(आ) प्रत्येक चरणात १४ अक्षरे असतात.

(इ) यती ८ व्या व १४ व्या अक्षरावर असतो.

(ई) या वृत्ताचे गण- त-भ-ज-ज-ग-ग असे पडतात.

उदा., द्रव्यास हे गमन-मार्ग यथावकाश ।
की दान भोग अथवा तिसरा विनाश ।
जो घे न भोग-जरि पात्र-करी न देही ।
त्याच्या धनास मग केवळ नाश पाही ।।

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| त्या | च्या | ध | ना | स | म | ग | के | व | ळ | ना | श | पा | ही |
| – | – | ∪ | – | ∪ | ∪ | ∪ | – | ∪ | ∪ | – | ∪ | – | – |
| | त | | | भ | | | ज | | | ज | | ग | ग |

- **खालील ओळींचे गण पाडा.**

(अ) फेकी रसाल तरुही मधुगंधपाश.

(आ) मातीत ते पसरले अति रम्य पंख.

## (३) मालिनी

**वृत्ताची लक्षणे**

(अ) एकूण चार चरण असतात.

(आ) प्रत्येक चरणात १५ अक्षरे असतात.

(इ) यती ८ व्या अक्षरावर असतो.

(ई) या वृत्ताचे गण- न न म य य असे पडतात.

उदा., पखरण बघ घाली भूवरी पारिजात,
परिमल उधळी हा सोनचाफा दिशात;
गवतहि सुमभूषा दाखवी आज देही,
धरणि हरितवस्त्रा मालिनी साजते ही.

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ध | र | णि | ह | रि | त | व | स्त्रा | मा | लि | नी | सा | ज | ते | ही |
| ∪ | ∪ | ∪ | ∪ | ∪ | ∪ | – | – | – | ∪ | – | – | ∪ | – | – |
| | न | | | न | | | म | | | य | | | य | |

- **खालील ओळींचे गण पाडा.**

(अ) अविरत पथि चाले, पांथ नेमस्त मानी-

(आ) वचनि मननि त्याच्या, ध्येय हे एकटावे-

## भाषासौंदर्य

- **खाली काही कवी व कवयित्री यांच्या प्रसिद्ध कवितांच्या ओळी दिल्या आहेत. या ओळी कोणाच्या आहेत त्याचा शोध घ्या व दिलेल्या चौकटींत त्यांची नावे लिहा.**

  - रंगरंगुल्या, सानसानुल्या, गवतफुला रे गवतफुला – [ ]
  - आनंदी आनंद गडे, इकडे तिकडे चोहीकडे – [ ]
  - या बालांनो, या रे या! लवकर भरभर सारे या! – [ ]
  - एका तळ्यात होती बदके पिले सुरेख – [ ]
  - ने मजसी ने परत मातृभूमीला, सागरा प्राण तळमळला – [ ]
  - अरे संसार संसार, जसा तवा चुल्ह्यावर – [ ]
  - छळून घ्या संकटांनो, संधी पुन्हा मिळणार नाही – [ ]
  - बाळ, चाललासे रणा, घरा बांधिते तोरण – [ ]
  - देणाऱ्याने देत जावे, घेणाऱ्याने घेत जावे – [ ]
  - या नभाने या भूमीला दान द्यावे – [ ]
  - खरा तो एकचि धर्म जगाला प्रेम अर्पावे – [ ]
  - आई एक नाव असतं,<br>घरातल्या घरात गजबजलेलं गाव असतं– [ ]

❀❀❀

HCUZT3

# २१. संतवाणी

(अ)

**संत तुकाराम** (१६०८ ते १६५० ) : वारकरी परंपरेतील श्रेष्ठ संत कवी. त्यांच्या रचनांमध्ये अध्यात्म, भक्ती आणि व्यवहार यांची सांगड घातलेली दिसते. ढोंग, दैववाद, अहंकारी वृत्ती, दुराचार इत्यादींचा परखड समाचार त्यांनी आपल्या अभंगांमधून घेतलेला आहे. प्रेम, नैतिकता, करुणा व सर्वांमध्ये ईश्वराचे अस्तित्व ही मूल्ये स्वीकारून आदर्श प्रापंचिक जीवन कसे जगावे, याचा उपदेश ते आपल्या अभंगांतून करतात. त्यांच्या अभंगातील ओळींना सुभाषिताचे मोल प्राप्त झाले आहे.

प्रस्तुत अभंगात संत तुकाराम महाराज यांनी शब्दांचे महत्त्व विविध उदाहरणे देऊन पटवून दिलेले आहे.

- ऐका. वाचा. म्हणा.

**आम्हां घरीं धन शब्दांचींच रत्नें ।**
**शब्दांचींच शस्त्रें यत्न करूं ।।१।।**

**शब्दचि आमुच्या जीवाचें जीवन ।**
**शब्द वाटूं धन जनलोकां ।।२।।**

**तुका म्हणे पहा शब्दचि हा देव ।**
**शब्देंचि गौरव पूजा करूं ।।३।।**

सकलसंतगाथा खंड दुसरा : श्रीतुकाराममहाराजांची अभंगगाथा
अभंग क्रमांक १६२७
संपादक : प्रा. डॉ. र. रा. गोसावी

**भावार्थ :** संत तुकाराम महाराज सांगतात, ‘‘आमच्या घरी धन कोणते ? तर शब्दरूपी रत्ने हेच आमचे धन आहे. आमच्या शब्दांना रत्नांचे मूल्य प्राप्त झालेले आहे. समाजप्रबोधनासाठी, स्वत:चे मत पटवून देण्यासाठी आम्ही शब्दरूपी शस्त्र जाणीवपूर्वक वापरतो. कधी समाजप्रबोधनासाठी अत्यंत परखड शब्दांचा वापर करतो, तर कधी मृदू शब्दांत चर्चा करतो, बोलतो. शब्द हेच आमच्या जीवनाचे सर्वस्व आहे. समाजातील लोकांना धन म्हणून आम्ही शब्दच वाटतो. म्हणजेच शब्दांच्या माध्यमातून अनमोल असा उपदेश करून लोकांचे जीवन सुधारतो. शब्द आमच्यासाठी देवस्वरूप आहेत, म्हणून या शब्दांचा गौरव व सन्मान करून आम्ही त्याची पूजा करतो.’’



## स्वाध्याय

**प्र. १. आकृती पूर्ण करा.**

संत तुकाराम महाराजांच्या मते शब्दांचे महत्त्व

**प्र. २. सूचनेनुसार सोडवा.**

(अ) 'धन' हे उत्तर येईल असा प्रश्न तयार करा.

(आ) संत तुकाराम महाराज शब्दांचा गौरव करतात कारण......

**प्र. ३. खालील संकल्पना स्पष्ट करा.**

(अ) शब्दांचीच रत्ने ______________

(आ) शब्दांचीच शस्त्रे ______________

**प्र. ४. शब्द हे संत तुकाराम महाराजांचे सर्वस्व आहे, या अर्थाची कवितेतील ओळ शोधा.**

**प्र. ५. तुमच्या शब्दांत उत्तरे लिहा.**

(अ) 'शब्द वाटूं धन जनलोकां' या ओळीचा तुम्हांला समजलेला अर्थ स्पष्ट करा.

(आ) संत तुकाराम महाराज शब्दांचा गौरव का व कसा करतात ते तुमच्या शब्दांत स्पष्ट करा.

(इ) 'शब्दांचे सामर्थ्य अफाट असते' या विधानाबाबत तुमचा अनुभव लिहा.

**(आ)**

**संत सावता माळी** (अंदाजे १२५० ते १२९५) : नामदेवकालीन सुप्रसिद्ध संत. आपला व्यवसाय हाच परमार्थ मानून ते भजन–नामस्मरण करत शेतात–मळ्यात राबत असत. प्रत्येकात सुप्त अवस्थेत परमतत्त्व असते, ते भक्तिभावाने जागृत करायचे असते हा त्यांचा महत्त्वाचा विचार. त्यांचे अभंग आशयाने समृद्ध आणि आविष्काराच्या दृष्टीने प्रासादिक आहेत.

प्रस्तुत अभंगात संत सावता महाराज नेहमी संतांची आठवण मनात रहावी, असे मागणे परमेश्वराकडे मागतात.

- **ऐका. वाचा. म्हणा.**

**मागणें तें आम्हा नाहीं हो कोणासी ।**
**आठवावें संतासी हेंचि खरें ।।१।।**

**पूर्ण भक्त आम्हां ते भक्ती दाविती ।**
**घडावी संगती तयाशींच ।।२।।**

**सावता म्हणजे कृपा करी नारायणा ।**
**देव तोचि जाणा असे मग ।।३।।**

सकलसंतगाथा खंड पहिला : संत सावता माळी अभंगगाथा
अभंग क्रमांक ७
संपादक : प्रा. डॉ. र. रा. गोसावी

**भावार्थ :** संत सावता महाराज म्हणतात, ‘‘हे परमेश्वरा, आम्हांला कोणाजवळ काही मागणे मागायचे नाही. आम्हांला नेहमी संतांची आठवण राहावी हीच खरी आमच्या मनातील इच्छा आहे. संत हेच खऱ्या अर्थाने भक्तीचा मार्ग दाखवतात, म्हणून आम्हांला संतांचा सहवास सतत लाभावा. त्यासाठी परमेश्वरा, कृपा करून आम्हांला संतांची भेट घडव, कारण संत हेच आमच्यासाठी देव आहेत.’’



## स्वाध्याय

**प्र. १. चौकटी पूर्ण करा.**

(अ) **संत सावता महाराजांची मागणी** → [ ]

(आ) **संतांनी दाखवला तो मार्ग** → [ ]

**प्र. २. सूचनेनुसार करा.**

(अ) अभंगात आलेला परमेश्वर या अर्थाचा दुसरा शब्द लिहा.

(आ) 'संत' हे उत्तर येईल असा प्रश्न तयार करा.

(इ) संत सावता महाराजांना कोणाची संगत हवी? (एका वाक्यात उत्तर लिहा.)

**प्र. ३. तुमच्या शब्दांत उत्तरे लिहा.**

(अ) संत सावता महाराजांचे मागणे तुमच्या शब्दांत लिहा.

(आ) संत सावता महाराज संतांचा सहवास लाभण्याची मागणी का करतात ते स्पष्ट करा.

(इ) 'सर्वच भक्त संतांना परमेश्वर रूप समजतात' हा विचार अभंगाच्या आधारे पटवून द्या.

**उपक्रम :** खालील संतांची माहिती मिळवा आणि दिलेल्या मुद्द्यांनुसार लिहा.

| संत / मुद्दे | संत ज्ञानेश्वर | संत नामदेव | संत एकनाथ | संत तुकडोजी महाराज |
|---|---|---|---|---|
| पूर्ण नाव | | | | |
| काळ | | | | |
| प्रसिद्ध ग्रंथ | | | | |
| प्रसिद्ध सुवचन | | | | |
| एखादा अभंग | | | | |

MD4VUQ

# शब्दार्थ

पाठ्यपुस्तकातील पाठ व कविता यांमध्ये आलेले कठीण शब्द, वाक्प्रचार व त्यांचे अर्थ येथे दिलेले आहेत. दिलेले शब्द व वाक्प्रचार यांची मांडणी विद्यार्थ्यांनी वहीत शब्दकोशाप्रमाणे करावी.

◆ **भारत देश महान (गीत)**

**एकमुखाने** – एका सुरात. **शिरी** – डोक्यावर. **जागवणे** – जागृत करणे. **रणांगण** – युद्‌धभूमी.

◆ **माझ्या देशावर माझे प्रेम आहे**

**अलबत** – नक्कीच. **करंटे** – दुर्दैवी. **आपत्काळी** – संकटकाळी. **सक्रिय** – क्रियाशील. **सणंग** – विणलेले अखंड वस्त्र. **यच्चयावत** – सगळे, सर्व. **कंबर कसणे** – काम करायला तयार होणे. **शब्दांकित करणे** – शब्दांत व्यक्त करणे.

◆ **लाखाच्या...कोटीच्या गप्पा**

**पासपोर्ट** – पारपत्र. **येरझारा घालणे** – ये–जा करणे. **व्हिसा** – परदेशात जाण्यासाठी परवानगीचा शिक्का असलेले पत्र. **बॅरिस्टर** – वकील. **कोट्यधीपती** – करोडपती. **हरी हरी करत बसणे** –काही काम न करता नुसते बसून राहणे. **रिहर्सल** – सराव.

◆ **नव्या युगाचे गाणे (कविता)**

**क्रांती** – मोठा बदल. **प्रभा** – तेज. **झणि** – त्वरित. **अमरत्वाची फुले** – कायम टिकणारी फुले.

◆ **सुरांची जादुगिरी**

**डालून ठेवणे** – झाकून ठेवणे. **कुर्रेबाज** – ऐटबाज. **कंठ फुटणे** – आवाज उमटणे. **कोलाहल** – गोंधळ. **खुमारी** – लज्जत. **कानात प्राण आणून ऐकणे** – लक्षपूर्वक ऐकणे.

◆ **असा रंगारी श्रावण (कविता)**

**साजिरा** – सुंदर. **कलागत** – कारागिरी. **पहाळी** – पावसाची सर. **खेळगा** – खेळगडी.

◆ **अण्णा भाऊंची भेट**

**वलानी** – कपडे वाळत घालायची दोरी. **बाळवती** – बाळाचे अंथरूण–पांघरूण, दुपटे.

## ◆ धाडसी कॅप्टन : राधिका मेनन

**निर्धारित करणे** – निश्चित करणे. **तैनात असणे** – नेमणुकीवर असणे. **रौद्र रूप** – भयंकर, अक्राळ–विक्राळ रूप. **जिवाची बाजी लावणे** – जीव धोक्यात घालणे. **जिवाचा आकांत करणे** – खूप प्रयत्न करणे. **निकराचा प्रयत्न करणे** – कसोशीने प्रयत्न करणे.

## ◆ विद्याप्रशंसा (कविता)

**दुजा** – दुसरा. **कनक** – सोने. **भूषणे** – दागिने, अलंकार. **अनुकूळ** – अनुकूल.
**चिंतित फळ**– मनात ठरवलेले फळ. **भजणे** – चिंतन करणे.

## ◆ लिओनार्दो दा व्हिंची (स्थूलवाचन)

**वाकबगार** – तरबेज. **कोड्यात टाकणे** – पेचात टाकणे.

## ◆ स्वामी विवेकानंदांची भारतयात्रा

**कंठस्थ –** तोंडपाठ. **धादांत –** पूर्णपणे.

## ◆ गोधडी (कविता)

**बोचका –** गाठोडे. **जीर्ण –** खूप जुना. **स्मृती –** आठवण.

## ◆ पाड्यावरचा चहा

**कारवी –** वनस्पतीचे नाव. **मेढी –** आखूड खांब. **वासा –** घराच्या आढ्यापासून वळचणीपर्यंत जोडलेला लाकडी दांडा. **माची –** चार पायांची उंच टेबलासारखी. **राप –** काळा थर. **शिंके (शिंकाळे) –** वस्तू सुरक्षित रहावी म्हणून ती उंचीवर टांगून ठेवण्यासाठी काथ्याच्या साहाय्याने तयार केलेले साधन. **ग्लानी येणे –** मरगळ येणे. **अठरा विश्वे दारिद्र्य–** म्हणजेच कायम गरिबी. **पांगणे –** विखुरणे. **वर्दी–** निरोप. **खाईत पडणे –** संकटात पडणे. **गळवट –** काठोकाठ, गळ्यापर्यंत.

## ◆ फुलपाखरे

**सुजल** – भरपूर पाणी असलेले. **सुफल** – फळांनी समृद्ध. **सस्यश्यामल** – पिकांनी हिरवीगार झालेली जमीन. **मनावर मळभ येणे**– निरुत्साह वाटणे. **डिक्शा** – कोवळे देठ.
**सादृश्य** – साम्य. **भांबावून जाणे** – गोंधळून जाणे.

## ◆ आळाशी (कविता)

**उकल होणे** – उलगडा होणे. **रगात** – रक्त. **ताट** – ज्वारी/बाजरी यांचे रोप.
**आळाशी** – कडब्याची पेंढी. **आळा बांधणे** – कडब्याची ताटं एकत्र बांधण्यासाठी ओल्या ताटाचा बांधलेला विळखा.

## ◆ चोच आणि चारा

**उलूशी** – लहानशी. **संरचना** – ठेवण. **नजाकतदार** – सुबक. **अधिवास** – वस्ती.

## ◆ अन्नजाल (कविता)

**भंगणे** – तुटणे, मोडणे. **निसर्गनारायण** – निसर्गरूपी देव. **तगणे** – टिकणे.
**क्षीण होणे** – कमकुवत होणे.

## ◆ जलदिंडी

**सुकाणू** – नौका वळवता यावे यासाठी त्याच्या मागच्या बाजूस पाण्यात असलेले साधन.
**शीड** – वारा अडवण्यासाठी नौकेवरती बांधलेले कापड. **अग्रणी**– सर्वांत पुढे.
**गतकर्म** – भूतकाळात केली गेलेली कामे.

## ◆ गे मायभू (कविता)

**पांग फेडणे** – उतराई होणे. **ललाटरेषा** – भाग्यरेषा.

## ◆ संतवाणी

(अ) **यत्न** – प्रयत्न. **गौरव** – सन्मान.

(आ) **दाविती**– दाखवतात. **जाणा** – जाणून घ्या.

***



## काही पूरक पुस्तके व संदर्भ ग्रंथ

(१) बहिणाबाईंची गाणी- बहिणाबाई चौधरी
(२) फकिरा- अण्णा भाऊ साठे
(३) पूर्वरंग- पु. ल. देशपांडे
(४) विशाखा (कवितासंग्रह)- कुसुमाग्रज
(५) गर्भरेशीम- इंदिरा संत
(६) तराळ-अंतराळ- शंकरराव खरात
(७) पक्षी जाय दिगंतरा- मारुती चितमपल्ली
(८) फिरस्ती- उत्तम कांबळे
(९) आमचा बाप आणि आम्ही- डॉ. नरेंद्र जाधव
(१०) मजेत जगावं कसं?- शिवराज गोर्ले
(११) मास्तरांची सावली- कृष्णाबाई सुर्वे
(१२) निसर्गायन- दिलीप कुलकर्णी
(१३) जोहड- सुरेखा शहा
(१४) पत्रास कारण की....- अरविंद जगताप
(१५) विविध शब्दकोश व विश्वकोश



## महत्त्वाची संकेतस्थळे व लिंक्स

https://en.wikipedia.org/wiki/Vitthal_Umap
https://en.wikipedia.org/wiki/Achyut_Godbole
https://en.wikipedia.org/wiki/Godavari_Parulekar
https://en.wikipedia.org/wiki/Suresh_Bhat
https://en.wikipedia.org/wiki/Tukaram
https://en.wikipedia.org/wiki/Savata_Mali
http://youtu.be/vgKqTVTFSEY
http://youtu.be/KJboCFa4iVQ

शिक्षकांनी पाठ्यपुस्तकात दिलेल्या पूरक पुस्तके, संदर्भ ग्रंथ, संकेतस्थळे व लिंक्स यांचा वापर करून पाठ्यघटकाशी संबंधित माहिती मिळवावी. त्या माहितीचा अध्यापनात संदर्भ म्हणून वापर करावा.




महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

बालभारती इयत्ता आठवी (मराठी)

₹ ४९.००